साल अखेर " ७ " १०८
किरकोळ अंकास........................०४

नोटीशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस.........०१

Six monthly...........8
Single copy...........

Advertisemen
Below 10 lines...
Per line over 10.
Repetition perlin

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR.

VOLXXII AKOLA MONDAY 6 AGUEST 1888 NO.

वर्ष २२ अकोला सोमवार तारीख ६ माहे आगष्ट सन १८८८ इ० अंक

निःसंशय कायदेशीर.

## न भूतो न भविष्यति!

### फारच दुर्मिळ संधि!!!

### बृहद्राष्टीय शब्दविजिगीषा.

( शब्दांवर बक्षिसें मिळविण्याची चढाओढ. )

मराठींत, इंग्रजींत, गुजराथींत आणि हिंदींत.

### बक्षिसांत

### रुपये ५००० चा विनियोग !!!

ह्यांत

मशीबाची परीक्षा नसून अकलेचीच परीक्षा आहे.

### सिद्धेन्दुचन्द्रिका

नामक अपूर्व ग्रंथ जो मराठींत, गुजराथींत आणि हिंदी भाषेंत प्रसिद्ध करण्याचें योजिलें आहे, त्याचे वर्गणदारांस मात्र ह्या चढाओढींत प्रवेश करितां येईल.

प्रत्येक प्रतीस किंमत.

### दोन रुपये.

वर्गणी भरल्या बरोबर बक्षिस चिठी मिळेल. तिच्या आधारें ज्या त्या भाषेंत विजिगीषा (जिंकण्याची स्पर्धा) करण्यास सांपडेल.

### विशेष योजना.

गृहस्थ निरनिराळ्या तिन्ही भाषेंतील तीन पुस्तकांस एकदम वर्गणीदार होतील त्यांसच इंग्रजी भाषेंत शब्द तयार करून विजिगीषा करण्याचा हक्क मिळून शिवाय त्या तिन्ही भाषांत ही विजिगीषा करितां येईल.

ह्या तीन प्रतींची किंमत.

### फक्त पांच रुपये.

ठेविली आहे.

सर्व खुलासेवार माहिती साठीं प्रास्पेक्टस मागावा.

### मेसर्स. जे भाटिया ऍन्ड ब्रदर्स.

नं० ३८८, फाकलंड रोड, भायखळा.

## TO THE DEAF.

A 132 PAGE ILLUSTRATED BOOK ON DEAFNESS NOISES IN THE HEAD HOW CURED AT YOUR HOMES. PRICE 6 ANNAS; ADDRESS DR. NICHOLSON, 5, OLD COURT HOUSE STREET CALCUTTA.

## बहिरे लोकांस सुचना

बहिरेपणा व डोक्यांत ध्वनी होणें हे आपल्या घरीं कसे बरे होतात याजवर स्पष्टी करणास हे १३२ पानांचे आमचे पुस्तक किंमत ६ आणे. डाक्टर निकलसन ५ ओल्ड कोर्ट हाऊस स्ट्रीट--कलकत्ता या पत्त्यावर मागवावे.

### नोटीशीचें उत्तर.

पिठाराम वलद किसन अज्ञान पालन करणार आई व आजी राधा व भोनाई तर्फे मुखत्यार मारुती वलद परशराम यांस खालीं सही करणार याजकडूनः—

नोटीस देण्यांत येतें कीं, तुह्मी तारीख ३०—७—८८ इसवीची नोटीस दिली ती पावली, आह्मी पूर्वीं येथें दोन चार वेळा आलों, परंतु तूं येथें नसल्या कारणानीं आह्मी परत गेलों. व नंतर आह्मी येथें येऊन आज ५—६ दिवस झाले तुझी वाट पहात बसलों असतां आमचे मागाहून तीन दिवसांनीं येथें आला असून विनाकारण अशी खोटी नोटीस देण्यांत कांहीं अर्थ नाहीं. आतां दस्तैवजाचे संबंधानें ज्या दस्तैवजाच्या मुदती संपत आल्या आहेत त्याचे नवे दस्तैवज तूं आपले मालकाचे नांवानें नवीन करून घेतले ते आमचे व तुमचे नांवानें करून घ्यावें ह्मणून आह्मी तुजला सांगितलें असतां तसें केलें नाहीं. यामुळें आह्मी सर्व गोष्टीचे जबाबदार तुजला धरलें जाईल. व नुकसान घेतलें जाईल.

( सही. )

दत्तु वलद आनाजी तेली
रहाणार आडगांव हल्ली मुक्काम अकोला
दस्तुर खुद्द.

वऱ्हाडसमाचार.

मित्ती आषाढ वद्य १४ शके १८१०.

## बरार रुरल बोरडस लॉ सन १८८५ यांतील कलम३३ अन्वयें नियम.

( मागील अंकावरून पुढें चालूं )

४८ कायद्यांतील कलम २४ अन्वयें प्रत्येक जिल्हा बोरडाचे जमा व खर्चाचे वार्षिक हिशोब जोडलेल्या बी. नमुन्याप्रमाणें असावेत.

४९ हे वार्षिक हिशोब जिल्हा बोरडाचे सभे कडेस विचाराकरितां पाठवावे. ही सभा प्रत्येक वर्षी मे महिन्याचे पहिले आठवड्यापेक्षां उशीरानें भरवूं नये.

५० जिल्हा बोरडानें ह्या वार्षिक हिशोबाचा विचार केल्यावर स्थानिक सुधारणेचा रिपोर्ट इंग्रजींत किंवा देश भाषेंत तयार करावा व त्यांत मागील सालांत जिल्हा बोरडानीं केलेल्या कामाचे पुनर विवेचन दाखल करावें. व त्या सालचे बजेटांत त्या कामांकरितां दाखविलेल्या अंदाजाशीं त्यांचा मेळ दाखवावा.

५१ हा रिपोर्ट डेपुटी कमिशनरच्या मार्फतीनें कमिशनरकडे मे महिन्याचे १५ तारखे पर्यंत पाठविला पाहिजे व त्या समागमें वार्षिक हिशोब कमिशनर यांणीं तपासण्याकरितां व अखेर तपासणी करण्या करितां पाठवावे. डिपुटी कमिशनर यांणीं त्याच तारखेस हिशोबाची एक नकल बी. नमुन्या प्रमाणें कम्पट्रोलर हैदराबाद यांजकडे पाठवावी.

५२ कामास ठेवलेले नोकर मंडळीचा पगार व ह्या तपासणीच्या कामाकरितां केलेला इतर खर्च संबंध असणारे जिल्हा बोरडाक हे खर्ची घालावा.

५३. कामिशनर यांणीं सर्व जिल्हा बोरडचे स्थानिक सुधारणेचे रिपोर्ट व वार्षिक हिशोब रेसिडेंट साहेब यांचे सेक्रेटरी यांजकडे जून महिन्याचे १५ तारखे पर्यंत पाठविले पाहिजेत.

५४ बोरडस लॉचे कलम २३ अन्वयें नेमलेले फिन्यान्स कमेटीनें प्रत्येक महिन्याचे ३ तारखेपर्यंत डिपुटी कमिशनर यांजकडे नगदी बुकाची नकल पाठवावी व त्याजबरोबर खालीं सांगितलेले कागद पाठवावे.

१. तालुक्याची नगदी वही व व्हावचर.

२. नोकरांचीं बिलें व १० रुपयांहून जास्त रकमांबद्दलचीं कांटिंजंट बिलें सब-व्हावचर समेत ( नियम ९४ पहा. )

वरील हिशोब डिपुटी कमिशनर यांजकडे येऊन दाखल झाल्यावर त्यांनीं या सोबत दिलेले नमुने क. व ड. या प्रमाणें वर्गवारीचे हिशोब तयार करावे. त्यांतून एकांत मागील महिन्यांत वसूल आलेल्या रकमा व दुसऱ्यांत खर्च झालेल्या रकमा दाखवाव्या. शिवाय सोबत दिलेला नमुना इ. या अन्वयें शिलकीचें पत्रक करावें. आणि वरील सर्व कागद व १० रुपयांहून अधिक झालेल्या खर्चांबद्दल व्हावचर कमिशनर यांजकडे अखेर तपासणी होण्यास दर महिन्याच्या १० वे तारखे पर्यंत रवाना करावें.

५५ वर्गवारीचे हिशोब कमिशनरकडे रवाना करण्या पूर्वीं डिपुटी कमिशनर यांनीं त्यांत दर्शविल्या प्रमाणें सरकारी खजिन्यांतील एकंदर वसूल, खर्च व राहिलेली शिलक ट्रेझरी आफिसरचे सहीनिशीं खरी करावी. आणखी त्यांनीं कम्पट्रोलर हैदराबाद यांजकडे विलंब न लावितां नमुना फ. इ. प्रमाणें गोषवारा पत्रक त्या नमुन्याचे अखेरीस दाखविलेली शिलक रकम प्रथम ट्रेझरी आफिसर यांजकडून खरी करवून घेऊन नंतर पाठवावें.

५६. प्रत्येक जिल्हा बोरडानें जमेचे व खर्चाचे रोजचे हिशोब असे नमुन्यानें ठेवावे कीं त्यांवरून त्यांस दिलेले नमुन्या प्रमाणें माहेवारी व वार्षिक हिशोब करितां येतील.

५७. प्रत्येक तालुक बोर्डानें आपले हिशोब त्यांचे जिल्हा बोरडानें सांगितलेले अशा नमुन्याप्रमाणें ठेवावे कीं, त्यावरून जि

बोरडास ते हिशोब त्यांचे हिशोबांत ील करितां येतील.

(पुढें चालूं.)

## राष्ट्रीय सभा.

नगांतील अन्य राष्ट्रा प्रमाणें हिंदुस्थान- अभ्युदय होण्यास राजकीय, सामाजिक, ाणि विद्ये संबंधानें उन्नति झाली पाहिजे ाणि ती घडवून आणण्यास जीं कांहीं कारअसतात त्या पैकीं बहुतेकांचा कार्यभाग रनिराळ्या पर्यायांनीं राष्ट्रीय सभेकडून ईल असें साधारण अनुमान आहे. हें धोरबांधण्यास अनुकूळ व प्रातिकूळ साधनें ाणतीं आहेत आणि ह्यांचा विचार करितां- लोकांमध्यें मतभेद कसा पडतो इत्यादि ोष्टी मागील अंकीं प्रतिपादिल्या होत्या; पा लेखास अनुसरून राष्ट्रीय सभेचे मूळ द्देश काय काय आहेत, तिची पद्धत कशी ाय आहे आणि तदनुरूप उपाय कोणकोणते ोजिले आहेत याचा आज विचार करीत ाहों.

इंग्रजी उदार शिक्षण मिळूं लागलें त्यामाना शिकलेल्या लोकांच्या मनोवृत्तीस सुधारणेचें ळण लागलें; आणि राजकर्त्यासंबंधानें पूर्वीचे ग्रह पालटत चालले तसतसे त्यांचे विचार राष्ट्राच्या उन्नतीकडे सहजीं वळले. वस्तुदृष्टचा राष्ट्रीय सभेची स्थापना इंग्लंडांतील राजकीय लोकसमाजाच्या धर्तीवर आहे. ाचें पहिलें कारण असें कीं लोकमताच्या बळकटीवर उभारलेल्या युरोपियन संस्थेचें खरें महत्व आह्मांस कळून आलें आहे आणि दुसरें कारण अशा संस्थेची हिंदुस्थानांत मोठी उणीव आहे हें ही आमच्या पूर्णपणें लक्षांत आहे. ही उणीव भरून काढण्या करितां शिकलेल्या नेटिवांतील विचारी व धोरणी गृहस्थांनीं पुढारपणा घेतला आणि लोकांच्या संमतीनें युक्तिप्रयुक्तीनें राष्ट्रीय सभा स्थापिली. ही सभा जन्मास येऊन प्रस्तुत तिसरें वर्ष लागलें आहे. ह्या तीन वर्षांच्या अनुभवा वरून सभेच्या मूळ उद्देशाची सत्यता लोकांस वाटूं लागली व वर्षानुवर्ष ती दृढ होत नाईल अशी बळकट आशा आहे. ज्या समाज शकटाच्या नियमताच्या धोरणानें आह्मी आपले मनोरथ बसविले आहेत त्या राष्ट्रीय सभेच्या मूळ उद्देशाप्रमाणें मुख्य तीन कलमें आहेत ती येणें प्रमाणें:— (१) हिंदुस्थानच्या पंचवीस कोटी प्रजेमध्यें नाना प्रकारचे लोक आहेत व त्यांच्यामध्यें कोणत्या तरी कारणानें ह्मणून ऐक्य नाहीं तर तें ऐक्य होईल व लोकांमधील बंधुप्रेम वाढेल अशा प्रयत्नानें हिंदुस्थानचे एक 'राष्ट्र' बनवावयाचे; [२] ह्या राष्ट्राच्या राजकीय सामाजिक आणि विद्ये संबंधानें उन्नती होण्या साठीं सावकाशपणें चळवळ व उद्योग सतत चालूं ठेवावयाचा; आणि (३) इंडियाशीं वागण्यांत इंग्लंडच्या हातून अन्यायाचें वर्तन होत असेल तें हळूहळू सुधरून उभय देशाचा संबंध दिवसेंदिवस दृढतर करण्यास झटावयाचे. हे तीन प्रकारचे उद्देश सर्वमान्य होण्यास कांहीं एक प्रत्यवाय नाहीं.

ह्या अवाढव्य राज्यांतील सर्व भागांतील विद्वान अग्रेसर गृहस्थ एकत्र जमावें व त्यांची परस्पर चांगली ओळख व्हावी, दरवर्षीं एके ठिकाणीं मिळण्याचा प्रसंग यावा आणि इंडियाच्या राजकीय उन्नतीसाठीं अहर्निश कळकळीनें झटणाऱ्या मोठमोठ्या गृहस्थांच्या समक्ष भेटी व्हाव्या व त्या पासून त्यांचा संबंध अधिकाधिक जुळत जावा, एकमेकांचे मनोगत व विचार आपसाआपसांत कळावे व चुकीच्या समजुती दुरस्त व्हाव्या, ठिकठिकोणच्या लोकांमधील मत्सर नाहींसा करावा, धर्मवेड नष्ट व्हावें, सार्वजनिक कामाकडे लोकांचीं मनें वळवावीं लोकहितासाठीं स्वार्थ बाजूला ठेवण्याची बुद्धी व्हावी, राजकीय विषया संबंधानें लोकांस शिक्षण मिळावें, सामाजिक इतिहास लोकांस समजावें, इंग्लंडच्या राज्यापासून होणारे फायदे लोकांस पुरतेपणीं कळावे लोकमताचे महत्व लोकांस समजावें; मत देण्याचा अधिकार असल्यापासून कोणता अधिकार लोकांस पोचतो, प्रजाधर्म कसा पाळावा, राजा व प्रजा यामध्यें एक अंतःकरण कसें होईल, त्यांचा संबंध बलावत जाऊन उभयपक्षीं सुखावह कसा होईल, ह्या गोष्टी लोकांस सांगाव्या. आपलीं दुःखें कळवून सोयीसोयीनें आपली दाद लावून घ्यावी, राज्यकारभारांत लोकांस वाटा मिळाव्या— ह्या व अशा अनेक गोष्टी राष्ट्रीय सभेला करावयाच्या आहेत. वर निर्दिष्ट केलेल्या हेतूवरून राष्ट्रीय सभेची लोकांस आवश्यकता स्पष्ट कळून येण्या सारखी आहे. सभेचे उद्देश पायाशुद्ध आहेत आणि त्यांत दोष नाहींत तेव्हां कांहींजणाचे भलते ग्रह झाले आहेत ते केवळ भ्रांतिमूलक आहेत हें निराळें सांगण्यांत कांहीं विशेष नाहीं.

(पुढें चालूं)

## लोकशिक्षण आणि सरकार.

कांहीं दिवसांपूर्वीं सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर इंडिया यांच्या हुकुमावरून हिंदुस्थान सरकारनें हिंदुस्थानांतील लोक शिक्षणाच्या सांप्रतच्या अवस्थेचा एक रिपोर्ट तयार करण्याचें काम बंगालचे डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन यांस सांगितलें होतें. त्या प्रमाणें रिपोर्ट सदर साहेबांनीं निरनिराळ्या प्रांतांतील शाळांतून त्यांचे रिपोर्ट बोलावून तयार केला त्यावर हिंदुस्थान सरकारनें आपला एक ठराव नुकताच प्रसिद्ध केला आहे. या ठरावावरून हिंदुस्थानांत लोक शिक्षणाची सांप्रतची स्थिती कशी आहे व त्या संबंधानें सरकारचे उद्देश, कर्तव्यकर्म व जबाबदाऱ्यां काय आहेत हें चांगलें कळून येत आहे.

सदर रिपोर्टांत सरकारनें शिक्षणाच्या निरनिराळ्या शाखा संबंधानें आपले जे जे विचार प्रकट केले आहेत त्या सर्वांचाच उल्लेख येथें करितां येणार नाहीं सबब फक्त एक दोन मुद्द्या संबंधानें आह्मी येथें लिहितों. आरंभींच लोकशिक्षणाची जी स्थिती दर्शविली आहे तीवरून पहातां सर्व हिंदुस्थानांत एकंदर शाळा सध्यां १,२७,११६ आहेत व त्यांत एकंदर ३३,४३,५,४४ विद्यार्थी शिकत आहेत. सन १८८१ सालीं ह्याच संख्या अनुक्रमें ९४,८८७ व १४,५१,९८९ होत्या. शिक्षणाला खर्च सरकारनें ८५॥ लाख रुपये केला आहे, लोकल म्युनिसिपाल कमिट्यांनीं ४९ लाख केला आहे, व ११० ½ लाख लोकांचा खाजगींतून केला आहे. हा सर्व जमाखर्च वाचून तद्द्वारें दिसून येणारी विद्यावृद्धि व त्या कामाची लोकांची अभिरुचि पाहून कोणासही संतोष झाल्यावांचून रहाणार नाहीं. परंतु पुढें विद्या वृद्धीच्या कामीं सरकार जी आपली अनास्था दाखविण्याचें भय घालीत आहे तें पाहून मात्र अतिशय वाईट आहे. सरकार ह्मणतें "लोकशिक्षण संबंधानें सरकारचें जें कर्तव्यकर्म आहे तें खजिन्यांतील शिलकीला अनुसरून बजावण्यास सरकार कधीं मागें घेणार नाहीं तथापि या कामीं लोक जर खटपट करीत आहेत तर त्यांच्या प्रत्येकाच्या आड येण्याचें सरकार कधीं मनावर घेणार नाहीं. सरकारचें काम फक्त रस्ता दाखवून देण्याचें आहे. आपल्या प्रजेला शिक्षण देण्याची लोकांस जर शक्ति आहे तर ती जबाबदारी सरकार आपल्या शिरावर कधीं घेणार नाहीं!" यावरून कुणीकडून तरी शाळा खात्या संबंधानें खर्च होईल तितका कमी करावा असें सरकारचें मत दिसतें. हा सरकारचा उद्देश पुष्कळ दिवसां पासून आह्मास कळून आला आहे व त्या वेळीं आह्मांस जें काय लिहावयाचें तें आह्मीं लिहून ही चुकलों आहों. सरकारचें काम आह्मांस वाट दाखवायाची आहे ती वाट शेवटास नेईपर्यंत दाखविणें झालें कां? शिक्षणा सारखीं महत्वाचीं व जबाबदारीचीं कामें आपल्या अंगावर घेऊन तीं योग्य रीतीनें व सुरळीत पणें चालविण्याची शक्ति आज आमच्या पैकीं कित्येकांस आहे? पुणें, कलकत्ता इत्यादि ठिकाणीं खासगी रीतीनें चालणाऱ्या एक दोन शाळांची स्थिती चांगल्या रीतीनें नजरेस आली ह्मणजे तेवढ्या वरूनच आमच्या लोकांत हें काम करण्याची शक्ति आली कां? या संबंधानें जेवढें लिहावें तेवढें थोडें आहे. प्रजेला शिक्षण देणें हें सरकारचें पहिलें काम व हें काम सुधारलेल्या देशाचे राज्याधिकारी अगोदर बजावीत असतात. वास्तविक पहातां सरकारच्या पिनल कोडच्या योगानें जें काम होत नाहीं तें शिक्षणाच्या योगानें होत आहे असें असतां आमच्या सरकारची या कामीं इतकी अनास्था दिसून यावी हें आमचें मोठेंच दुर्भाग्य समजावयाचें.

निरनिराळ्या जातीला शिक्षण देऊन सरकार दरबारांत जो नोकरी संबंधानें त्याचें हक्क पहाणें, शिक्षक व परीक्षक हीं दोन खातीं स्वतंत्र ठेवणें, परीक्षकांच्या जागीं एतद्देशीय लोकांची होईल तितकी योजना करणें इत्यादि संबंधाचे विचार सरकारनें जे दाखविले आहेत ते योग्य आहेत.

धंदे व कला यांच्या शिक्षणा संबंधानें सरकारनें जरी कांहीं महत्वाच्या व चांगल्या सूचना केल्या आहेत तरी जेथें पैशाचा संबंध आहे तेथें उडवा उडवच केली आहे. प्रत्येक प्रांताच्या स्थानिक सरकारनें त्या त्या प्रांतांतील निरनिराळ्या धंद्यांतील प्रवीण गृहस्थांच्या कमिट्या नेमून त्या त्या प्रांतीं या शिक्षणा करितां काय काय तजविजी कराव्या हें सुचवावें, रेलवेचे कारखाने वगैरे ठिकाणीं धंदे शिक्षणाच्या शाळा असाव्या वगैरे सूचना योग्य आहेत. परंतु या सर्व गोष्टी करितां आमचें सरकार आज काय करण्यास तयार आहे, पैसा किती देईल इत्यादि मुद्याच्या गोष्टी मोघमच आहेत.

या शिवाय नीती शिक्षण वगैरे महत्वाच्या विषया संबंधानें ह्या सदर्हू ठरावांत उल्लेख केलेले आहेत. त्या सर्वांचा विचार आजच करितां येत नाहीं या साठीं त्याकडे पुनः कधीं तरी पाहूं.

The Berar Samachar

MONDAY AUGUST 6, 1888.

## GOVERNMENT RESOLUTION ON SANITATION.

This important Resolution we mean to publish *in extenso* and we reserve our remarks on the same to be given in our subsequent issues:—

The Government Resolution, in the Home Department, on Sanitation in India, observes that the main obstacles, which have hitherto impeded sanitary improvement in India, lay in the ignorance of the masses and their dislike to any change of custom, in the want of efficient executive agencies, and last, though not least, in the want of funds. Upon the first of these obstacles, the Governor-General in Council does not, on the present occasion, desire to dwell. It, indeed, still constitutes a formidable difficulty upon which, in rural areas at all events, little sensible impression has yet been made, and its existence renders it necessary still to observe great caution in the instroduction of sanitary reforms, but with the rapidly advancing tide of popular education, the perception of the beneficent intentions of Government comes home more clearly to the people than it did; and there is less danger than there was that the measures taken for the improvement of the health of the people and the prevention of disease should be misconstrued, as arbitrary interference with time-honoured practices. Some years ago it was generally and correctly felt by the local Governments and administrations that authoritatively to press the subject of sanitary improvement, especially in villages, would be of little avail, and that persuasion, not coercion, was the right plan to follow. It is no less generally felt today that the more forward though still cautious and tentative policy would now be opportune. In considering, therefore, the measures most calculated to promote the cause of sanitary reform in India attention should, in the first place, be directed to the question of executive agencies and to the question of funds. Taking the question of executive agency first, it has to be regarded in its relation to urban and to rural areas. In relation to urban areas, the Governor-General in Council is glad to think that the question now presents far less difficulty than it did. The Municipal Acts, which formerly adopted to an early stage of civic development, have now been cast in an ampler mould. Those now in force confer large discretion and authority to pass rules and bye-laws for sanitary purposes, and impose upon Municipal Committees the duty, as far as funds at their disposal will permit, of providing among other things for sanitation of towns. Municipal Boards can, therefore, both entertain the requisite agency for carrying out the law and raise the necessary funds. In rural areas the case is different, but here, also, great improvements have been effected by the District and Local Board's Acts. These Acts require Boards to undertake, among other things, local works and measures likely to promote the health of the public within the area subject to their authority, and empower them to entertain establishments for that purpose. In some instances, also, laws for creating these bodies confer upon them limited powers of taxation, but when this is not the case, or when it may be inexpedient to resort to taxation or the powers may be insufficient to meet the ex-

enditure necessary for sanitary or other improvements, it is always open to Boards, with the sanction of the local Government to have recourse to loans under Act II of 1870. With a view to assist Municipalities and local Boards, it appears to the Government of India to be eminently desirable that there should be established in each province a sanitary board, through which the local Government can operate, and to which, subject in all respects to orders of the local Government, shall be entrusted the control and supervision over sanitary works, whether undertaken in urban or rural areas. It was one of the recommendations of Lord Stanley's Commission that a Commission of Health should be appointed to the seat of each local Government, with purely consultative functions, to advise on all questions relating to sanitation. Something more than a consultative body is, in the opinion of his Excellency in Council now required, and sanitary boards, which he wishes to create, should, therefore, from the outset receive recognition, not only as a consultative body, but also as an executive agency, through which the Government acts, in the sanitary department. These sanitary boards might be composed of an officer of approved administrative experience, sanitary commissioner for the province, and an officer of the Public Works Department skilled in sanitary engineering. With these three officers might be associated one or more non-official members appointed by the local Government. Every commissioner of division in Notthern India and Bombay, and possibly district Collectors in Madras, might also be exofficio members of the board, when dealing with questions connected with their divisions or districts. In the orders issued by the Home Department on Municipal and local board reports for 1885-86, the Governor-General in Council took the opportunity of laying down general lines on which, in his opinion, the future action of local bodies should be directed in promoting sanitary reform. The principle which he had in view was that action should be preceded by an accurate ascertainment of the requirements of each locality. Accordingly, it was suggested to the various local Governments that a sanitary survey of each Municipality and rural area should be undertaken with as little delay as possible, and that plans and estimates should be prepared of all improvements necessary to provide each town or village with an efficient system of water-supply, drainage, and conservancy. The most important of these requirements, and that which in the opinion of the Government of India may at first be dealt with most effectively and with the greatest chance of the active assistance and sympathy of the people, is the provision of pure water and drainage, especially in those localities in which the construction of public works, such as railway, and canal embankments, have interfered with the natural flow of water, and may have injuriously affected people's health. This is also a matter calling for early attention, but while thus indicating the directions in which sanitation can be best promoted, there is on the part of the Governor General in Council no desire to limit the discretion of local and provincial authorities as to their choice of action. That can best be determined by a knowledge of local requirements. Passing from the organization of a Sanitary Department to the important question of the provision of funds, it is, in the first place, to be observed that the various Municipal Acts enable the corporate bodies created by these Acts to raise by local taxation funds necessary for local expenditure. Similiar power is conferred on local boards by the Madras, Bengal and the Punjab Local Boards Acts, but apparently not elsewhere. It will be for the consideration of the Governments of Bombay and the North Western Provinces and Oudh which possess Legislative Councils, whether legislation should be undertaken with a view to confer powers of taxation upon local boards in those Provinces. Mean while it is incumbent on the Governments of the Provinces in question to place Local Boards in possession of funds sufficient to meet the reasonable requirements of local sanitation, but though sufficient money to meet current expenditure may be provided in these ways, it will probably be necessary to raise additional funds for the execution of new or large works. It is, indeed, probable that local income may be increased without any hardship to tax payers in certain provinces. Some productive methods of Municipal taxation have not yet been turned to account, but even when all current revenue is taken into account, it may, and doubtless often will be found necessary to have recourse to loans under Act 11 1879, or to appeals to provincial or imperial Governments for grants in aid for local resources. With reference to loans, the Govrnor General in Council desires to say that as long as borrowed money is not spent on the ordinary current operations of Municipal or Local Boards as long as it is spent on works of lasting utility, there can, as a matter of principal, be no objection to imposing on rate payers of furture years, obligation to subscribe. The Local Authorities Loan Act II of 1879 affords certain facilities for borrowing by public bodies, but the rates of interest at which these bodies can raise loans in the open market are often so high as to be practically prohibitive. The Governor-General in Council has, therefore, taken the subject of loans to local bodies into his careful consideration, being satisfied that no policy of sanitary reform in India can be successful unless facilities are provided for local bodies to raise funds for sanitary improvements on less onerous terms than they at present can do. The Government of India has not yet come to a final conclusion on this important subject, but it is not indisposed to think that when expensive works of the kind in question have received the previous approval of Government, and when sufficient control over local finances has been reserved to ensure fulfilment of the conditions on which the raising of the loan is sanctioned, it might be expedient to an horize local Governments, subject to certain prescribed limitations and conditions, to raise and establish a provincial loan fund and make its own bargains with local bodies in regard to the advances necessary for sanitary improvements and other works of lasting utility. The question is one of general policy which demands careful consideration, but a decision upon it will not now be long delayed. With reference to the subject of contributions from provincial funds for sanitary works of utility, his Excellency in Council has observed its satisfaction that willingness has already been exhibited to contribute from provincial resources in aid of sanitary improvements, both in urban and rural areas, where the ability of local bodies to raise loans is undeveloped and their credit is not established. The Government of India approves of such contributions, and would like to see regular provision made for them in provincial budgets. When this can be done with just regard to other demands on local Governments in some cases, such, for instance, as obstructed drainage, incidentally referred to above at resulting from Great Public Works contributions, it would be obviously appropriate; but if contributions are to take a definite place in the plan of provincial finance, his Excellency in Council would be glad to see them systematised on the grant-in-aid principle which has been found so effective in promoting education, care being taken to so regulate the distribution of grants as to minimise the evils inherent in the grant in-aid system of weakening local responsibility and fostering extravagance in expenditure. There may be exceptional cases, the requirements of which cannot be met from local or provincial resources, or by loans. In such rare cases the Government of India will not refuse to consider applications from local Governments in the interests of sanitary improvements of more than local importance.

---

Mr. Cordery Resident of Hyderabad, retires from the service from the date of the expiration of his leave on the 13th instant.

---

## पांच

असेगांव ता० आकोट
ता० ३-८-८८

एक समाजाचा मेंबर असें लिहितो कीं:— गतवर्षी अकोल्यास समाजाकरितां जे गृहस्थ परक्या ठिकाणाहून आले होते त्यांपैकीं ज्यांची गांवांत उतरण्याची सोय होती त्याचे तर ठिकच होते परंतु ज्यांची नव्हती त्यांची फार गैरसोय झाली. शिमग्याचा महिना साधारण थंडीचाच असतो निदान रात्रीं तरी बरीच थंडी असतें.. परंतु अशा दिवसांत त्या अनोळखी गृहस्थांना नेटिव्ह क्लबमध्यें खालीं तट्ट्या व अंगावर एक उपरणें अशा थाटानें दोन दिवस रात्रीं कुडकुडत पडावे लागले. व अशा रीतीच्या दुसऱ्याही काहीं गैरसोयी झाल्या प्रेसिडेंट खापर्डे यांच्याही लक्षांत आल्या व त्यांनीं "सोन्याचे दरवाजे व्हावे व आह्मास ठसाठस लागावें" या ह्मणीचा उपयोग करून प्रसंग मारून नेला.

दुसरी सूचना हीच कीं जे लोक वर्गणी देतात त्यांनां आपल्या पैशाचा कसा काय खर्च झाला तो समजला पाहिजे. वगैरे सिद्धीस जाण्याला अडथळा होतो हें मनांत आणून इकडे दुर्लक्ष न करितां आमलांत आणतील अशी उमेद आहे.

---

## वऱ्हाड.

हवामान— हवेंत अद्याप ह्मणण्यासारखा गारवा नाहीं. पाऊस मधून मधून उघाडी देत असतो.

मे. कर्नल मेकेंझी सा. आफि. जुडिशियल कमिशनर यांस मे. कर्नल जी. एच ट्रेव्हर तीन महोन्याचे रजेवर जातात त्यांच्या जागीं सेकंड क्लास रेसिडेंट व अजमीरचें कमिशनर नेमले व त्याप्रमाणें ते तिकडे लवकरच जाणार.

मे. कर्नल बुलक सी. उमरावतीचें डे. क. यास जु० क० व त्यांचे जागी उमरावतीस आमचे येथील डे० क० मि. इलीयट साहेब व त्यांचे जागीं येथें मि. आबर्ट सा. व त्यांचे जागीं इलिचपुरास क्यापटन मारिस यास डे० क० नेमले असें ह्मणतात.

हैद्राबादचे रेसिडेंट मि. कार्डरी साहेब यांनीं गेल्या महिन्यांचे १३ तारखेपासून पेनशन घेतलें. त्यांच्या जागीं सरलिपेल ग्रिफिन यांस नेमणार असें ह्मणतात दुर्दैव वऱ्हाडचे व हैद्राबाद दरबारचे कीं मि. हावेल साहेब कायम होत [illegible]

मि. [illegible]० यांचे प्रत्येक गोष्टींत फार बारकाईचें लक्ष्य असे. त्यांनीं या प्रांतांत कामिशनर असतांना १८८१ सालांत एक सरक्युलर केलें होतें कीं इंग्रजी आफिसांतील क्लार्क मराठी आफिसांत बदलूं नये व मराठी आफिसांतील क्लार्क इंग्रजी आफिसांत बदलू नये. हें सरक्युलर तसेंच अमलांत राहूं देण्याची जरूर आहे कीं काय या संबंधानें सर्व डे. क. चीं मतें घेऊन मे. कमिशनर सा. यांनीं असें ठरविलें कीं तें सरक्युलर तसेंच अमलांत असवे मात्र अतिशय योग्य दिसतील त्या लोकांच्या जरूर असल्यास-बदल्या व्हाव्या पण त्यास आमची मंजुरात असावी.

उमरावतीस एका रजपुताच्या बाईनें एका रोहिल्याचा खून केला असें कळतें. हकीकत एवढीच कळतें कीं तो तिला आडवू लागला व आतां आपणास हा भ्रष्ट करणार असें पाहून त्वेषानें तिनें त्याच्या कंबरेचा जंबिया हिसकून घेऊन तोच त्याच्या पोटांत खुपसला.

हैद्राबादचे दिवाण सर अस्मानजहा हे हल्लीं सिमल्यास आहेत. ते तेथून ता. ९ आगष्ट रोजीं हैदराबादेस जाण्यासाठीं निघतील सोमवारीं (परवां) त्यांची व्हाइसरायांची भेट होणार होती. अलाहाबादचा ता. २९ जुलैचा तार.

निजामहैद्राबादेस अमेरिकन डाक्तरीण मिस्स आलिस कांडिक्ट एम् डी. या नांवाची एक तरुण डाक्तरीण न्युयार्क येथून आली आहे. ती युरोपियन व मुसल्मान स्त्रियांनां औषधोपचार करीत असते. हल्लीं ती नवाब अमीरइ-कबरखार्शीडजहा बहादुर यांच्या जनान खान्यांतील स्त्रियांचे तैनातीस नवाबसाहेबांनीं ठेविली आहे व तिचा मुक्काम त्यांच्याच वाड्यांत आहे. या डाक्तरणीचा धंदा हैद्राबादेस फार चांगला चालेल असें ह्मणतात.

---

मागाहून आलेली नोटीस.

रा० रा० खुशालचंद दुलिचंद साहू दुकान तालुके जळगांव जिल्हे आकोलें यांसः—

याशी खालीं सही करणार यांजकडून.

नोटीस देण्यांत येतें कीं तुमची नोटीस तारीख २० माहे जुलई सन १८८८ इसवी. रोजीं पावली. नोटीसींत मजकूर लिहिला तो समजला. त्याजवरून आपणास कळवितो कीं, मी मुळींच तुमचे दुकानीं येऊन कधीं ही घेनदेन केलें नाहीं. व हिशेबावर सही केली नाहीं, व दस्तऐवजही कधीं लिहून दिला नाहीं. तुह्मी विनाकारण मजला नोटीस दिली त्यास तुमचे हें सर्व लिहिणें व्यर्थ आहे. माझें खातें मुळीं पासून राजश्री दीनानाथ गोपाळ जळगांवकर यांचे शिवाय दुसरें ठिकाणीं मुळींच नाहीं. याज बदलची दगेबाजी तुमचे मुनीम बाळकृष्ण अनंत याची आहे तुह्मी त्यास विचारून घेणें कळावें तारीख ४ माहे जुलई सन १८८८ इसवी.

(सही.)
१ हरी वल्लद मेसाजी दाते
माळी वस्ती मौजे रुदान
तालुके जळगांव
निशानी खुद

---

## वर्तमानसार.

रवाडांत चोहोंकडे हलीं पाण्याचा मोठा ड पडल्यामुळें हाहाकार उडाला असा दुष्काळ अलिकडे पांच पन्नास पडला नव्हता. असें ह्मणतात.

बई येथें एक बुवा २ विधवा घेऊन आहे. तो दोन विधवा घेऊन संगीत सांगत असतो. बुवा व विधवा यांचा न मधुर असून भर समाजांत चांगला ाव करतात. यामुळें तेथील युवयुवती त्यांच्या बराच नांदी लागला आहे- मुंबईचा एक बातमीदार शिवाजीस क- तो.

चष्मे उतरले— नुकतेच निजामसरकार- दरबारांत कित्येक तरुण उमरावांनीं ास चष्मे लावून येणें केलें होतें; पण करण्यांत निजाम साहेबांचा अपमान ; ह्मणून सर्वांचे चष्मे काढून टाक- त आले.

गिरण्यांचा कायदा— सर्व गिरण्या रवि- ी बंद असाव्यात; पुरुष बायका व ( १० वर्षां पासून १५ वर्षांपर्यंत ) ा अनुक्रमें १२, ९ आणि ६ तास रो- ं काम पहावें मध्यें विश्रांति करितां एक त सुटी असावी. १० वर्षांच्या वया ख- मजूर लावूं नये. दहा पासून पंधरा ांपर्यंत निळणाऱ्या मजुराला थोडेसें शिक्षण ळाल्याचा दाखला असल्या शिवाय ठेवूं ; असें टाइम्स आफ इंडियांत लिहिलें हे.

डा० बाल ह्मणतात कीं, जेथें सर्पदंश ला असेल त्या ठिकाणीं रबरीपट्टा आंव- न बांधला ह्मणजे विष शोषलें जाऊन म- ग्य ब्वकर सावध होतो.

पार्लमेंटी सभासदांचें वेतन— फ्रांसदेशांत येक सभासदाला दररोज ९५ फ्रांक मि- ळतात. बेलजममध्यें सभा बसलेली असेल के महिने दरमहा ४२० फ्रांक प्रमाणें त्येकाला पगार मिळतो. डेन्मार्क देशांत ८ फ्रांक व ५० सेंट प्रत्येकाला दररोज मेळतात. पोर्तुगालमध्यें प्रत्येकाला सालिना १७१५ फ्रांक मिळतात. स्विडनमध्यें फक्त ार महिने सभा बसते, व तितक्याबद्दल त्येक सभासदाला १६७२ फ्रांक देण्यांत येतात. पण सभासद जर गैर हजर असेल तर त्याला १३ फ्रांक व ७५ सेंट दररोज दंड होतो. स्वित्झर्लंडांत प्रत्येकाला १२ फ्रांक व ५० सेंट दररोज मिळतात. इटली मध्यें सभासदाला वेतन नाहीं. परंतु आग- गाडींतून फुकट जाण्या येण्याच्या हक्का ब- रोबर आणखी कांहीं हक्क असतात. स्पेनमध्यें वेतन नाहीं, पण बरेंच हक्क असतात. ग्री- समध्यें वरिष्ट सभेच्या सभासदास ५०० फ्रांक दरमहा मिळून कनिष्ट सभेच्याला २५० फ्रांक मिळतात. जर्मनीमध्यें प्रत्येका- ला जवळ जवळ ११ फ्रांक पडतात. अस्ट्रि- यामध्यें दररोज २५ फ्रांक मिळतात. इं- ग्लंडांत सभासदाला पगार नाहीं. अमेरिकेंत युनायटेड स्टेटसमध्यें प्रत्येकाला ५५०० फ्रांक वर्षाचे मिळतात, व दर मैलास एक फ्रांक वाटखर्चीस मिळतो. १ फ्रांक=९ आणे व ८ पै. १ फ्रांक—१०० सेंट.

क० त०

रा० सा० विश्वनाथ नारायण मंडलीक यांणीं मानव धर्मशास्त्राचा जो ग्रंथ केला आहे तो पाहून बुंदीच्या महाराजांनीं त्यांस एक बहुमोल पोषाग बक्षीस दिला. हे महाराज चांगलें संस्कृत जाणणारे आ- हेत.

कापसाच्या काटक्यांचे कागद=ज्या देशां- त कापूस पुष्कळ पिकतो. कापूस काढून घे- तल्यावर कापसाच्या काटक्या लोक जा- ळतात. अमेरिकेंत ही ह्या काटक्या आ- जपर्यंत जाळींत असत. तेथें एक टन ह्मणजे आजमासें ३ खंडी काटक्यांस ४ डालर ह्म- णजे ८ रुपये किंमत येत असे. पण कित्येक वेळ अनुभव घेतल्या वरून त्या काटक्यांचे व सरक्यांचे फारच नामी कागद होतात असे ठरलें आहे. सर्पण्या करितां ज्या एक टन काटक्यांची ४ डालर किंमत येत असे. तितक्यांचे कागद केले तर ४० डालर किंमत येते असें सायंटीफिक अमेरिकनवरून समजतें. कापसाच्या काटक्या इकडे फार सस्त्या मिळतील सबब डेक्कन पेपर मिल कंपनीच्या व्यवस्थापकांनीं याचा अनुभव पहावा.

ढगांची उंची— विद्युत्प्रकाशाच्या सा- ह्यानें ढगांची उंची मोजण्याचे कित्येक प्र- योग अमेरिकेंतील शास्त्रज्ञांनीं केले व ते बऱ्याच अंशानीं सिद्धही झाले आहेत असें ह्मणतात. त्या प्रयोगां वरून अति जवळ- च्या ढगांची उंची ७७० फूट व अति दू- रच्या ढगांची लांबी १७५८० फूट आहे असें दिसलें.

शु० सू०

लार्ड लान्सडौन हे हिंदुस्थानास येण्या करितां ता. ८ नोवेंबर रोजीं लंडन मधून निघतील व लार्ड डफरीन हे डिसेंबरच्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या आठवड्यांत परत स्वदेशीं जाणार.

बडोद्याचे सयाजीराव गाईकवाड यांस वेड लागल्याचीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत असें कांहीं इंग्रजी वर्तमानपत्रांचें ह्मणणं आहे असें काठेवाड टाइम्सकर्ते ह्मणतात!!

हिंदुस्थानच्या उत्पन्ना पैकीं सरासरी २८ कोटी रुपये विलायतेंत खर्च होतात याची सरकारनें चवकशी करावी असें कांहीं इंग्लिश वर्तमानपत्रांचें ह्मणणें आहे.

डेक्कन मायनिंग कंपनीच्या चौकशी संबं- धानें रिपोर्ट तयार झाला आहे त्यांत इंडिया कौन्सिलच्या सभासदां संबंधानें मुळींच उल्ले- ख केला नाहीं. यावरून मि. स्लाग हे नि- राळा रिपोर्ट तयार करताहेत. त्यांत कांहीं मोठ्या युरोपिअन अंमलदारांना दोष देण्याचा त्यांचा विचार आहे.

पुण्याच्या प्रदर्शनाकरितां श्रीमंत सया- याजी राव गाईकवाड यांनीं ३०० रु. दिले; श्रीमंत बाळासाहेब, होळकर यांनीं ५०० रु; कोल्हापुरचे महाराज यांनीं १५० दिले व वढवाणच्या ठाकूर साहेबांनीं ७०० रु. दिले. असें समजतें.

एतद्देशीय राजेलोक आताशा आपले दे- श सोडून चैनी साठीं गांवोगांव पैसा उधळत हिंडतात हें बरोबर नाहीं असें सिविल आणि मिलिटरी ग्याझेटकर्ते ह्मणतात व सरकारांनीं असें होऊं न देण्या विषयीं खबरदारी ठेवावी अशी त्यांची सूचना आहे!!

अफगाणिस्थानांत बंडें उत्पन्न होण्याचीं चिन्हें फार दिसत आहेत असें समजतें.

सु. प.

हिंदुस्थानच्या उद्योगाची व ज्ञानांचा भ- रभराट होत आहे त्यावरून फौजेशिवायच हिंदुस्थान इंग्रजी अंमलाखीं सुखानें नांदण्यास तयार आहे असे दिसते; सरहद्दीवर फौज व पैसे देण्यास सुखानें तयार झाले यावरून संस्थानिकांस आपलें स्वातंत्र्य नष्ट झालें नाहीं. असें वाटत आहे. एकंदरीनें हिंदुस्था- नावर राज्य करणें तें हल्लींची वेळ पाहून केलें पाहिजे आणि तें राज्य वृद्धिंगत हो- ण्यास नेटिवांचा कळवळा बाळगला पाहिजे असें नवीन येणारे गव्हरनरजनरल लार्ड ला- न्सडाऊन एके ठिकाणीं ह्मणालें.

हैद्राबाद कांटिन्जंट फौजेंत आफिसर फार थोडे आहेत व वेळ आल्यास ते पुरेसे नाहींत असें वाटल्या वरून प्रत्येक रेजिमें- टांत एक एक आफिसर जास्त वाढविण्याचें सरकारानें ठरविलें आहे.

ठा. अ.

सगळी इमारतच्या इमारत ओढून नेली कोनी बेटामध्यें ब्रायटन बीच हाटेल या नां- वाचे एक हाटेल आहे. या इमारतीची लांबी ४६० फूट आणि रुंदी११०फूट आहे.ह्मणजे या इमारतीस एकंदर दीड एकर जागा लाग- ली आहे, त्यामुळें त्याला फार भीति होती. यास्तव त्याच्या मालकाच्या मनांत सदर्हू इमारत समुद्रापासून बरीच लांब ओढून न्यावयाची होती तेव्हां सदरहु इमारत ति- च्या जाग्या पासून सुमारें सहाशे फूट लांब ओढून नेण्याचें ठरलें. नंतर सदर इमारती- च्या पायाखालची जमीन खोदण्यास आरंभ झाला, व इमारती खालीं मोठाली तुळवटें बसविण्यांत आलीं. या तुळवटाखालीं सपाट लोखंडी तक्त्यांच्या पृष्ठभागाच्या ११२ अजस्र गाड्या उभ्या केल्या. या गाड्या क- रितां जेथें सदर्हू इमारत ओढून न्यावयाची होती तेथपर्यंत रूळ टाकिलें होते; नंतर सर्व इमारतीच्या भोंवतीं दोरखंडें बांधून स- दर इमारत ओढण्यास सहा एंजिनें लाविलीं सर्व तयारी झाल्या बरोबर एंजिनें चालूं क- रण्याची खूण झाली. नंतर तीं सहा एंजिनें पाठीवरील पांच हजार टनाच्या ओझ्यासह भप्भप् करीत निघालीं. ही एवढी थोरली प्रचंड इमारत हालूं लागली! व थोड्याच वे- ळात ती सहाशें फुटावरील आपल्या निर्भय जागेवर जाऊन स्थिर झाली! या गृहवाह- नाच्या संस्कारास एकंदर १,२५००० रुपये खर्च झाला.

न्या० सिं०

---

## जाहिरात.

पुणें "ज्ञानचक्षु" छापखान्यांत विक्रीस तयार असलेल्या पुस्तकांची यादी.

| मराठी आक्ट. | किंमत | ट. ह. |
|---|---|---|
| क्रिमिनल प्रोसिजर सटिक | ५ | ०८ |
| सिव्हिल प्रोसिजर सटीक | ५ | ०८ |
| पिनलकोड सटीक........ | ७ | ०८ |
| न्यायरत्न............ | २ ०८ | ०२ |
| रेव्हिन्यु कोड.............. | ०८ | ०१ |
| सदरची रुळी................ | ०८ | ०१ |
| स्टांप आक्ट.............. | ०६ | ०१ |
| कोर्ट फी आक्ट........ | ०६ | ०१ |
| कराराचा आक्ट........ | ०१३ | ०२ |
| पुराव्याचा आक्ट......... | ०८ | ०१ |
| रजिस्टर आक्ट........ | ०६ | ०१ |
| मुदतीचा आक्ट....... | ०६ | ०१ |
| आबकारी आक्ट......... | ०७ | ०१ |
| जंमलसंबंधीं आक्ट......... | ०८ | ०१ |
| विशेष न्यायाचा आक्ट..... | ०८ | ०१ |
| वतनदार आक्ट................ | ०६ | ०१ |
| लोकलबोर्ड आक्ट........ | ०६ | ०१ |
| मनोरंजक पुस्तकें. | किंमत | ट. ह. |
| श्री भावार्थरामायण.... | २० | २ |
| विचित्रपुरी............... | १ | ०२ |
| मदनमंजरी ............ | २ | ०२ |
| कामकंदला नाटक.... | १ | ०२ |
| उपयुक्त चमत्कार सं. भा. १ ते१० दर भागास किं दहाही भा.घेत.ट.ह्म.माफ. | ०५ | ०१ |
| अलखमेपलख पलखमे दर्यावे | ०४ | ०१ |
| सतारीचें १लें पुस्तक.... | १०४ | ०२ |
| संगीत राधाविलास नाटक | ०६ | ०१ |
| मदनजन्म नाटक....... | ०१२ | ०२ |
| चमत्कारचिंतामणि .... | ०१३ | ०२ |
| मल्लविद्याप्रकाश.............. | १ | ०२ |
| ऋणसंहार.................. | ०४ | ०१ |
| मराठी ह्मणी............. | ०७ | ०१ |
| गोपीचंद नाटक ( हीं. ) . | ०१२ | ०२ |
| मराठी रवुसर्ग दर म. | ०१० | ०१ |

भाऊ गोविंद सापकर, ज्ञानचक्षुचे मालक.

---

## अवश्य पहा.

## गजकर्णावर रामबाण औषध

वऱ्हाड व नागपूर ह्या दोन प्रांतांत हजारों लोकांस गुण येत आहे. गुणा बद्दल खात्री इतकीच कीं, गुण न आल्यास किंमत परत देऊं. गुणाबद्दल पुष्कळ सर्टिफिकिटें आहेत, त्यांपैकीं कांहीं बाटली बरोबर असलेल्या माहितीच्या कागदांत दिलीं आहेत. दर बाटलेची किंमत ०९ आणे.

## खरजेवर मलम.

गुलाबी मुळींच झोंबत नाहीं. पांच चार दिवस लावल्यानें खरूज, फोड, आगपैण हीं खात्रीनें बरीं होतात. किंमत दर डबीस ०८ आणे.

## हींव तापावर गोळ्या.

कितीही दिवसांनीं येणारें हींव असो सुमारें १० अगर १२ गोळ्यांनीं बंद होतें. दर बाटलीची किंमत १२ आणे.

सूचनाः—ही सर्व औषधें अनुभवलेली आहेत सबब रोग्यांस अशी विनंती आहे कीं गरज पडेल तेव्हां ह्या औषधांचा अवश्य उपयोग करून पहावा. प्रत्येक औषधास बंगी खर्च ०१ आणा. बंगी नाटपेड माहितीचा कागद बरोबर. हीं सर्व औषधें वऱ्हाडांत अकोलें येथें आमचे दवाखान्यांत रोख पैशानें अगर व्ही. पे. नें मिळतील. कळावें.

नारायण चिंतामण डाक्तर.

---

☞ हें पत्र आकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

साल अखेर । ७ ११ - १०८
किरकोळ अंकास.... ........... ०४

नोटीशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस.... ...०१

Six monthly............3 " 8 as
Single copy.................................4 as

Advertisements.
Below 10 lines...2 Rs
Per line over 10...4as
Repetition perline3as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.

VOLXXII AKOLA MONDAY 13 AUGUEST 1888 NO. 32
वर्ष २२ अकोला सोमवार तारीख १३ माहे आगष्ट सन १८८८ इ० अंक ३२

## पत्रव्यवहार.

ह्या सदरा खालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

मुक्काम वाशीम ता. ८।४।८८

रा. रा. वऱ्हाड समाचार कर्ते यांसः—

कृ०नेक शीर साष्टांग नमस्कार वि० वि० राष्ट्रीय सभा वऱ्हाडांतील पुढारी लोकांनीं एक वेळ खटपट करून वऱ्हाडांत भरवावी व इतर प्रांतां प्रमाणें वऱ्हाडचे नाव गाजवावें. पूर्वींच वऱ्हाडचें नांव गाजलेलें आहे तरी सभा एक येथें भरविण्यानें कीर्तीच्या शिखरास चढून वऱ्हाडांतील कीर्तीस चढलेल्या लोकांची या मुळें द्विगुणीत होईल. आतां हें काम फार प्रयासाचें व खर्चिचें आहे खरें तरी पुढारी लोकांनीं मनावर घेतल्यास तडीस जाणार नाहीं असें सहसा होणार नाहीं या कामीं पुढारी अकोला व उमरावती येथील लोक जर कंबरा बांधतील तर खचीत यश संपादन करतील यांत संशय नाहीं. अकोलें व उमरावती येथें सार्वजनिक कामाची फार कृत्यें होतात. मागें वऱ्हाडांत १८६८ सालांत प्रदर्शन झालें. पुनः वर्षां पूर्वीं गुरांचें प्रदर्शन झालें. सभा व्याख्यानें होतात सर्व कांहीं होत आहे. करितां राष्ट्रीय सभा एक वेळ भरविण्याची योजना झाली तर वऱ्हाडवाशी जनांचा अनेक तऱ्हेनें फायदा होईल यांत संशय नाहीं. वऱ्हाड प्रांत सर्व गोष्टींनीं पूर्ण असल्यामुळें वर्गणी जमा होण्यास कांहीं वेळ लागेल असें नाहीं. वऱ्हाडांत २६०००००० मनुष्यें आहेत असें मागील खानेसुमारी वरून दिसतें यांत अगदीं कंगाल असे १०००००० दहा लाख लोक काढिले. बाकी सोळा लाख लोकांनीं प्रत्येकी एक एक आणा वर्गणी दिली तर किती उत्पन्न होईल हें दिसत आहे. आतां खेडेपाड्यांनीं अज्ञानांत गरक झालेले लोक फार त्यांस या सभे पासून फायदा लवकर दृष्टीगोचर होणार नाहीं. तरी त्यांस उपदेश करण्या करितां कमेट्या स्थापन केल्या पाहिजेत. वऱ्हाडांत तालुके ९२ आहेत. इतक्या ठिकाणीं तालुक्या करितां असें वर्गणी जमा करण्याचें काम करणाऱ्या कमेट्या असाव्या. प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणीं एक एक प्रमुख लोकांची सभा असावी. शिवाय मोठ्या मोठ्या गांवीं उपदेशक फिरून तेथें पोट सभा असाव्या. अशा उपायांनीं वर्गणी जमा करण्यास सुरुवात करावा. या सर्व कमेट्यावर हेड ( मुख्य ) सभा अकोले उमरावती येथें असावी. अशा प्रकारें राष्ट्रीय सभेकरितां एक मोठा फंड जमा करावा. त्या फंडांतून सभेकरितां खर्च करून बाकी राहील तिच्या व्याजांतून दरवर्षास जेथें जेथें राष्ट्रीय सभा भरेल तेथें तेथें लोकांच्या मार्फत सभेमध्यें भाषण करण्याकरितां विद्वान लोक खर्च देऊन पाठविण्याची तजवीज करीत जावी. असा एकंदर फंड जमा झाला कीं मग काय पाहिजे तीं कामें करितां येतील. आपले अकोलें येथील प्रमुख स्वतंत्र मंडळी ह्मणजे राव साहेब देवराव बाबा प्रभृती यांनीं व उमरावती येथील मि. मुधोळकर प्रभृती यांनीं ह्या गोष्टीकडे जरूर लक्ष दिल्यास सिद्धी जरी दूर आहे तरी श्रमांच्या योगानें ती नवळ येईल. हो कल्पना माझे बुद्धीनें जी मला सुचली ती आपले पत्रद्वारें पुढारी लोकां पुढें ठेविलीं आहे. तरी या गोष्टीचा अवश्य विचार होऊन मुळारंभींचा पाया ह्मणजे जिकडे स्वतंत्र लोकांचीं मनें वळवून पुष्कळ कमेट्या स्थापन करवाव्यात. उपदेश चालवून नंतर वर्गणी जमा करण्याचा विचार काढावा. कळावें हें विनंती.

पत्रकर्तेराव आपणाला हा विचार पसंत पडल्यास आपणही ह्या गोष्टीस उत्तेजन द्यावें. कळावें हें विनंती.

आपला प्रेमेच्छुचा बंधु
"क्ष"

---

वऱ्हाडसमाचार.

मिती श्रावण शुद्ध ६ शके १८१०.

## बरार रुरल बोरडस लॉ सन १८८५ यांतील कलम ३३ अन्वयें नियम.

( मागील अंकावरून पुढें चालूं. )

५८ बोरडास लॉ चें कलम २६ अन्वयें प्रसिद्ध करण्या करितां वार्षिक हिशोबाचा गोषवारा तयार करण्याचा तो जोडलेले जी. नमुन्या प्रमाणें असावा.

५९. एखाद्या तालुक बोर्डाच्या हद्दींत उत्पन्न झालेली रकम प्रायः त्याच हद्दींतील कारणा करितां खर्च केली पाहिजे परंतु पसंत केलेले बजेटांतील शर्ती प्रमाणें किंवा कमिशनरचे विशेष मंजुरातीनें त्याचा कांहीं भाग जिल्ह्यांतील साधारण कारणा करितां खर्च करितां येतो.

## साधारण नियम.

६०. जिल्हा बोरडानें आपले कामगर व नौकर योग्य प्रकारें वसूल जमा करितात व पैसा आदा करितात हें पहण्या करितां होऊं शकतील तितक्या सर्व तजविजी केल्या पाहिजेत. व ह्या बाबतींत आपण जी तजवीज केलेली असेल त्या संबंधानें जी माहिती लागेल ती सर्व कमिशनर यांस दिली पाहिजे. कमजास्त होणारे वसुलाचे बाबतींत प्रत्येक बाबतींतील हकीकती प्रमाणें वसूल ताडून पहाण्यास विशेष तजवीज केली पाहिजे.

६१. जिल्हा बोरडानें अगर तालुका बोरडानें केलेले करार प्रायः लेखी असले पाहिजेत व ते स्टांपाचा आक्ट व नोंदणीचा आक्ट यांस अनुसरून केलेले असले पाहिजेत.

लेखी करारांवर जिल्हा बोर्ड व तालुका बोर्ड यांचे वतीनें सेक्रेटरी व दोन सभासद यांनीं सह्या केल्या पाहिजेत.

स्थावर मिळकत दुसऱ्यास अक्षय अगर एक वर्षांहून अधीक मुदतीच्या भाडेचिठ्ठी वरून दिपुटी कमिशनर यांची लेखी मंजुरी पूर्वीं घेतल्या शिवाय देतां येणार नाहीं.

जी मिळकत अशी देणें आहे अगर भाडे चिठ्ठीवरून देणें तिची किंमत १००० रुपयांहून अधिक असेल तर ती मिळकत देण्यास अगर भाड्यानें देण्यास दिपुटी कमिशनर यांनीं परवानगी देण्यापूर्वीं कमिशनर यांची परवानगी घेतली पाहिजे.

६२. मंजूर झालेली व खर्च अकारलेलीं कामें योग्य प्रकारें तयार झालीं असे विषयीं खात्री करून घेण्या बद्दल यथायोग्य तजवीज करणें जिल्हा बोरडास भाग आहे.

६३. एखादे जिल्हा बोरडाचे सेक्रेटरी यांजकडे कमिशनर किंवा दिपुटी कमिशनर यांजकडून एखादे गोष्टी बदल लेखी सूचना आल्यास ती पुढील सभे समोर आणली जाऊन तिजविषयीं पूर्ण विचार केला जावा. व रीती प्रमाणें ठराव लिहिला जावा.

६४ जिल्हा बोरडाचे किंवा तालुक बोरडाचे प्रत्येक सभेचे प्रोसिडिंगाची नकल जिल्ह्याचे दिपुटी कमिशनर यांजकडे माहितीकरितां लागलीच पाठवावी. दिपुटी कमिशनर यांणी त्याची नकल कमिशनरकडे पाठवावी.

६५ आपले ताब्यांतील व अमलाखालील एखादे कारखान्याचे व्यवस्थेकरितां प्रत्येक जिल्हा बोरडानें वेळोवेळीं कोणते हो लोकांचे मग ते जिल्हा बोरडाचे मेंबर असोत अगर नसोत कमेट्या नेमाव्या. व असें प्रकारें नेमलेले कमेट्यांनीं जिल्हा बोरडाचे हुकमावरून त्या कारखान्याची व्यवस्था करावी. अशा कारखान्याचो हल्लीं व्यवस्था करणाऱ्या सर्व कमेट्या ह्या नियमा अन्वयें नेमल्या गेल्या आहेत असें समजलें जावें. अशा नेमलेल्या कमेट्या जिल्हा बोरडास वाटेल तों पर्यंत कामावर रहातील.

६६ जिल्हा बोरड किंवा तालुके बोरडाकडून सरकारी अधिकाऱ्याकडे जी विचारपूस होण्याची ती प्रायः दिपुटी कमिशनरचे मार्फत व्हावी.

६७ जिल्ह्याचे सिविल सरजन, डिव्हिजनचे एक्झीक्युटीव इंजनियर व त्या सरकलचे शाळा इन्स्पेक्टर यांस जिल्हा बोरडचे किंवा तालुके बोरडचे कोणतेही सभेंत येण्याचा व सफाई, पब्लिक वर्कस व सार्वजनिक विद्येचे संबंधानें अनुक्रमें कोणतेही गोष्टीबद्दल बोलण्याचा हक्क आहे.

६८ प्रत्येक जिल्हा बोरडानें व जिल्हा बोरडाचो आगाऊ मंजुरांत घेऊन प्रत्येक तालुके बोरडानें वेळोवेळीं रेसिडेंट साहेबांनीं ह्या कायद्या अन्वये नियम केले असतील त्यांस समर्पक असें पुढील गोष्टींसंबंधीं नियम करावे.

ए. आपले सभेची वेळ व जागा.

बी. सभेंत काम चालविण्याची रीत.

सी. बोरडाचे मेंबरांत कामाची वाटणी.

डी. ह्या कायद्या अन्वयें दिलेले पैशाबद्दल बोरडाचे वतीनें पावत्या कोणी देणें.

६९ ज्या जागेचा दरमहा पगार रुपये २० किंवा त्याहून अधिक आहे असें एखादे जागेवर बोरडानें नेमणूक केल्यास नेमलेले मनुष्याचे वय, कुळ, जात, रहाण्याचे ठिकाण व लायकी या संबंधानें व त्यास जो पगार ठरविला असेल त्या संबंधानें बोरडानें दिपुटी कामिशनर यांस पूर्ण तपशील लिहून कळवावा.

७० बोरडचा कोणताही नौकर ज्याचा दरमहा पगार २० रुपये किंवा त्याहून अधिक आहे त्यास दिपुटी कमिशनरचो पूर्वी मंजुरांत घेतल्या वांचून बरतर्फ केलें जाणार नाहीं अगर कमी पगारावर घातलें जाणार नाहीं.

७१ हल्लीं असलेली एखादी शाळा, दवाखाना, किंवा इतर कारखाना त्या खात्याचे मुख्याचे परवानगीवांचून जिल्ह्याचे बोरडानें कमी करूं नये. जर तो खात्याचा मुख्य हरकत करील तर बोरडांनीं तें प्रकर्ण कमिशनरकडे निकाला करितां पाठवावें.

७२ जीं साधारण मूळतत्वें सरकारानें आपल्या अमला खालील निरनिराळे खात्यांत पसंत केलीं असतील त्याच प्रमाणें वर्तणें जिल्हा बोरडास भाग आहे.

### हिशोब व हिशोबाची तपासणी.

### हिशोबाची पद्धत.

७३. एखादें जिल्हा बोर्ड नेमले गेल्यावर ज्या दिवशीं तें बोर्ड स्थापन झालें त्या दिवशीं कायद्याचें कलम २२ यांत खालीं सांगितलेल्या हरएक फंडाच्या शिल्लका सरकारी खजिन्यांत त्या बोरडाचें नांवें जमा केल्या जातील व त्याच वेळीं ती रकम बोरडाचे पास बुकांत दाखल केली जाईल.

७४. कलम ३९ यांत सांगितलेल्या पट्ट्यांचें निव्वळ उत्पन्न वर सांगितलेले रीती प्रमाणें दर वर्षास बोरडाचे नांवें जमा केलें जाईल.

७५. खालीं सांगितलेल्या पट्ट्या पैकीं कोणतीही पट्टी जिल्हा बोरडानें वसूल करूं

नये किंवा त्याबद्दल पैसा आदा करूं नये.

१. पट्या वसूल करणारे नौकर मंडळी बद्दल.

२. नागले लोकांबद्दल.

इनकारपोरेटेड लोकल फंडस्.

१. शेंकडा एक रुपया सडकपट्टी.

२. जागले व स्थानिक पट्टी.

३. एजुकेशन पट्टी ( शाळा पट्टी. )

एक्सक्ल्युडेड लोकल फंडस्.

टौन फंड—बसविलेले कर.

१. व्यापार व धंद्यावरील लायसन्स.

२. किरकोळ ( घोडे व गाड्या वगैरे वरील कर धरून. )

बाजारपट्टी—बसविलेले कर.

१. दुकानें व बाजार यावरील-कर.

२. किरकोळ.

( पुढें चालूं )

## अरोग्य रक्षण व त्याबद्दल हिंदुस्थान सरकारचा ठराव.

आजपर्यंत लार्ड डफरिन साहेबांच्या कारकीर्दीत बऱ्या वाईट कांहीं गो[ष्टी] झालेल्या असोत, जातां जातां आपली [का]रकीर्द ते बरीच प्रसिद्धीस आणीत आहेत असें ह्मणण्यास हरकत नाहीं. आमच्या [माग]च्या गेल्या अंकांत आम्हीं लोकशिक्षणा ब[द्द]लच्या हिंदुस्थान सरकारच्या ठरावा[ं]विषयीं लिहिलेंच आहे. आज त्या सारखाच दुसरा एक महत्वाचा ठराव आह्मी हा[तीं] घेत आहों. हिंदुस्थानांतील लोकांचें आरोग्य हा विषय बरेंच दिवसापासून सरकारच्या मनांत घोळत आहे व त्या संबंधानें अनेकवेळा बरेच उहापोह झालेले आहेत. याच संबंधानें लार्ड डफरिन साहेबांनीं नुकताच आपला एक ठराव प्रसिद्ध केला आहे तो खरोखर मोठा महत्वाचा असून सर्वांनीं वाचण्यासारखा आहे. हिंदुस्थानच्या बहुतेक भागांची स्थिति आरोग्यासंबंधानें असावी तशी नाहीं व ती सुधारण्याकारितां आजपर्यंत सरकारनें किंवा लोकांनीं योजावे तसे उपाय योजिले नाहींत ही गोष्ट कोणीही नाकबूल करणार नाहीं. अशा वेळीं लार्ड डफरिन साहेबांनीं आपल्या ठरावानें हा विषय पुढें आणीला हें त्यांचे आपल्यावर अनुग्रहच समजले पाहिजेत.

देशाच्या योग्य सुधारण्याकडे आजपर्यंत सरकारनें किंवा लोकांनीं द्यावें तसें लक्ष्य आजपर्यंत दिलें नाहीं हें जरी खरें आहे तरी त्याबद्दल त्यांस दोष देतां येत नाहीं ते सुधारण्यास मोठी अडचण लोकांचें अज्ञान ही होती. हिंदुस्थानांत अनेक जातींचे व अनेक धर्मींचे लोक रहातात त्या सर्वांच्या धर्मसंबंधाच्या मतांस अनुसरून अरोग्याचे नियम त्यांस घालून देणें मोठें कठीण काम आहे. आजपर्यंत हा विषय पुष्कळवेळां सरकारच्या मनांत आलेला आहे परंतु कोणतीही एखादी नवीन गोष्ट सुरु केली असतां ती या देशांतील लोकांस अनेक कारणामुळें रुचण्याची मोठी पंचाईत पडते. कधीं कधीं तर अशा प्रसंगीं सरकारचा हा आपल्यावर जुलूम आहे असें लोकांस वाटूं लागतें. यामुळें या विषया संबंधानें सरकारला ह्मणण्या सारख्या गोष्टी करितां आल्या नाहींत. परंतु सध्यां ही अडचण पुष्कळ कमी होत चालली आहे. शिक्षणाचा प्रसार पुष्कळ झाल्या कारणानें सरकारचे आपल्यावर कल्याण करण्याचे हेतु लोकांस चांगलें कळूं लागले आहेत. अरोग्यासंबंधानें सरकारनें कांहीं हुकूम केलें ह्मणजे वाडवाडिलापासून चालत आलेल्या चालींच्या विरुद्ध ते आहेत असें पूर्वी लोकांस वाटत असे तसें आतां वाटत नाहीं. या कारणा मुळें लोकांचें अज्ञान ही अडचण सांप्रतच्या ठरावांत सरकारनें फारशी मनांत आणिली नाहीं.

वर जी मोठी अडचण सांगितली त्या शिवाय दुसऱ्या दोन अडचणी अरोग्याला बाधक आहेत, व सध्यांच्या ठरावांत सरकारनें मुख्यत्वेंकरून त्याचाच विचार केला आहे. या अडचणी पैकीं पहिली अडचण लोकांच्या आरोग्य संबंधानें विचार करून त्याला साधक अशा गोष्टि उपयोगांत आणण्या करितां योग्य कामगार नाहींत ही आहे. दुसरी तर उघडच आहे. ती कोणती तर पैशाचा अभाव.

(पुढें चालू.)

## हिंदुस्थानच्या व्यापार धंद्याची काय वाट होणार?

हिंदुस्थानचे व्यापार धंदे सर्व बुडाले; शेतकरी, कोष्टी व इतर कसबी लोक यांच्यांत कांहीं त्राण राहिलें नाहीं इत्यादी गोष्टी सध्यां कोणास सांगितल्या पाहिजेत असें नाहीं. रात्रंदिवस राजकीय विषयांत डोकें खुपसून बसलेल्या आमच्या इकडील लोकांस देखील आतां वाटूं लागले आहे कीं हिंदुस्थानचा अभ्युदय होणें असेलच तर तो देशांतल्या देशांत उत्पन्न होणाऱ्या पदार्थांचें प्रमाण वाढवून परदेशाशीं त्यांचा व्यापार सुरू केला तरच होईल. आमच्यांतील उद्योगाचा अभाव व भित्रेपणा यांच्या योगानें देशाचें जें नुकसान होत आहे तें राजकीय प्रकरणीं किती ही हक्क आह्मांस मिळाले व सरकार दरबारांत आह्मास कितीही मोठाल्या जागा मिळाल्या तरी भरून यावयाचें नाहीं. कित्येक लोक असें ह्मणतात कीं आमच्या देशाला सध्यां जी निकृष्टावस्था प्राप्त झालेली आहे तिचें कारण आह्मांवर फारादिवसांपासून असलेला परदेशीय लोकांचा अंमल व अनेक प्रसंगी त्यांनीं आह्मांवर केलेला जुलूम होय. वास्तविक पहातां आमच्या धंद्याचें निर्मूलन होऊन इकडे होणाऱ्या पदार्थांचा क्रय विक्रय करण्याचें सर्व काम परदेशीय लोकांनीं आपल्या हातीं घेतल्यानेंच आमचे फार नुकसान झालें आहे. व्यापार धंद्या संबंधानें हिंदुस्थानांची इतर देशाशीं तुलना केली तर हा देश आहे किंवा नाहीं याचीच भ्रांति वाटणार आहे. आमच्या देशांत धंदे व्यापार मुळींच नाहींत काय? पुष्कळ आहेत पण आह्मांला त्यांचा उपयोग काय? त्याचा सर्व उपभोग परदेशीय लोक घेत आहेत. मुंबई बंदरांत प्रतिवर्षीं परदेशाशीं कोट्यावधी रुपयांची घडामोड होत असेत पण आमचे लोक प्रिन्सेस डॉकच्या पलीकडे जातील तर शपथ. ही अवस्था किती तरी शोचनीय आहे. चमत्कार पहा कीं परदेशांत आमच्या देशाची कळकळ बाळगणारे जे कांहीं थोडे सद्‌ग्रहस्थ आहेत ते देखील हा विषय पुन्हा पुन्हा पुढें आणीत असतात तरी आमच्यालोकांचे डोळें अद्यापउघडत नाहींत. थोड्या दिवसांपूर्वी लंडन येथील रायल कलोनियल इन्स्टीटूड मध्यें डाक्टर हंटर यांनीं या विषयावर व्याख्यान दिलें. या व्याख्यानांत डाक्टर बाहादुरांनीं ज्या ज्या गोष्टी सांगितल्या आहेत त्या आह्मीं ध्यानांत ठेवण्यासारख्या आहेत. या करितां त्यांचा सारांश आह्मी येथें देतों.

डा. हंटर यांनीं हिंदुस्थानचा युरोप खंडाशीं अगदीं आरंभापासून तों आजपर्यंत जो व्यापार चालत आलेला आहे त्याचे चार काल कल्पिले आहेत. पहिल्या कालांतील व्यापार व्यापारी लोकांच्या कमाणांच्या योगानें चालत असें त्यावेळीं व्यापाराच्या कामाला अनेक गैरसोई असल्या कारणानें थोड्या खर्चांत पुष्कळ नफा होईल अशाच प्रकारचा माल ह्मणजे रत्नें, औषधी सामान वगैरे युरोपांत जात असे. दुसऱ्या कालांत व्यापारी लोक जलपर्यटणाचा उपयोग करूं लागले व लांबच्यालांब खुषकीचा प्रवास करावयाचा तो टाळून इराणचें अखात आणि तांबडा समुद्र यांमधील सफरा करूं लागले. अर्थात् या कालांत काल व खर्च कमी पडूं लागला या मुळें इकडून जाणाऱ्या पण वस्तूही त्या प्रमाणानें वाढल्या. पहिल्या कालांत फक्त रत्नें व औषधी जात असत त्या शिवाय आतां उत्तम प्रतीचीं कापडें व भांडीं जाऊं लागलीं. तिसऱ्या कालाला आरंभ केप आफ्गुडहोप कडील समुद्र जलपर्यटणाचा रस्ता सांपडल्यापासून झाला. या कालांत खर्च बराच कमी लागूं लागला. यामुळें वरसांगितलेल्या पदार्थांशिवाय हात कसबानें तयार झालेले इकडील दुसरें अनेक पदार्थ जाऊं लागले. चवथा काल ह्मणजे सध्यांचा या काला विषयी कोणास सांगितले पाहिजे असें नाहीं. सध्या हिंदुस्थानाला इतर देशाशीं व्यापार ठेवण्यास किती सोई झाल्या आहेत हें आबाल वृद्धांस माहीत आहे. आगगाड्या, आगबोटी, सुयेझचा कालवा यांच्या योगानें या कालांतील दळणवळण इतकें सोपें झालें आहे कीं पूर्वीं हिंदुस्थानांतून भारी भारी मोल्यवान् पदार्थ मात्र जात होते ते आतां सर्व कांहीं जाऊं लागले आहे.कापूस, गहूं इत्यादिकांची गोष्ट राहूं द्या पण जंगली झाडपाल्यापासून होणारे पदार्थही जाऊं लागले आहेत. हिंदुस्थानाची वास्तविक योग्यता परदेशीय लोकांस याच कालांत पूर्णपणें दिसून आली. पूर्वीं हिंदुस्थानाच्या मालाचा खप काय तो बडे लोक, अमीर उमराव यांमध्येंच होत असें पण आतां व्यापाराची सार्वत्र नवीन सांपडल्यामुळें गरीबगुरीब लोकांस ही त्यांपासून फायदे होऊं लागले आहेत. युरोपांत कोणताही कारखाना काढा. त्या कारखान्याला कच्चा माल हिंदुस्थान पुरवीत आहे. सारांश हिंदुस्थान ह्मणजे सध्यां त्या लोकांना कल्पतरु होऊन बसले आहे.

( पुढें चालू )

## राष्ट्रीय सभा.

( मागील अंकावरून पुढें चालू. )

हिंदुस्थानांत राजकीय उन्नती होण्यासें मुख्य साधन हें कीं राज्य कारभारांत सरकारचा व लोकांचा संबंध फार निकट पाहिजे. सध्यां आमच्या राज्यकर्त्यांमध्यें व आह्मांमध्यें बहुतेक व्यवहार राजकर्त्यांच्या मता प्रमाणें चालतात म्हणजे उभयता मधील संबंध सरासरीनें पहिल्यानें आज्ञा करावी आणि दुसऱ्यानें ती शिरसावंद्य मानून पाळावी या पलीकडे फारसा नाहीं. लोकांनी आपले विचार प्रगट करावे आणि तसें करतांना राजद्रोहाचें पातक होत नसेल तर सरकारची पूर्णपणें मोकळिक आहे. साधारणपणें सरकार लोकांच्या विचारास बरील पर्यायानें मान देतें आणि फारकरून राजा बोले आणि दळ हाले अशांतला प्रकार आहे. हा प्रकार मोडण्यास काळ लागेल तरी हळू हळू सरकार व प्रजा या मधील दळणवळाचे उपाय पुष्कळ वाढले पाहिजे. लोकांचा सरकारशीं संसर्ग व परिचय अधिकाधिक होण्यास परस्परांच्या विचारांत ऐक्य होणें फार अवश्यक आहे. राजकीय प्रकरणांत ज्या मानानें लोकांतील बहुमताच्या धोरणानें सरकार राज्यकारभार चालवूं लागेल त्या मानानें देशाचा अभ्युदय होईल हें उघड आहे. सरकारचे विचार लोकांस कळले पाहिजेत त्याप्रमाणें लोकांचे विचार सरकारास कळणें अत्यंत महत्वाचें आहे. आतां उभयपक्षीं आपापले विचार करण्यास साधनें कोणतीं आहेत व ते परस्परांस कळविण्यास मार्ग कोणते आहेत हें पाहूं आणि नंतर 'राष्ट्रीय सभे' पासून ह्या गोष्टींत कोणता मोठा लाभ होणार आहे हें दाखविण्याचा आज इरादा आहे.

हिंदुस्थानांतील राज्यव्यवस्थेचा पाया बहुतेक मोगलांच्या बादशाही थाटावर बसविला आहे. मुख्य चक्रवर्तिनी व्हिक्टोरिआ सरकार; त्या पुढें स्टेट सेक्रेटरी ह्मणजे अर्वाचीन बादशाही बिरबल, नंतर व्हाइसराय ह्मणजे प्रातिनिधी अशी लांबलचक मोठी परंपरा आहे. ह्या मालिकेंतील बडेबडे अधिकारी राज्यकारभारांतले मुख्य मुत्सदी असतात. हे बहुतकरून सर्व विलायतेहून आलेले असतात; यदाकदाचित चुकून कांहीं नेटीव असल्यास ते जन्मभुमीच्या संबंधानें केवळ नेटिव असतात इतकेंच नव्हे तर कधीं कधीं अशा नेटीवांचा अस्सल गोऱ्या साहेबांपेक्षां ही साहेबी बाणा कडक असतो. त्यास आपले देशबंधु डोळ्या समोर सुद्धा नकोसे असतात. तेव्हां सरकारचे डोळे ह्मटले ह्मणजे जिल्ह्याचे कलेक्टर पासून गव्हरनर जनरल पर्यंत मोठमोठी हुद्देवाली मंडळी होय तशांत हे अमलदार लोक युरोपांतून हिंदुस्थानांत येतात कीं लागलीच अधिकारसपन्न होतात. देशांतील लोकांचे विचार व त्यांचे विचार ह्यामध्यें जमीन अस्मानाचे अंतर असतें पण स्वतांच्या विचारावरच साहेबांचें काम भागतें व त्यांच्या ह्मणण्यावर आक्षेप काढण्याला इतर साहेब लोकांस ही पहिल्या प्रमाणें तुट पुंजी माहिती असते. ह्या तऱ्हेनें सर्व वाद मिटतो. बहुतेक साहेब लेखणीचे फरडे असतात पण हिंदुस्थानसं-

# SUPPLEMENT.

अकोला वऱ्हाडसमाचार तारीख १३ माहे आगष्ट सन १८८८ इ०

निःसंशय कायदेशीर.

## न भूतो न भविष्यति!

## फारच दुर्मिळ संधि!!!

## बृहद्राष्ट्रीय शब्दविजिगीषा.

( शब्दांवर बक्षिसें मिळविण्याची चढाओढ. )
मराठींत, इंग्रजींत, गुजरार्थीत आणि हिंदींत.

## बक्षिसांत

## रुपये ५००० चा विनियोग !!!

ज्यांत
नशीबाची परीक्षा नसून अकलेचीच परीक्षा आहे.

## सिद्धेन्दुचन्द्रिका

नामक अपूर्व ग्रंथ जो मराठींत, गुजरार्थीत आणि हिंदी भाषेत प्रसिद्ध करण्याचें योजिलें आहे, त्याचे वर्गणीदारांस मात्र ह्या चढाओढींत प्रवेश करितां येईल.

प्रत्येक प्रतीस किंमत.

## दोन रुपये.

वर्गणी भरल्या बरोबर बक्षिस चिठ्ठी मिळेल. तिच्या आधारें ज्या त्या भाषेत विजिगीषा (जिंकण्याची स्पर्धा) करण्यास सांपडेल.

## विशेष योजना.

जे गृहस्थ निरनिराळ्या तिन्हो भाषेतील तीन पुस्तकांस एकदम वर्गणीदार होतील त्यांसच इंग्रजी भाषेत शब्द तयार करून विजिगीषा करण्याचा हक्क मिळून शिवाय त्या तिन्ही भाषांत ही विजिगीषा करितां येईल.

ह्या तीन प्रतींची किंमत.

## फक्त पांच रुपये.

ठेविली आहे.

सर्व खुलासेवार माहिती साठीं प्रास्पेक्टस मागावा.

**मेसर्स. जे. भाटिया ऍन्ड ब्रदर्स.**

नं० ३९८, फाकलंड रोड, भायखळा.

---

## TO THE DEAF.

**A 132 PAGE ILLUSTRATED BOOK ON DEAFNESS NOISES IN THE HEAD HOW CURED AT YOUR HOMES. PRICE 6 ANNAS; ADDRESS DR. NICHOLSON, 5, OLD COURT HOUSE STREET CALCUTTA.**

## बहिरे लोकांस सुचना

बहिरेपणा व डोक्यांत ध्वनी होणें हे आपल्या घरीं कसे बरे होतात याजवर स्पष्टी करणास हे १३२ पानांचे आमचे पुस्तक किंमत ६ आणे. डाक्टर निकलसन ५ ओल्ड कोर्ट हाऊस स्ट्रीट--कलकत्ता या पत्यावर मागवावे.

---

## विक्रीस तयार.

दिवाणी काम चालविण्याच्या रीतीविषयीं कायदा.
अथवा.
सन १८८२ चा आक्ट नंबर १४
सन १८८८ च्या ६-७ व्या आक्टांतील दुरुस्तोसह.

## भाग १ ला.

या भागांत आक्टाची सुधारणा जेथ त्या तेथें घातली आहे. व सुधारणा पहाण्या करितां सुधारणेचा आक्ट पहाण्याची जरूर नाहीं.

किंमत २।८-टपालांतून नेणारास २।१२-व्ह्याल्युपेएबल करून मागविल्यास २।१४ या प्रमाणें पडेल.

दुसरा भाग तयार करण्याचें काम जारी आहे. त्यांत कलमाचा आंकडा देऊन त्या खालीं समजुतीच्या टिपा व हायकोर्टाचे जे ठराव आहेत ते खुलाशानें दिले जातील. हा भाग तयार झाल्यावर निराळी जाहिरात दिली जाईल.

ज्यास हीं पुस्तकें पाहिजे असतील त्यांनीं आमचेकडे पैसे पाठविले असतां पुस्तकें रवाना करण्यांत येतील.

R. H. KARANDIKER.

म्यानेजर ज्ञानप्रकाश.

"ज्ञानप्रकाश" छापखाना पुणें.

---

## जाहिरात.

पुणें "ज्ञानचक्षु" छापखान्यांत विक्रीस तयार असलेल्या पुस्तकांची यादी.

| मराठी आक्ट. | किंमत ट. | ह. |
|---|---|---|
| क्रिमिनल प्रोसिजर साटिक | ५ ०८ | |
| सिव्हिल प्रोसिजर सटीक | ५ ०८ | |
| पिनलकोड सटीक........ | ७ ०८ | |
| न्यायरत्न............ | २ ०८ | ०२ |
| रेव्हिन्यु कोड............ | ०८ | ०१ |
| सदरची रुळी............ | ०८ | ०१ |
| स्टांप आक्ट............ | ०६ | ०१ |
| कोर्ट फी आक्ट........ | ०६ | ०१ |
| कराराचा आक्ट........ | ०१३ | ०२ |
| पुराव्याचा आक्ट........ | ०८ | ०१ |
| रजिस्टर आक्ट........ | ०६ | ०१ |
| मुदतीचा आक्ट........ | ०६ | ०१ |
| आबकारी आक्ट........ | ०७ | ०१ |
| जंगलसंबंधीं आक्ट........ | ०८ | ०१ |
| विशेष न्यायाचा आक्ट.... | ०८ | ०१ |
| वतनदार आक्ट............ | ०६ | ०१ |
| लोकलबोर्ड आक्ट........ | ०६ | ०१ |
| **मनोरंजक पुस्तकें.** | **किंमत ट.** | **ह.** |
| श्री भावार्थरामायण.... | २० | २ |
| विचित्रपुरी............ | २ | ०२ |
| मदनमंजरी ............ | २ | ०२ |
| कामकंदला नाटक.... | १ | ०२ |
| उपयुक्त चमत्कार सं. भा. १ ते १० दर भागास किं. दहाही भा. घेत. ट. हा. माफ. | ०५ | ०१ |
| अलखमेपलख पलखमे दर्याव | ०४ | ०१ |
| सतारीचें १लें पुस्तक.... | १०४ | ०२ |
| संगीत रामाविलास नाटक. | ०६ | ०१ |
| मदनजन्म नाटक........ | ०१२ | ०२ |
| चमत्कारचिंतामणि .... | ०१३ | ०२ |
| मल्लविद्याप्रकाश............ | १ | ०२ |

---



...of the whole dis-
...say proper a con
...and the credit of
...Permanent Deputy
...nowlys. He is a
...lministrator and a
...on leave of three
...ountry and is ex-
...th Instant as his
...ay. His successor
...aptain Moris who
...e mind and high
...rged his duty very
...ion of his district
...nure of office the
...ers for the three
...ply and impartially
...he deserves many
...this District.
...ndekar in this Dis-
...though of a short
...e administered the
...nd justly to all
...s very regular in
... is very sharp and
...understanding the
...by him. His legal
His straightfor-
...with his love of
...ers endeared him
...eral sorrow was
...s transfer to the
...Vice President of
...him the municipal
...oved.

Yours
"X"

---

...त्र" या नांवाचें
... त्याच्या कल्याक
...आह्मी आभारपूर्व
... किंमत २०= ठ

---

...कोठें कोठें हवेचा
...पाणी बरें आहे.
...ीं तामगांव पोलीस
...चा आजार सुरू

...र आपल्या नवीन
...ां वऱ्हाडांतून ता.

...यांचो ज्युडिशिय-
...ाक झाली.
...पयील आक्. दि.
...साहेब यांस आप-
... उमरावतीचे मे.
...जागीं काम पहा-

...करून परत आले
...र्मी रुजूं होऊन
...व हे इलिचपुरास
...ण्यास जाणार.
...रच वऱ्हाडचे क-
...ास येणार अशी
...याप ग्याझिटांत
... कितपत असेल

... खात्यांत बदली
...कडे गेल्या बुधवारीं

... वऱ्हाडांत बराच
...समाधान मानण्या
... जावी जमक...
...ुसे कोर्टक डिपुटी क-

ऋणसंहार..................०४ ०१
मराठी ह्मणीं............ ०७ ०१
गोपीचंद नाटक ( हीं. ) .०१२ ०२
प्राटी रवुसर्ग दर भ. ०१० ०१
भाऊ गोविंद सापकर, ज्ञानचक्षूचे मालक.

## अवश्य पहा.

## गजकर्णावर रामबाण औषध

वऱ्हाड व नागपूर ह्या दोन प्रांतांत हजारों लोकांस गुण येत आहे. गुणा बदल खात्री इतकीच कीं, गुण न आल्यास किंमत परत देऊं. गुणाबदल पुष्कळ सर्टिफिकिटें आहेत, त्यांपैकीं कांहीं बाटली बरोबर असलेल्या माहितीच्या कागदांत दिलीं आहेत. दर बाटलीची किंमत ०९ आणे.

## खरजेवर मलम.

गुल्लवी मुळींच झोंबत नाहीं. पांच चार दिवस लावल्यानें खरूज, फोड, आगपैण हीं खात्रीनें बरीं होतात. किंमत दर डबीस ०८ आणे.

## हींव तापावर गोळ्या.

कितीही दिवसांनीं येणारें हींव असो सुमारें १० अगर १२ गोळ्यांनीं बंद होतें. दर बाटलीची किंमत १२ आणे.

सूचनाः—ही सर्व औषधें अनुभवलेली आहेत सबब रोग्यांस अशी विंनती आहे कीं गरज पडेल तेव्हां ह्या औषधांचा अवश्य उपयोग करून पहावा. प्रत्येक औषधास बंगी खर्च ०१ आणा. बंगी नाटपेड माहितीचा कागद बरोबर. हीं सर्व औषधें वऱ्हाडांत अकोलें येथें आमचे दवाखान्यांत रोख पैशानें अगर व्ह्या. पे. नें मिळतील. कळावें. नारायण चिंतामण डाक्तर.


नोटीस.

रा. रा. रावोजी वल्लद भगवानजी काळे रहाणार उगवे यांसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं, तुह्मी गेल्या फालगुनमाशी माझे कडून आपले भावाचे कार्यास जे सामान नेले त्याची नांववारी लिहिले प्रमाणें.

२४०३०६ शिलीमखा दाउदखा यांचें दुकानांतून पितांबर एक व चोळखण मसरू व एक झुना असें तीन जिन्नस मिळून किंमत रुपये चोवास आणे तीन पै सहा.

११०४ सोनें मासे सहा दर तोळ्यास रुपये २२०८ प्रमाणें.

७०१४०६ आदमजी कच्छी यांचे दुकानांतून सुपारी गुळ वगैरे सामान.

५ किनखाप कापडा बद्दल.

५ तासेवाले बद्दल.

१३०८ चुलता गोविंदा यांस देण्यास व किरकोळ खर्च वगैरे मिळून.

५१०३ चांदी तोळे ४५०८ भार दर तोळ्यास १०२ प्रमाणें.

९ व्याज सहामाहीचे दर शेकडा १०८ प्रमाणें.

१२७०१ यांत पांच रुपये १५०८ वजा

१५०८ जातां रुपये

१११०९ निके घेणें निघाले ते.

सदरील सर्व हिशेब पाहून तुह्मास ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसाचे आंत रुपये आणून द्यावे असें न केल्यास तुह्मावर रीती प्रमाणें फिर्याद करून निकाल होइपर्यंत जें नुकसान होईल तें व ह्या नोटीशीचा खर्च असें सर्व तुह्मापासून भरून घेतलें जाईल. तुह्मी सदरील रुपये कार्यं झाल्या वर लागलींच देणार होते परंतु तसें झालें नाहीं ह्मणून ही नोटीस केली आहे. कळावें. तारीख ७ माहे आगष्ट सन १८८८ इसवी.

( सही. )

गनोबा वल्लद रामजी देवकर मौजे पिंपळखुटे ता० आकोलें

दस्तुर खुद,

नोटीस.

बयाजी वल्लद तुळसाजी दांडगे रहाणार मौजे शेळगांव ( आटोळ्याचे ) तालुके चिखली जिल्हा बुलठाणें यास खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं, तुमच्याशीं माझें लग्न होऊन आदमासें १६ वर्षें झालीं. आज अदमासें ९ वर्षां पासून मी शहाणी झाल्ये. व माझ्या बापानें तुह्माला पुष्कळ वेळां मला नेऊन संसार करावा ह्मणून सांगितलें. परंतु तह्मी मला नांदवीत नाहीं. आतां माझ्या बदल माझे बापास कोणी कर्ज देत नाहीं आज पावेतों ९ वर्षांत कर्ज काढून तुमचे नांवावर निर्वाह केला आतां मी तुह्माला ही नोटीस दिल्या तारखे पासून १५ दिवसाचे आंत खावटी रुपये ६५० देऊन चार जातभाई पंचाची "चांगले प्रकारें नांदविण्याची" खात्री करून देऊन मला घेऊन जावें असें न केल्यास खावटी बद्दल रुपये फिर्याद करून घेऊन हीच फारकती समजून मी दुसरा घरठाव करीन. मग तुमचा नवरेपणाचा कोणतेही प्रकारचा हक्क मजवर रहाणार नाहीं. कळावें. तारीख ४ माहे आगष्ट सन १८८८ इसवी.

( सही )

रखमी मर्द बयाजी दांडगे

निशानी बांगडी खुद.

दस्तूर रामचंद्र नारायण कुळकर्णी

अंजनी खुर्द.

नोटीस.

सोनाई मर्द तुकाराम ह्मयसने राहणार दुधाळें तालुके अकोलें हलीं राहणार मौजे बाबुळगांव तालुके बाळापूर जिल्हा अकोलें इजला खालीं सही करणार राहणार मौजे दुधाळे तालुके अकोलें जिल्हा मजकुर तुजला या नोटीशीनें कळविण्यांत येते कीं तूं माझी भावजई ह्मणजे वडील भाऊ तुकाराम वल्लद माहादाजी यांची बायके असून त्याजला बारल्यास सुमार एक वर्ष झालें असून त्याचे मरणाचे वेळेस व त्यानंतर तूं कधींच घरीं आली नाहींस तरी लग्नापासून तुझ्या अंगावरचे दागिने अंगावरच कायम आहेत त्याचा तपशील.

५० चांदीचे दागिने तोळेवार

१३ गुंडवाळ्याचा चांदीचा जोड एक वजन तोळे

५ कडे दोन हातातील चांदीचे वजन तोळे.

२० तोडे जोड एक चांदीचे वजन तोळे

१२ दंडवाळ्या चांदीचा जोड एक वजन तोळे

१ सोन्याचे दागीने तोळेवार

टोकर सोन्याचे जोड एक वजन मासे ६ सहा बाळ्या सोन्याच्या वजन मासे ६ सहा येणें प्रमाणें चांदी तोळे ५० व सोने तोळा एक एकून एकावन तोळें असें ही नोटीस पावल्या तारखे पासून पंधरा दिवसाचे आंत सदरील तपशिलाचे रुपये ७० माझे वरी आणून द्यावेत नाहीं तर दिवाणी कोर्टांत फिर्याद करून नोटीशीचा खर्च व दागिने सहा कोर्टखर्चां सुद्धा अखेर निकाल होई पर्यंत जी नुकसान होईल ती भरून घेईन कळावें तारीख ८ माहे अगष्ट सन १८८८ इसवी

सही

उकरडा वल्लद माहादाजी ह्मयसने राहणार मौजे मजकूर निशाणी खुद.

बंधानें ज्ञान ह्मणजे करमणुकीसाठीं इसापनीतींतल्या लांडग्या मेंढराच्या गोष्टी सारख्या गंमतीनें ऐकिलेल्या हिंदुस्थानांतल्या गप्पा असतात. हा नियम प्रत्येक व्यक्तीस लागूं पडेल असें आमचें ह्मणणें नाहीं तरी पुष्कळ मंडळी अशा मासल्यांतली असतात. ह्या वरून सरकारचे विचार लोकमताला अनुसरूनें फार करून नसतात आणि ते गोळागेरजेनें पाहतां एकतर्फी असतात हें स्पष्टपणें दिसून येतें.

आतां लोकांच्या विचारांची बाजू पाहूं. हिंदुस्थानांतील लोक ब्रिटिश सरकारचे कायदेकानु ह्मणजे वेदश्रुती प्रमाणें प्रमाणशास्त्र मानतात. इंग्रजी अमलांची अशी मानमान्यता आहे. हेंच राजनिष्ठेचें खरें लक्षण होय. शिवाय इंग्रजांचे राजकतृत्व व शाहाणपण कांहीं विलक्षणच त्यांनीं नेटीवांस आपलेंसें वाटण्यासारखें कांहीं एक ठेविलें नाहीं. अमुक आमचें असें ह्मणून निराळेपणा दाखविण्यास नेटीवाजवळ कांहीं नाहीं. जें कांहीं आहे ते सर्व इंग्रज सरकारच्या प्रभावानें अर्थात नेटीवांचे विचारास ही स्वरूप ह्मणून राहिलें नाहीं. कायद्याच्या नियमांनीं नेटिवांस इतकें जरबड ठेविलें आहे कीं सरकारच्या ह्मणण्याविरुद्ध ज्यांचे विचार असतील ते राजद्रोही ठरतात ह्या वरून सरकारचें ह्मणणें तेंच लोकांचे विचार असतात असा साधारण क्रम चालत आला आहे. हा पुष्कळ वर्षांचा क्रम होता ह्मणून नेटिवांत लोकमत याशब्दाला कांहीं अर्थ नसतो. ह्मणून लोकमत काय पडतें हें कळण्याचें मार्गही नाहींत एकत्र जमून ठिकठिकाणच्या लोकांचे विचार परस्पर समजावे आणि ऐकंदरीनें राष्ट्राचें ह्मणणें सर्वांस जाहीर करावें, इत्यादि गोष्टी घडून येण्यास लोकयुक्त समाज पाहिजेत पण त्यांची हिंदुस्थानांत मोठी उणीव आहे.

( पुढें चालू. )

---

The Berar Samachar

MONDAY AUGUST 13, 1888.

## RESOLUTION.

The following is the resolution passed by the Government of India in its Notification No. 3 of the practical application of sanitary principles to towns and villages in India:—

The practical application of sanitary principles to towns and villages in India has since the publication in 1863 of the Report of the Royal Commission on the sanitary State of the Army in India received the continuous attention of the Government. The Report of the Royal Commission, the reports submitted subsequently from time to time by the various Provincial Sanitary Commissioners, and the suggestive reviews of those reports which have emanated from the Army Sanitary Commission in England, have brought to notice the chief sanitary defects of urban and rural areas, and have indicated the methods by which they might be remedied. It is through no want of sympathy with the cause of sanitary improvement that the Government of India has not been able hitherto to give as full effect to these recommendations as it could have wished. The difficulties to be overcome were numerous and formidable, and lay, to begin with, as much in the ignorance of the people and in the passive resistance offered by them to all departures from the practice of ages, as in the want of funds and the absence of an executive agency to give effect to the orders of the central authority. However convinced the Government of India might be of the value of the suggestions made for its adoption, and however anxious to carry them into effect, it bad to proceed with circumspection, and with a due regard to the means at its disposal as well as to the prejudices of the heterogeneous populations entrusted to its care. Under such circumstances progress has unavoidably been slow. Still considerable progress has been made. The ignorance of the people on all sanitary questions has been in some measure mitigated by the Department of Public Education, which has imported into the ordinary school curriculum instruction in the elementary principles of sanitary science. Popular prejudices have been combated by the judicious influence of the officers of Government, and by the introduction of improved sanitary methods, wherever this was practicable. Sanitary Commissioners have been appointed in all Provinces; information regarding the sanitary needs of towns, and later of rural areas has been collected; and in many municipalities and some rural areas this information has been turned to account in the provision of a pure water-supply of improved drainage, and of better conservancy arrangements. The Government of India readily admits that what has been done in these directions may appear small in comparison with what remains to be done. But it does not admit that, having regard to the difficulties which lay in the way, reasonable progress has not been made.

2 It has been stated that the main obstacles which have hitherto impeded sanitary improvement in India lay in the ignorance of the masses and their dislike to any change of custom, in the want of efficient executive agencies, and last, though not least, in the want of funds. Upon the first of these obstacles the Governor-General in Council does not on the present occasion desire to dwell. It indeed still constitutes a formidable difficulty, upon which, in rural areas at all events, little sensible impression has yet been made, and its existence renders it necessary still to observe great caution in the introduction of sanitary reforms. But with the rapidly advancing tide of popular education, the perception of the beneficent intentions of the Government comes home more clearly to the people than it did; and there is less danger than there was that measures taken for the improvement of the health of the people and the prevention of disease should be misconstrued as arbitrary interference with time-honoured practices. If some years ago it was generally and correctly felt by Local Goveanments and Administrations that authoritatively to press the subject of sanitary improvement, especially in villages, would be of little avail, and that persuasion, not coercion, was the right plan to follow, it is no less generally felt today that a more forward, though still cautious and tentative, policy would now be opportune.

3 In considering therefore the measures most calculated to promote the cause of sanitary reform in India, attention should, in the first place, be directed to the question of executive agencies, and to the question of funds. Taking the question of executive agency first, it has to be regarded in its relation to urban and to rural areas. In relation to urban areas, the Governor General in Council is glad to think that the question now presents far less difficulty than it did. When sanitary refrom in India received its first impetus from the investigations of the Royal Commission referred to in the preamble, there was, outside the Presidency towns, practically no organization for the prosecution of sanitary work. The hardworked district officer did what he could to keep his towns clean; but sanitary science in India was then in its infancy, while the most enlightened inhabitants of Mofussil towns knew nothing about it, and never troubled themselves to learn anything. The result was manifest in the lamentable state of things depicted in the Report of the Royal Commission. Since then however, there has been much improvement. The growth of the spirit of self-help and the perception of the advantages of sanitation in municipalities has in recent years been encouraging; and there is reason to think that the Government may with increasing confidence rely on the co-operation of municipal bodies in promoting sanitary reform. The Municipal Acts, which formerly were adapted to an early stage of civic development, have now been cast in an ampler mould. Those now in force in the various Provinces confer a larger discretion and authority to pass rules and bye-laws for sanitary purposes, and impose upon Municipal Committees the duty, as far as the funds at their disposal will permit, of providing, among other things, for the sanitation of the towas. Municipal Boards can, therefore, both entertain the requisite agency for carrying out the law, and raise the necessary funds. The areas to be dealt with are limited, and within them the interests of the people affected are mostly indentical. There is a field for concentrated effort; and the Government may, therefore, with greater confidence look to Municipal Committees for active assistance in carrying into effect the measures of sanitary improvement declared to be necessary for the towns over which they preside.

(To be continued.)

---

No. 1463-G.—Lieutenant Colonel R. Bullock, Deputy Commissioner of the 2nd Class, substantive *pro tempore*, in the Hyderabad Assigned District, is appointed to be Judicial Commissioner of the Hyderabad Assigned District, substantive *pro tempore*, with effect from the date of assuming charge, *vice* Colonel K. J. L. Mackenzie, and until further orders.

No. 504, The services of Surgeon-Major T. Hume M. B., Civil Surgeon, Amraoti, are replaced at the disposal of the Military Department.

Cholera in a mild form is reported from the Tamgaon Police Station in the Julgaon Taluq.

---

Bassim 10. 8. 88.

To

The Editor Berar Samachar
Akola.

Please insert this in your iusse and oblige.

This year the fall of rain is so long satisfactory to the crops and the general health of the people. Now a days the sky is cloudy and the climate has become very cool; consequently some of the diseases peculiar to the season such as fever, cough, headache &c are prevalent. In other respects the tone of the public health is satisfactory. So far the prospects of crops are very encouraging and the cultivators are hoping to go in plenty of crops this year. The sanitary condition of the whole district is kept in as they say proper a condition as it should be and the credit of this is solely due to the Permanent Deputy Commissioner Mr. Knowlys. He is a thorough and skilful administrator and a just ruler. He has gone on leave of three months to his native country and is expected back on the 15 th Instant as his leave expires on that day. His successor during his absence is captain Moris who is a gentleman of noble mind and high thoughts & who discharged his duty very ably and won the affection of his district subjects. During his tenure of office the work of electing members for the three Taluk Boards is very ably and impartially performed and for which he deserves many thanks of the public of this District.

The career of Mr. Dandekar in this District was very bright, though of a short duration of one year. He administered the law very impartially and justly to all classes of people. He was very regular in attending the court. He is very sharp and intelligent in point of understanding the business that is done by him. His legal knowledge is profound. His straightforward conduct coupled with his love of justice and affable manners endeared him to the public; and a general sorrow was felt for him owing to his transfer to the other District. He was Vice President of the Municipality; under him the municipal affairs were greatly improved.

Yours
"X"

---

## पोंच

पोंचः—"शिक्षकमित्र" या नांवाचें मासिक पुस्तक अंक १ ला त्याच्या कर्त्याकडून आह्मांस आलें त्याचा आह्मी आभारपूर्वक स्वीकार करितों. वर्षाची किंमत २॥ ठ पालहाशिलासह आहे.

---

## वऱ्हाड.

हवामानः—प्रांतांत कोठें कोठें हवेचा उपद्रव सुरू झाला. पीकपाणी बरें आहे.

जळगांव तालुक्या पैकीं तामगांव पोलीस गढांत साधारण महामारीचा आजार सुरू झाल्याचें समजतें.

मे. कर्नल मेकेंझी साहेब आपल्या नवीन जागीं रुजूं होण्याकरितां वऱ्हाडांतून ता. १५ आगष्ट रोजीं जाणार.

मे. कर्नल बुलक साहेब यांची जुडिशियल कमिशनरचे जागीं नेमणूक झाली.

मि. इलियट साहेब येथील आ. दि. क. आजरोजीं मि. आबडें साहेब यांस आपल्या कामाचा चार्ज देऊन उमरावतीचे मे. कर्नल बुलक साहेब यांचे जागीं काम पहाण्यास जाणार.

मि. नौलिस साहेब रजेवरून परत आले ते वाशिमास आपल्या कामीं रुजूं होऊन तेथून क्याप्टन मारिस साहेब हे इलिचपुरास दि. क. चे जागीं काम पहाण्यास जाणार.

मि. ग्लौडन साहेब लवकरच वऱ्हाडचे कमिशनरचे जागीं रुजूं होण्यास येणार अशी वदंता आहे. नेमणूक अद्याप ग्याझिटांत आली नाहीं. बातमींत तथ्य कितपत असेल तें असो.

डा. ह्यूम ह्यांची लष्करी खात्यांत बदली झाल्या प्रमाणें ते मद्रासे कडे गेल्या बुधवारीं गेले.

राष्ट्रीय सभेचे संबंधानें वऱ्हाडांत बराच उद्योग चालू आहे. हें समाधान मानण्या सारखें आहे.

लिहीत आली जमक... [illegible]डील ... पर्वतीले कोष्टी दिपुटी क[illegible]

मध्यप्रांत मुंबई इलाख्यास न जोडण्याबद्दल हर्दा येथें ता. २९ रोजीं जाहीर सभा भरली होती.

कर्नल मार्शल यांनी, सरकारच्या ठरावाविरुद्ध, निजामच्या पुष्कळ अमलदाराकडून नजराणे घेतले असें स्टेट्समन पत्रकर्ते ह्मणतात व याबद्दल चौकशी करण्या करितां व्हैसराय साहेबांस त्यांनीं विनंती केली आहे.

हिंदुस्थानांत काम केलेल्या युरोपियन लोकांनां पेन्शन देण्यांत व इंडिया आफिसांतील कामदारांस जो पैसा देण्यांत येतो त्यांत पुष्कळ काटकसर करण्याच्या हेतूनें लार्डक्रास हे कमिटी नेमणार आहेत.

ब्रह्म देशांत बंडावे व मारामाऱ्या अद्याप बऱ्याचे चालल्या आहेत.

पेंबारिंज व जलापा या दोन खिंडींत ८००० लोक टिबेटन लोक इंग्रजावर हल्ला करावयास तयार झाले आहेत असें ह्मणतात.

राजादुर्गाचरण यांना व्हैसराय साहेबांच्या कायदेकौन्सिलचे सभासद नेमिलें.

जुनागड स्टेट रेलवे लौकरच सुरू होईल.

सिकीम येथें ५०० गुराखे लोकांनां पाठविण्याचा सरकारचा विचार ठरला आहे.

मर्व्ह येथें एक मोठा राजवाडा बांधण्याचे घाटत आहे असें समजतें.

बंगाल इलाख्यांत जे पोलिस सरक्युलर निघालें तें मूळ पंजाबांत चालूं झालें होतें व त्याच्या उत्पत्तीस कारण अगर त्याचे जनक आमचे प्रसिद्ध सर लेपेल ग्रिफिन हे होते असें त्यांणी लंडन टैम्स पत्रांत लिहिलें आहे त्यावरून समजतें. सु. प.

आफगाणिस्थानांत बंडे होण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं.

अमेरिकेंतील मेकसिको शहर अति वृष्टीनें वाहून गेलें. दोन हजार माणसें मरण पावलीं.

ब्रह्मदेशांतील एक कमिशनर बंडखोरांनीं मारून ओढ्यांत फेकून दिला.

रशियन फौजेच्या टोळ्याच्या टोळ्या हिरातकडे येत आहेत असें एक इंग्रजी पत्राचा बातमीदार कळवीत आहे.

भोपाळ प्रकरणाचे कागदपत्र व्हाइसरायनीं मागविले असून ते चौकशी करणार आहेत.

एका फ्रेंच गृहस्थानें एक यंत्र काढिलें आहे. त्याच्या योगानें अंतरावरील शत्रूची संख्या, अंतर व हालचाल पहतां येते. ते. मि.

विद्युत्खड्ग—शांघाई येथें एका कल्पक मनुष्यानें विजेची तरवार तयार केली आहे. ह्या तरवारीचे एका बाजूस तिचे पोटांत प्लाटिनम धातूची तार तिचे टोंका पर्यंत घातलेली असते. ह्या तरवारीचा आकार वगैरे इतर लष्करी तरवारीं प्रमाणेंच असतो. परंतु मुठीच्या जवळ एक लहानशी पेटी असते. त्या पेटींत विद्युत्पतीची व्यवस्था केलेली असते. त्या पेटीवर एक गुंडी असते शत्रूला तरवारीचा वार करितांना ती गुंडो दाखविली [illegible] उत्पन्न होते व [illegible] होऊन ज[illegible]मर्थ होतो व त्याला विजेचा फार मोठा धक्का बसतो.

मुदत वाढविली—२५ वर्षां पुढें सरकार नौकरी देऊं नये असा पूर्वीं ठराव होता पण आतां ३० वर्षें पर्यंत नौकरी द्यावी असा नवा ठराव झाला आहे.

नवा ठराव—शेतकामा साठीं सुरुंगाची दारू आणि डांबर बत्ति देण्याचा परवान्यास फी घेऊं नये असा हिंदुस्थान सरकारनें ठराव केला आहे.

नेटिवांस मोठी देणगी—मुंबईचे माजी प्रेसिडेन्सी माजिस्ट्रेट मि० डोसाभाई फ्रामजी सी. आय. इ. याणीं सरकारची नौकरी उत्तम प्रकारें बजावली ह्मणून मेहेरबान होऊन त्यांस पेन्शना खेरीज सरकारानें १०००० रुपयांची जाहगीर दिली असें रास्त गोफतार पत्रावरून समजतें. इतर नौकर सरकारी नौकरी उत्तम रीतीनें करीत नाहींत काय? शु० सू०

काबूलचे अमीर यांस हिंदुस्थानसरकारानें ४००० बंदुका दिल्या.

तिबेटीयन लोकांची जी जास्त तयारी चालली आहे त्या कारणाकरतां हिंदुस्थानसरकारानें सिक्कीम येथें जाणाऱ्या आपल्या फौजेच्या टोळीच्या मदतीकरितां जास्त फौज पाठविण्याचें योजलें आहे.

कुरम खिंडीवर फौजेची एक टोळी रवाना करण्याची सर्व सिद्धता झाली. ४०० लोक तयार झाले आहेत.

विलायतेंत व मुख्यत्वेंकरून लंडनच्या पूर्व भागांत पाऊस व वारा फार सुरू झाला आहे व यामुळें पिकांची बरीच खराबी झाली आहे.

नवीन घेतलेल्या ब्रह्मदेशांत जी कित्येक सुपीक अशी रिकामी जमीन आहे त्यांत कोहात वगैरे प्रांतांत अतिशय दाट वस्ती असल्यामुळें त्यांतील लोकांस आणून वसाहत करावयास लावावें अशा खटपटीसाठीं बंगाल सरकारचा एक स्वतंत्र सेक्रेटरी लवकरच त्या कामाकरितां रवाना होणार आहे. अशाबद्दल यापूर्वीं एक दोनवेळा यत्न करण्यांत आले पण ते निष्फळ झाले होते.

कलकत्याचे प्रेसिडेन्सी माजिस्ट्रेट सय्यद अमीर हुसेन यांस पुन्हा गव्हरनर जनरलांच्या कायदेकौन्सिलचे मेंबर नेमले.

दक्षिण गिल्झी प्रांतांत पुन्हा बंडावा होण्याचें चिन्ह दिसूं लागले आहे.

तिबेटसरकारची फौज सरहद्दीवर अधिक अधिक नाकेबंदी करीत आहे, व त्यांची जी तयारी चालली आहे त्यावरून दोन्ही ठिकाणीं एकदम लढाई करावयाची असा त्यांचा विचार आहे असें दिसतें.

निजामच्या रेसिडेन्सींतील जुना नोकर जनरल फ्रेजर याणे आपल्या सहीनें अबदुल हक्क प्रकरणाच्या संबंधानें प्रसिद्ध केलेला एक लेख जो आज दुसरीकडे प्रसिद्ध केला आहे त्याविषयीं विचार करूं लागलें ह्मणजे निजामासारख्या बड्या राजाच्या दरबारावर पोलिटिकल एजंटाचा किती दाब असतो आणि त्या दाबाच्या योगानें कसलीं अनन्वित कृत्यें होत असतात हे चांगल्या रीतीनें दिसून येतें. ज्या अबदुलहक प्रकरणाची हल्लीं चौकशी चालूं आहे त्याचा कारभार अयोग्य रीतीनें चालत आहे अशाबद्दल एक अक्षरही लिहूं नये अशी तेथील वर्तमानपत्रास धमकी देण्यांत आली. त्या कारभाराचा विचार करण्या करितां भरलेल्या सभेंत अध्यक्षस्थान स्विकारल्याबद्दल तेथील कालेजाच्या प्रिन्सिपालास हद्दपार करण्याची शिक्षा देण्यांत आली; आणि आबदुल्हक्क हा या कामांत अन्वित अधिकार चालवीत आहे असें पोलिटिकल एजंट मि. कार्डरी यास स्पष्टपणें सांगण्यांत येत असतां तें ऐकण्याच्या बाबतींत व त्या विषयीं विचार करण्याच्या बाबतींत तो पोलिटकल एजंट कार्डरी हा बहिरा व मुका झाला होता, या सर्व गोष्टी सर्वांनीं ध्यानांत ठेवण्या सारख्या आहेत व हिंदुस्थानच्या इतिहासांत लिहून ठेवण्यासारख्या आहेत.

निजामाचे दिवाण सरअस्मांजा हे सिमल्या वरून परत येण्यास निघाले. वाटेंत कोहाल येथें गव्हरनर जनरलांशीं त्यांची भेट झाली.

इराणांतील कित्येक तुर्की लोकांनीं बंडावा सुरू केला असून आस्त्राबाद शहर काबीज करण्याचा विचार केला आहे, व त्याच्या आसपासचीं कित्येक खेडीं उध्वस्त केलीं. तेथें असलेल्या शहाच्या फौजेंतून त्यांचा बंदोबस्त होत नाहीं. ह्मणून लोकांनीं बादशहा जवळ जास्त फौजेचें मागणें केलें आहे.

रशियांत किफ येथें एका बाईनें बायकांस कृषिकर्म व जनावरांची जनत यांच्या संबंधानें माहिती देण्याची एक शाळा घातली आहे. या शाळेला सरकारा कडून १५०० रुबल्स मिळतात असें समजतें.

ऐर्लंडांत दोन शेतकऱ्यांचे दोघा मोठ्या जमिनदारांनीं खून केले करणारे अजून सांपडले नाहींत

स्लायगोच्या मेयर साहेबांनीं आपल्या पत्रांत कांहीं एक प्रकारचे कडक आर्टिकल लिहिल्या बदल त्यांना चार महिने कैदेची शिक्षा झाली आहे. टा० अ०

---

क्लास ७.

दु० र० नंबर ५५७ सन १८८९.

कि० नंबर १० सन १८८८

फैसल ता० ३—७—८८.

चौकशीची तारीख २५—७—८८

दि० मु० नंबर १७७७ सन १८८८.

वि० नादारी कोर्टाचे जज्ज साहेब बहादूर कोर्ट अकोलें.

गणेश भिवराज मारवाडी दुकान सेगांव तालुके खामगांव .................... वादी.

नारायण वलद संभाजी रहाणार अंदुरा तालुके बाळापूर........................प्रतिवादी.

दावा रुपये ३२३०१

ह्या मोकदम्यांतील मी प्रतिवादी सिविल प्रोसिजर कायद्यांतील कलम ३४४ प्रमाणे अर्जे करितो तो येणेंप्रमाणें

(अ) आकोला येथील स्मालकाज कोर्टाचे जज्ज साहेब यांचे हुकमावरून मजला ता० २ माहे जुलई सन १८८८ इ० रोजी कैद केलें आणि कोर्टाचे ज्या ठिकाणीं कैदी राहतात तेथें नेलें नसून प्रतिवादी पासून एक महिन्याचा जामीन देऊन नादार ठरविण्यासाठीं प्रतीवादी मोकळा जाला आहे. जामीनकीची मुदत ता० ९ आगष्ट सन १८८८ इसवी पावेतो आहे.

(ब) स्थावर माल मौजे आंदुर घर येथें होता तो सुमारें ३—४ वर्षांपूर्वीं बालाजी वलद पुरणाजी कुणबी रहाणार मोख यास फरोक्त दिला त्याजवर अर्जदाराचा वारसा नाहीं. गणु वलद मानाजी बहाकर राहणार आंदुरा यांचें शेत बारा वर्ष पट्यानी घेतलें होतें. ते आठ वर्ष वाहिलें आणखी या सालापासून चार वर्षे वहाणें राहिलें आहे. त्याचा सारा रु. १०३ अर्जदारयास द्यावा लागता. येणेंप्रमाणें स्थावर मिळकतीचा व्यवस्था आहे.

जंगम माल मिळकत. ०८ तांब्या पितळेचा १, ०१२ परात १ पितळेची, ०१२ बटलोई १ पितळेची, ०१२ ताट १ काशाचे, ०४ वाटी १, ०२ तवा १ लोखंडी, १ जात दगडी, १ रजई, ०८ बाज, ०४ वाकळ एकंदर रु० ५०१४.

(क) सदरहु जंगम माल आंदुर येथें आहे तो सांपडेल.

(ड) कोर्ट हुकुम करतील त्या प्रमाणें व्यवस्था होण्यासाठीं ती मिळकत ताब्यांत देण्यास राजी आहे

(इ) आज तर प्रतीवादी कडेस खाली लिहिले लोकांचे देणें आहे ते

७२३०६ हुकुम वादीचा हुकुमनामा ३२३०६ व शिवाय सालबंदीबद्दल ४००

४५० नथमल सुकदेव मारवाडी दुकान निमकर्दे तालुके बाळापूर

१२०० ताराचंद शिवनारायण मारवाडी सेगांव तालुके खामगांव

१५८ रामचंद शिवबकस दुकान शेरी तालुके आकोट एकंदर रु० २५३१०६

(फ) १ खु० वादी सेगांव ता० खामगांव

१ ताराचंद शिवनारायण सेगांव ता. खामगांव

१ नथमल सुकदेव दु० निमकर्दे ता. बाळापूर

१ रामचंद्र शिवबकस दु० सेरी ता. आकोट

एकंदर ४

वादी याने ता० २० माहे डिसेंबर सन १८८६ इसवी रोजीं स्मालकाज कोर्ट आकोला यांचे हुकमानें हुकूमनामा मिळविला त्याज वरून ऐन व खर्चा सुद्धां रु० ३२३०६ या शिवाय दुसरे लोकांचे कर्ज प्रतिवादी कडेस आहे प्रतिवादी अंदुर येथें रहात असोन हल्लीं कोर्टाचे हुकुमानें कैद असून जामिनावर आहे विनंती केली आहे कीं आतां नादारीचे सरटीफिकिट मिळावें हा अर्ज तारीख ३ माहे जुलई सन १८८८ इ० दस्तुर काशीनाथ शामराव दी० रा०

ता० ८—८—८८ इ०

(सही)

नारायण वलद संभाजी याचे हातची खुद्द निशानी.

मी प्रतिवादी नारायण वलद संभाजी अशी प्रतिज्ञा करितो कीं अर्जांत लिहिलेला मजकूर खरा आहे ता० मजकूर.

(सही)

नारायण वलद संभाजी याचे हातची खुद्द निशानी असे.

True copy
Damoder Nanagi
Clerk of Court.

---

☞ हें पत्र आकोला येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

५

अखेर ७ ॥ १०८
ळ अंकास ........................०४

नोटीशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस.... ...०१

Single copy............................4 as.

Advertisements.
Below 10 lines...2 Rs
Per line over 10...1as
Repetition perline 3as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.

VOLXXII AKOLA MONDAY 20 AUGUEST 1888 NO. 33

वर्ष २२ अकोला सोमवार तारीख २० माहे आगष्ट सन १८८८ इ० अंक ३३

निःसंशय कायदेशीर.

**न भूतो न भविष्यति!**

**फारच दुर्मिळ संधि!!!**

**बृहद्राष्ट्रीय शाद्वविजिगीषा.**

( शब्दांवर बक्षिसें मिळविण्याची चढाओढ. )

मराठींत, इंग्रजींत, गुजराथींत आणि हिंदींत.

**बक्षिसांत**

**रुपये ५००० चा विनियोग !!!**

ह्यांत

नशीबाची परीक्षा नसून अकलेचीच परीक्षा आहे.

**सिद्धेन्दुचन्द्रिका**

नामक अपूर्व ग्रंथ जो मराठींत, गुजराथींत आणि हिंदी भाषेंत प्रसिद्ध करण्याचें योजिलें आहे, त्याचे वर्गणदारांस मात्र ह्या चढाओढींत प्रवेश करितां येईल.

प्रत्येक प्रतीस किंमत.

**दोन रुपये.**

वर्गणी भरल्या बरोबर बक्षिस चिठ्ठी मिळेल. तिच्या आधारें ज्या त्या भाषेंत विजिगीषा (जिंकण्याची स्पर्धा) करण्यास सांपडेल.

**विशेष योजना.**

जे गृहस्थ निरनिराळ्या तिन्ही भाषेंतील तीन पुस्तकांस एकदम वर्गणीदार होतील त्यांसच इंग्रजी भाषेंत शद्ब तयार करून विजिगीषा करण्याचा हक्क मिळून शिवाय त्या तिन्ही भाषांत ही विजिगीषा करितां येईल.

ह्या तीन प्रतींची किंमत.

**फक्त पांच रुपये.**

ठेविली आहे.

सर्व खुलासेवार माहिती साठीं प्रास्पेक्टस मागावा.

**मेसर्स. जे भाटिया ऍन्ड ब्रदर्स.**

नं० ३८८, फाकलंड रोड, भायखळा.

वऱ्हाडसमाचार.

मिती श्रावण शुद्ध १४ शके १८१०.

## बरार रुरल बोरडस लॉ सन १८८५ यांतील कलम३३ अन्वयें नियम.

( मागील अंकावरून पुढें चालूं. )

७६. तथापि जिल्हा बोरडानें व आपले ताब्यांतील तालुक बोरडानें जोडलेले यादी तपशीलवार दिलेले सर्व दुसरे उत्पन्न वसूल करावे.

७७ हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं बोरडाचे नांवें खजिन्यांत जमा असलेले फंडस हे जरी त्यांची पुंजी आहे तरी स्थानिक सुधारणुकीचे कामाकरितां खर्च करण्यास्तव जो पैसा पब्लिक वर्कस खात्याचे स्वाधीन केला असेल तो बोरडास स्वतः खर्च करण्याकरितां मिळणार नाहीं.

७८. जिल्हा किंवा तालुक बोरडानें वसूल केलेल्या सर्व रकमा दररोज सरकारी खजिन्यांत भरणा केल्या पाहिजेत. असे प्रकार भरणा करण्यापूर्वीं असे वसुलाचा कोणताही भाग कोणतेही कारणावरून खर्चाकरितां घेतां येत नाहीं. सर्व वसुलाबद्दल बोरडानें सरकारी साला करितां अनुक्रम नंबर दिलेले काऊंटर फाईल नमुन्या प्रमाणें पावती द्यावी. व ते वसूल खजिन्यांत भरणा करतांना त्यांज बरोबर पास बुक व चलान पाठविलीं पाहिजेत. त्यांत कोणते फंडास अगर फंडास जमा करण्याचें तें व प्रत्येक वसुलाचा प्रकार दाखविला पाहिजे. खजिन्यांत केलेला भरणा क्याश बुकांत जमा धरूं नये परंतु ज्या चलानी बरोबर पैसा खजिन्यांत रवाना केला तिचा दाखला क्याश बुकाचे तिसरे कोष्टकांत जमेचे बाजूकडे काळजीपूर्वक द्यावा.

७९. खजिन्यांत भरणा केलेले प्रत्येक रकमेबद्दल ट्रेझरी सब-ट्रेझरी आफिसरचे लहान सहीनें पास बुकांत पावती द्यावी. बोरडाचे कचेरींत पास बुकांत रकम दाखल करूं नये किंवा दुरस्ती करूं नये असें करणें जरूर वाटल्यास बोरडाचे सांगण्यावरून ट्रेझरी आफिसरानें करावें, सब-ट्रेझरींतील वसूल देखील जिल्हा ट्रेझरी आफिसरानें जिल्हा बोरडाचे पास बुकांत दाखल करावा. व ते वसूल पास बुकांत दाखल केले जाई पर्यंत जिल्हा बोरडाचे हिशोबांत दाखल करूं नये.

८०. जिल्हा बोरड किंवा तालुक बोरड ज्यास पैसा वाटून दिला असेल त्यांणीं रकमा द्यावयाच्या त्यांजबद्दल चेक द्यावे व चेकांवर सेक्रेटरी व दोन सभासद यांच्या सह्या असल्या पाहिजेत. चेक देण्याचा तो एखादें बिल जें चेअरमनेनें तपासून पास केलें आहे अशा बिला शिवाय देऊं नये.

प्रत्येक बिलावर "चेक नंबर तारीख देऊन आदा केलें" असा शेरा लिहावा. ज्या फंडावर चेक दिला असेल तो व खर्चाचा प्रकार स्पष्टपणें चेकावर लिहिला पाहिजे.

८१. चेक बुकें जीं दिपुटी कमिशनरचे मार्फतीनें कम्पट्रोलर हैदराबाद यांजकडून पुरविलीं जातील तीं चेअरमन यांणीं आपले स्वतःचे ताब्यांत कुलुप किल्लींत ठेवावीं. व चेअरमनचे जागीं जेव्हां दुसरा इसम नेमण्यांत येईल तेव्हां उपयोग न केलेले चेकांचे संख्येबद्दल रीती प्रमाणें पावती घेतली जावी.

८२. जेव्हां एखादी रकम तालुक बोरडास वाटून दिली असेल तेव्हां तहशिल खजिन्यांत तालुक बोरडचे चेक वाटून दिलेल्या रकमे पर्यंत व त्या पेक्षां जास्त नव्हे अशी रकम आदा करीत जाण्यास अधिकार देण्याबद्दल ट्रेझरी आफिसरशीं व्यवस्था केली जावी. परंतु जेव्हां रकम वाटून दिलेली नसेल तेव्हां सब-ट्रेझरींतून पैसा आदा करण्याबद्दल जिल्हा बोरडानें डिस्ट्रिक्ट ट्रेझरी आफिसरावर चेक द्यावा व त्याणीं त्या ऐवजीं तहशिलीवर नगदी बदल आरडर द्यावी.

सब-ट्रेझरींतून आदा केलेला पैसा वसुला प्रमाणेंच जिल्हा बोरडचे पास बुकांत दाखल केला जावा.

८३. प्रायः पैसा आदा करण्याचा हुकूम बोरडचे मंजुरी शिवाय दिला जाऊं नये. परंतु अशी मंजुरी पुढील सभेचे कीं मिळण्याचे उमेदीवर चेअरमन यांणीं दोन मेंबरा सहीत पुढील खर्च आदा करण्याबद्दल अधिकार द्यावा.

१. कायमचे इस्टाब्लिशमेंटचे ( नौकरा मंडळीचे ) पगाराबद्दल.

२. योग्य अधिकाऱ्यानें मंजूर केलेलीं कामें व रिपेरीचे आदाई करितां.

३. जरूरीच्या कारणा करितां रकमा.

८४. मेडिकल ( वैद्यकी ) व एज्युकेशनल ( शाळा )खात्याचा पगार व कंटिंजंट बिलें अनुक्रमें सिव्हिल सरजन व शाळाचे दिपुटी इनस्पेक्टर यांणीं सरकारि नौकरींतील असे नौकरांबद्दल जो नमुना दिला असेल त्या नमुन्या प्रमाणें तयार करावीं. व तीं जिल्हा बोरडा कडे पाठवावीं. इतर नौकरांचे पगार व त्यांचीं कंटिंजंट बिलें दि. कमिशनरचे आफिसांत, किंवा खात्याचे मुख्य हे बोरडास विचारून जसा हुकूम देतील त्याप्रमाणें खात्याचे इतर अधिकाऱ्यांनीं तयार करावीं.

बिलें तपासल्यावर चेअरमन याणीं आदा करण्या करितां मंजूर करावीं. व त्या रकमेकरितां चेक द्यावा. ( पहा नियम ८० ) बिलें माहेवारी हिशोबा बरोबर कम्पट्रोलरचे आफिसांत पाठविण्या करितां ठेऊन घ्यावी.

८५. जिल्हा व तालुक बोरडानीं पुढील हिशोब ठेवावे.

१. क्याश बुक ( वसूल व खर्चाबद्दल. )

२. चेकाचें रजिस्टर.

३. पास बुक.

तसेंच ठरीव मागणी, किंवा सारा, ऍडव्हान्स वगैरे बद्दल जशी जरूरी लागेल त्याप्रमाणें जास्त रजिस्टरें व बिल बुक पाठवावें.

दिपुटी कमिशनरचे आफिसांत खालील बुकें ठेवावीं.

४. वसुलाचें क्याश आबस्ट्रॅक्ट बुक.

५. खर्चाचें क्याश आबस्ट्रॅक्ट बुक.

६. माहेवारी शिलकी पत्रक.

७. वसुलाचा माहेवारी वर्गवारी गोषवारा.

८. खर्चाचा माहेवारी वर्गवारी गोषवारा.

९. वसुलाचा माहेवारी वर्गवारी गोषवारा याचा उतारा.

१०. खर्चाचा माहेवारी वर्गवारी गोषवारा याचा उतारा.

११. वार्षिक हिशोब. इनकारपोरेटेड व एक्सक्युडेड लोकल फंड्स निरनिराळे.

८६. क्याश बुक हे जिल्हा बोरडचे कचेरीचा मुख्य कागद आहे त्यावरून त्याचे सर्व हिशोब तयार केले जातात यास्तव त्यास अति महत्वाचा कागद समजला पाहिजे. जसजसी देवघेव होईल तसतशी बरोबर रीतीनें व पूर्ण तपशिलावर रीतीनें रोजचे रोज त्यांत लिहीत जावी जमेकडील व खर्चाकडील ... पर्यंतचे कोष्टक दिपुटी क-

मिशनरचे कचेरींत भरलें जाण्या करितां कोरें ठेवावें.

क्याश बुकांत खोडाखोडी करूं नये. चुकीची दुरुस्ती करणें झाल्यास त्याजवर काट मारून लाल शाईनें आंकडे दुरुस्त करावें. व त्याजवर चेअरमन यांणीं लहान सही कावी. क्याश बुक दररोज बंद करीत जोंव.

( पुढें चालू. )

## अरोग्य रक्षण व त्याबद्दल हिंदुस्थान सरकारचा ठराव.

( मागील अंकावरून पुढें चालू )

पहिल्या अडचणी संबंधानें पहातां शहरांतील लोकांविषयीं फारशी काळजी करणें नलगें; कारण पूर्वीपासून, ह्मणजे मुनसिपालिट्या स्थापन झाल्या नव्हत्या तेव्हां पासून ही त्या प्रांताच्या मुख्य कामगाराला आपल्या प्रांताच्या मुख्य शहराची व्यवस्था अरोग्य संबंधानें चांगल्या रीतीनें ठेवणें भागच होतें. आतां तर मोठमोठ्या शहरांत जिकडे तिकडे मुनसिपालिट्या स्थापन झाल्या अहित व त्या आपापलीं कामें चांगल्या रितीनें बजावीत ही अहेत. आतां जेथें गांव आहे तेथें महारोडा आहेच या ह्मणी प्रमाणें मुनसिपालिट्यांत दोष नाहींत असें नाहीं; तथापि खेड्यापाड्या पेक्षां तेथें स्वस्थता वगैरे बरी असते लोकांच्या अरोग्याकडे लक्ष बरें दिले जाते असें ह्मणण्यास हरकत नाहीं. अडचण काय ती खेड्या पाड्यांची. आतां खेड्या पाड्यांत देखील लोकांच्या हिता करितां लोकल बोर्ड स्थापन झाले अहित व त्या बोर्डीकडे जीं कामें सोंपविलीं आहेत त्या पैकीं लोकांचे अरोग्य राखण्या करितां प्रयत्न करणें हें एक काम अहे. हें काम बजावण्या करितां एक प्रकारें कर बसविण्याचा ही अधिकार त्यांस दिला आहे. तथापि त्यां पासून व्हावा तसा फायदा होत नाहीं. ही अडचण दूर करावी व मुनसिपालिट्या आणि लोकल बोर्ड यांना मदत करून लोकांच्या अरोग्याकडे चांगलें लक्ष द्यावे या साठीं सरकारनें अशी सुचना केली अहे कीं प्रत्येक प्रांताला एकएक सॅनिटरी बोर्ड स्थापन करावें व या बोर्डानें स्थानिक सरकार वेळोंवेळीं जे हुकूम देईल त्या हुकमाप्रमाणें वागुन लोकांच्या अरोग्य रक्षणाचें काम करावें. ही बोर्डें ह्मणजे केवळ सरकारला मत घेण्या करितां अहित असें समजूं नये. लोकांच्या अरोग्य रक्षणा संबंधानें जे जे उपाय योजावयाचे ते योजण्या करितां सर्व प्रकारें अधिकार त्यांनां दिले जाते. या बोर्डीचीं रचना करितांना त्यांत योग्य रीतीनें अमलबाजी करण्याचें काम ज्यानें केलें आहे व ज्याला पुष्कळ अनुभव आलेला आहे असा एखादा कामगार त्या प्रांताचा सॅनिटरी कमिशनर व ज्यानें अरोग्य रक्षणासंबंधाचें एंजिनिअरिंग हा विषय चांगला पाहिलेला आहे असा एखादा पब्लिक वर्कस खात्यांतला अंमलदार हे असावे. या शिवाय या बोर्डांत एक दोन गृहस्थ जे सरकारी नोकरींत नाहीं असे असावे. या बोर्डांनीं स्थानिक सरकार वेळोंवेळीं हुकूम देवोत त्या प्रमाणें हिंदुस्थान सरकारच्या सॅनिटरी कमिशनरशीं पत्रव्यवहार ठेवावा व कोणते ही मोठें काम करणे झाल्यास त्याचा सल्ला विचारावा.

या बोर्डांची स्थापना होऊन त्यांची अंमलबजारी सुरू होण्या पूर्वी प्रत्येक मुनसिपालिटी व प्रत्येक लोकल बोर्ड यांच्या ताब्यांतील प्रदेशांत लोकांची अरोग्यावस्था कशी आहे हें समजणें इष्ट आहे करितां जितकें लवकर होईल तितके लवकर ही पहाणी व्हावी वॅ प्रत्येक शहराला किंवा खेड्याला पाण्याचा पुरेसा पुरवठा आहे कीं नाहीं, तों करण्याला व गांवांत सफाई वगैरे ठेवण्याला काय काय गोष्टी अवश्य केल्या पाहिजेत याची अंदाज पत्रकें तयार करावी. ही पत्रकें सरकारा पुढें गेल्यावर जसजसा पैसा शिल्लक असेल त्या मानानें त्याप्रमाणें तजविजी करण्यांत याव्या. याशिवाय प्रत्येक प्रांताच्या किंवा जिल्ह्याच्या मुख्य अधिकाऱ्यांना या संबंधानें जे जे अधिकार दिलेले अहित ते कायमच अहित असें समजावें.

दुसरी अडचण पैशाची. मुनसिपालिट्या व लोकल बोर्ड सार्वजनिक कामा करितां कर्जाऊ पैसा काढण्याची जी परवानगी दिली आहे व त्या प्रमाणें त्या नेहमीं कर्जे काढीत असतात याला सरकारची समती आहे. तथापि या रीतीनें कर्जाऊ काढिलेला पैसा इतर कामाकडे लावितां न अरोग्या संबंधानें स्थाइकची कामें करण्याकडे मात्र लावीला पाहिजे. सन १८७९ च्या ११ व्या कायद्या प्रमाणें मुनसिपालिट्या व लोकल बोर्डस यांना सार्वजनिक कामा करितां कर्जे काढितां येतें खरे परंतु या कर्जास व्याजाचा दर जो लाविला जातो तो इतका जबर आहे कीं कधीं कधीं हे कर्ज नको असें त्यास वाटूं लागते. व्याजाचा दर कांहीं अंशी कमी होऊन किफायतवार कर्ज मिळेपर्यंत अरोग्य रक्षणाकरितां योग्य कामें करण्याचें मनावर घेणें अशक्य अहे. या गोष्टींचा विचार सरकार पुष्कळ दिवसां पासून करीत आहे तथापि त्याचा पक्का निश्चय अद्याप कांहींच झाला नाहीं. सध्यां सरकारनें अशी सूचना केली आहे कीं निरनिराळ्या स्थानिक सरकारच्या सहायानें या कामा करितां एका “ प्राव्हीनशीयल लोन फंडांची ” स्थापना करावी व त्यांतून निरनिराळ्या लोकल बोर्डास आरोग्य रक्षणाच्या कामा करितां मदत करावी.

अशा रीतीनें अरोग्य रक्षणांच्या कामास मदत करण्या विषयीं निरनिराळ्या स्थानिक सरकारनीं आपली इच्छा प्रगट केली अहे व त्या गोष्टीला हिंदुस्थान सरकारची समती ही अहे. प्रत्येक स्थानिक सरकारच्या वार्षिक बजेटामध्यें या कामाकरितां मुद्दाम कांहीं नेमणूक करावी अशी ही हिंदुस्थान सरकारची इच्छा अहे. ही पद्धती हल्लीं खासगी शाळांना सरकारांतून ग्रॅंट इन एड मिळत असते त्या प्रमाणेंच होणार अहे.

या प्रमाणें या ठरावाचा सारांष अहे. यांत केलेल्या सूचना खरोखर फार महत्वाच्या अहेत व निरनिराळ्या स्थानिक सरकारांनीं त्यांचा एकवार तरी अनुभव घेऊन पहावा अशी आमची त्यांस शिफारस अहे. हा अनुभव जर कायदेशीर ठरला तर लार्ड डफरिन साहेबांनीं जातां जातां हिंदुस्थानवाशीं जनांवर हा एक मोठा उपकारच केला असें ह्मणण्यास हरकत येणार नाहीं.

## राष्ट्रीय सभा.

( मागील अंकावरून पुढें चालू )

आमच्या मध्यें राजकार्यांत वाकबगार असे शेकडों लोक अहित तसेंच आमच्यामध्यें राज्यांतल्या सहस्त्रावधि कारस्थानांत अनेक घराण्यांच्या पिढ्याच्या पिढ्या गेल्या अहित तेव्हां इंग्रज सरकारच्या छत्रा खालीं राज्य कारभाराचा गाडा चांगल्या प्रकारें हाकण्या सारखें नेटीवांत पुष्कळ लोक सांपडतील आणि त्यांचे विचार ही सरकारास मान्य होतील; परंतु या सारख्या व्यक्ति मात्रांच्या विचारास मानणार कोण! स्वप्नांतल्या गोष्टी स्वप्नांत त्या प्रमाणें त्यांचे विचार त्यांच्या मनोराज्यांत राहतात. ह्यावरून लोकांच्या विचारास स्थैर्य येण्यास लोक समाज आवश्यक अहेत. समाजांतील बहुमताचा सरकारास स्वीकार करणें भाग आहे आणि त्यामुळें लोकांस काय पाहिजे याचीं ही निर्णय सरकारास सहजीं करितां येईल.

सरकारचे विचार लोकांस कळण्याचे प्रयोजन क्वचित् प्रसंगी पडतें कारण बहुतकरून सर्व विचार कायद्यांतील नियमांच्या रूपानें जाहिर होतात किरकोळ प्रकरणीं सरकारचे थेट हुकूम सुटतात आणि त्यांची अंमलबजावणी ही होते. या प्रमाणें लोकांचे विचार सरकारास कळण्याचे मार्ग सुगम नाहींत. वर्तमानपत्रें हें काम करितात पण तें अनेक कारणा मुळें अर्धवट होते. आणखी स्थानिक सभा भरवून अर्जद्वारा सरकारास खबर देण्याचा दुसरा मार्ग अहे. हे किंवा या सारखें दुसरे मार्ग अहेत पण त्यांचें अवलंबन करून ही कार्यसिद्धि होईल किंवा नाहीं हें निश्चयात्मक नाहीं.

आह्मी मागील अंकीं राष्ट्रीय सभेचें उद्देश सांगितले आहेत त्या वरून हें स्पष्ट दिसून येईल कीं या सभेपासून वरील उणीव दूर होण्या सारखी आहे. राष्ट्रीय सभा हिंदुस्थानांतील प्रमुख प्रमुख लोकांची आहे तेव्हां तिचे विचार ह्मणजे लोकमत होय. या सभेनें सरकारचे विचार लोकांस नीटपणें सांगितले ह्मणजे गैरसमज होत असल्यास तो नाहींसा होईल, कांहीं कांहीं गोष्टींत सरकारच्या संबंधानें लोकांची उत्तम तऱ्हेनें कान उघाडणी होईल आणि मग लोक आपल्या सरकारास अधिकाधिक चाहतील, आणखी दुसऱ्या पक्षीं ही सभा लोकांचें ह्मणणें सरकारास चांगलें समजावून देईल, ह्मणजे एकाच बाजूनें विचार करणाऱ्या सरकारच्या राज्यव्यवस्थेपासून आमचे अनेक तोटे आहेत तें यापुढें होणार नाहींत, चुक दुरुस्ती झाल्यानें सरकार व प्रजा हीं एक विचारानें वागतील आणि अखेरीस इंग्लंड व इंडिया या दोन राष्ट्रांचा निकट निकट संबंध जुळून उभय पक्षीं कल्याण होणार आहे. आह्मी ज्या गोष्टी प्रतिपादिल्या आहेत त्या कांहीं अशक्य नाहींत. त्या कालांतरानें घडून येण्या सारख्या आहेत हें दाखविण्यासाठीं राष्ट्रीय सभेनें काय काम केलें आहे ह्मणजे निदान कोणत्या राज्य प्रकरणीं सुधारणा करण्या साठीं कोणते उपाय योजिले अहित हें सांगितले असतां पूर्णपणें खात्री होईल.

गेल्या सालीं, राष्ट्रीय सभा मद्रासेस भरली होती त्या वेळीं तिचा संकल्प अकरा गोष्टि करण्याचा अहे. त्या पैकीं पहिल्या चार गोष्टी सभेच्या रचने संबंधानें व व्यवस्थे संबंधानें आहेत. त्यांत सभेनें बारा पोटसभा काढिल्या अहित आणि त्या सभाद्वारा राष्ट्रीय सभेच्या सभासदांची निवड हिंदुस्थानांतील मोठमोठ्या जिल्ह्यांतून होणार अहे; शिवाय या सभां कडे दुसरें काम सोंपाविलें आहे कीं त्यांनीं सालोसाल भरणाऱ्या सभे पुढें निघणाऱ्या विषयांचा मसूदा तयार करावा आणि तो स्टेट सेक्रेटरी व व्हाइसराय यांजकडे सभेच्या कामाच्या माहिती साठीं पाठवावा. दुसऱ्या तीन गोष्टी परचक्रा पासून हिंदुस्थानचें संरक्षण करण्या संबंधानें आणि त्यांत मुख्यत्वें करून राजेरजवाड्यांचे विचार प्रदर्शित केले अहेत. हे सर्व विचार सरकारच्या इच्छेस अनुसरून अहेत इतकेंच नाहीं तर प्रसंग बेतल्यास नेटीव संस्थानिक महाराणी सा. यांच्च सार्वभौमत्वा खालीं युरोपांतील दुसऱ्या कैक राष्ट्रांची खबर घेतील असे व्यक्त करून दाखवितात. बाकी राहिलेल्या चार गोष्टी देशांतील राज्यव्यवस्थे संबंधानें आहेत ह्या शेवटीं ल गोष्टी संबंधानें विशेष विचार, केला पाहिजे तो पुढील अंकीं करूं.

( पुढें चालूं .)

तिबेटचे लोक व आपले सरकार यामध्यें लवकरच चकमक झडेल असा सुमार दिसत आहे. तिबेटी लोक आपला पाय पुढें पुढें टाकीत अहित व त्यांची तयारी ही कडेकोट चालली आहे. त्यांचा हेतु सिकीम आणि इंग्रज सरकारचें सैन्य यां दोहोंवर एकदम हल्ला करण्याचा दिसत अहे. काय होते पहावें.

## The Berar Samachar

MONDAY AUGUST 20, 1888.

### THE ADDRESS TO OUR NEW VICEROY

The indefatigable Mr. Dadabhai Nowroji took the opportunity of presenting an address to the future Viceroy elect on behalf of the Indians in England. The answer which Lord Lansdowne gave to the address is highly assuring at any rate in the sense in which it has been generally interpreted in this country. The Viceroy said that the Government of India has to become less dependent on force and more so on the will of the people. He also realized the necessity of governing in accordance with the spirit of the age. The first portion of his speech may uudoubtedly be taken as a sure index of the policy to be expected of the coming Viceroy. It is a direct and emphatic contradiction to the alleged necessity of governing India by force. There is not an inconsiderable body of Anglo-Indians who maintain this theory although the tendency generally of British rule at present is the other way. The Viceroy has declared that he is not one of those who hold this theory of sword-government in India. The will of the people is the legitimate mainstay of a popular and lasting government. This has been exemplified in European countries especially in England and England's

highest Statesmanship does not mean to with hold the application of that principle to India. But there is a side issue involved in this proposition as to the exact meaning of the phrase 'will of the people.' There is no such thing some say as a real 'will of the people' in India. The people possess too little knowledge or are too much absorbed individual occupations to care to complain about the actual government of the country. And from this it is further inferred that as they do *not* complain they *have* no grievances at all. It may safely be admitted that the masses in India do not possess such knowledge about their relations to Government as their brethren in European countries and it may also be admitted that they cannot spare time to attend to these things. But it is not the less a fact that the educated classes in India do represent the national will. They are a minority indeed but their advanced intelligence entitles them to pass opinions on matters regarding State polity. They, more than anybody else realize the blessings of British rule and are indeed a very valuable moral support to the established government in this country. Presumably they are also cognizant of the wants and feelings of their country men. They are therefore the best entitled persons to represent the will of the people. And it is but necessary in the very nature of things that such a class should exist whose chief business it would be to represent the national will. Steps are being daily taken for giving such instruction to the masses as would interest them in State affairs. The will of the people is not a mere myth in India but is actually represented by a very intelligent class which has received the benefits of Western education.

Now what is the spirit of the age in accordance with which the Viceroy sees the necessity of governing the country. The tendency of the age is undoubtedly democratic. The conservative and radical elements are tugging away at the two ends and are producing a desirable modified effect. It is difficult for any statesman governing India to satisfy these two parties in the country at the present time. The foreign rulers are sometimes confronted with customs that shock them but are yet hallowed by time. In the famous Rukhmabai case for instance the advanced band of social reformers led the movement one way while the nation went the other. But this difficulty appertains only to matters social. In political matters almost all are agreed that the people are entitled to a fair share in the government of their country. The aspirations of the educated classes have been raised by their contact with Western civilization and thought and naturally they feel their position and are eager to improve it. Now is it too much for these people to ask that they should be represented more fairly in the Legislative Councils of Government and get higher appointments within the gift of the State. The Congress shows how *really* unanimous is the demand and when the resolutions of the Congress are backed up by eminent men like Chief Justice Garth, they deserve consideration at the hands of the Viceroy A thumb cannot possibly stem the torrent and it is as hopeless to stem the spirit of the age. True statesmanship would consist in recognizing the fact as our new Viceroy has and turning it into a proper channel at the proper time.

## RESOLUTION.

(Continued from our last issue.)

4 In rural areas the case is different. Among the village population the sense of the need for sanitary reform is but little, if at all, more developed than it was when the Royal Commission reported a quarter of a century ag . The great feature of Indian rural life is immobility of custom, upon which novel ideas make but little impression. For improving the sanitation of villages executive rules have been from time to time framed and recommended for general adoption. It does not appear however that they were anywhere productive of much good, for there was no executive agency to supervise their working or, when necessary, enforce them.

But this important matter of executive agency a great improvement has been effected by the District and Local Boards Acts passed by the Legislative Council of the Governer-General and by the various local legislatures. In the Madras Presidency a gradation of rural Boards has been established, one of which deals with the village; another with the subdivision of a district; a third with the entire district. All these Boards have their special functions to discharge; but each has to provide within the area of its jurisdiction for the sanitation of towns and villages, and to that end is endowed with powers to entertain the necessary establishments. In Bengal and the Punjab the organization established, or to be established, is on the whole similar to that established in Madras; and though under the system introduced in Bombay, the North-Western Provinces and Central Provinces, a larger territorial unit of self government has been adopted, there is no reason why the executive agencies should not act effectively throughout the larger areas. The various Acts of the Legislature, which create this system of local self-government, require the Boards to undertake, among other things, local works and measures likely to promote the health of the public within the area subject to their authority, and empower them to entertain establishments for that purpose. In some instances also the laws creating these bodies confer upon them limited powers of taxation. But when this is not the case or when it may be inexpedient to resort to taxation, or when funds may be insufficient to meet the expenditure necessary for sanitary and other improvements, it is always open to the Boards, with the sanction of the Local Government, to have recourse to loans under Act XI of 1879 (The Local Authorities Loan Act).

This legislation has therefore provided the Government of India, for the first time, with the means of creating that agency for executing sanitary reform in rural areas without which its previous exertions proved comparatively fruitless. The agency even in the Provinces in which it has been established, is as yet in its infancy; but year by year it will grow stronger and more efficient, and the Governor General in Council therefore desires to impress upon Local Governments that, from the beginning, the promotion of sanitation should be regarded as one of the most important duties of all District and Local Boards, and of Village Unions, where they exist.

5 In initiating and carrying approved sanitary measures into effect, it will be always essential to enlist the assistance and co-operation of the district authorities, which indeed are always available to Municipalities and Local Boards. But it must be remembered that district officers, who have generally shown themselves forward in promoting sanitary improvements and in co-operating with Local Boards in these matters, have neither the time nor the technical knowledge, nor the opportunities requisite for a comprehensive survey of the entire field of activity which is necessary for the discharge of the duties in question. Experience in India as well as in other countries has shown that, unless local executive agencies are carefully guided and controlled in sanitary matters, there is almost certain to be misdirection of energy and wasteful expenditure. As has been pertinently observed, "it is vain to hope that the numerous public bodies to which the sanitary administration of India has been committed will be found competent to discharge their important duties, so long as there is no competent authority possessing the necessary knowledge and armed with the necessary powers to assist their deliberations, guide their actions, and, when the occasion arises, correct their mistakes and remedy their inactivity." It therefore appears to the Government of India to be eminently desirable that there should be established in each Province a sanitary Board through which the Local Government can operate, and to which, subject in all respects to the orders of the Local Government, shall be entrusted the control and supervision over sanitary works, whether undertaken in urban or rural areas. It was one of the recommendations of Lord Stanley's Commission, referred to in the preamble to this Resolution, that a Commission of Health should be appointed at the seat of each Local Government, with purely consultative functions, to advise on all questions relating to sanitation. Something more than a consultative body is, in the opinion of His Excellency in Council, now required; and the Sanitary Boards which he wishes to create should therefore from the outset receive recognition, not only as a consultative body, but also as the executive agency through the Government acts in the Sanitary Department.

(To be continued.)

We learn that Mr. Edulji Clerk of the Judicial Commissioner's Court has been recommended for an Extra Assistant Commissionership. We hope that Goverement will take into favourable consideration this officer's long service and the satisfactory way in which he has discharged his duties. We are quite sure that he deserves the promotion and if he is fortunately appointed justice will only be done to him though it will be a tardy one.

## वऱ्हाड.

हवामानः— हवा सर्द आहे. प्रांतांत कित्येक जागीं हीव तापाची सात आहे. द वेचा उपद्रव ही कोठें कोठें तुरळक आहे.

येत्या आक्टोबरचे पहिले तारखे पासून अकोला व उमरावती येथील हुजूर खजिने ब्यांकेकडे जाणार.

मे० कर्नल स्प्यान्सकी कमिशनर हे गेल्या मंगळवारी उमरावतीस गेलें.

कुमार श्री हरबानजी आकि. अ० क० हे गेल्या आठवड्यांत तीन महिन्याचे रजेवर गेले.

बाळापूरचे कायमचे नायब तहशिलदार रा० रा० जैकृष्ण केशव उर्फ भायजी बाबा हे पेनशन घेणार ह्मणून समजतें.

हैदराबादचे रेसिडेंटचे जागीं सर लिपेल ग्रिफीन येणार हे ठरलें. मात्र केव्हां येणार हे अद्याप समजत नाहीं. त्यांची रजा येत्या एप्रिल पर्यंत आहे.

मि. एदलजी संजाना यांची ए० अ० क० चे जागे करितां शिफारस झाली असें समजतें.

गांवांत अलिकडे चोरट्यानीं बराच उपद्रव दिला आहे. गेले आठवड्यांत त्यांनीं घरफोडी करण्याचा बऱ्याच ठिकाणीं प्रयत्न केला, व एकें ठिकाणीं पोलिस त्यास धरण्यास यत्न करीत असतां त्यांस त्यांनीं बरीच दुखापत केली व पळून गेले.

मे० मेकंझी साहेब गेल्या आठवड्यांत अजमीरकडे जाण्यास उमरावतीहून निघाले.

उमरावती ता० १७—८—८८

हवामानः—सरासरी १९-२० दिवसांपासून पाऊस मुळींच पडत नाहीं तेणेंकरून ऊन फार तापतें. शेतकरी लोकाचे डोळे पावसाकडेस लागले आहे. तापाची सांत गांवांत आहे. रोगराई ह्मणण्या सारखी नाहीं.

मे. कमिशनर साहेब अकोल्याहून येथें ता. १४ रोजीं आले. मे. इलिअट सा. यांनीं ता. १५ रोजीं येथील दि. क. च्या जागेचा चार्ज क. बुलक साहेबा पासून घेतला.

मि. गोविंदराज अप्पा व मि. सफदरअलीबेग तहशीलदार यांस अ. ए. आ. क. नेमिलें.

येथील डि. क. आफिसांतील क्लार्क आफ कोर्ट रा. रा. कृष्णाजी महादेव यांस ३ महिन्याची रजा मिळाली त्यांचे बदली त्याच आफिसांतील डि. क्ला. आफ कोर्ट रा. रा. चांदेकर यांस नेमिलें.

ज्यु० क०—क० मेकंझी सा. त्यांनीं ता. १२ रोजीं येथील ता. १३ डि० क० क. बुलक यांस आपल्या जागेचा चार्ज देऊन त्याच दिवशीं संध्याकाळच्या गाडीनें अजमीरास रवाना झाले.

मुंबई गुरुवार—हणमंतराव जाहगीरदार यांजवरील खटला काल पुण्यास डि. माजिस्ट्रेट पुढें सुरू झाला. ब्यारिस्टर मि. ज्यारडाईन यांणीं हणमंतरावांवर ४ च्यार्ज आणिले आहेत. बळवंतरावडबीर यांणीं हणमंतराव यांनां तीन हजार रुपये दिल्याबद्दल तपशीलवार जबानी दिली. चोपड्याच्या सावकारानें डबीर यांनां रुपये उसने दिल्याचे सांगितलें. हणमंतरावा कडील ब्यारिस्टर मि. ब्रॅन्सन यांणीं उलट तपासणी तहकूब केली आहे.

## वर्तमानसार.

सर गणपत व ता के ग्वाल्हेरचे रीजन्सीचे प्रेसिडेंट, हल्ली आजारी आहेत ह्मणून कळतें. ईश्वर ... चकर आराम देवो.

जगन्नाथ पुरीस एकुणात ... पडण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं ... कांत दाखल क...

... मार्च महिन्याच्या ता० ... ३१ पर्यंतची देवघेव जिल्हा ...

...पर्य- १८ ... हीं

राशियन सरकारचा डोळा आमच्या देशावरपूर्ण असल्या मुळें कूर्मगतीनें तो सहपरिवार इकडे येत आहे. येथें येण्याच्या हेतूनें त्यानें जो प्रयत्न चालविला आहे तो इतका संगीनें आहे कीं, त्याचा नाश करणें आमच्या सरकारास अगदीं दुष्कर आहे. शास्त्रोक्त सीमा ठरविण्या साठीं आमच्या सरकारनें कोव्यावधी रुपयांचा अगदीं फन्ना करून काबूलच्या अमिरा साशख्या सामान्य राजास प्रतिवर्षी बारा लक्ष रुपये खंडणी देण्याचेंही कबूल केलें आहे. व शिवाय शस्त्रास्त्राचें सहाय होत आहे तें वेगळेंच इतकेंही करून शेवटीं ह्या राशियनची ह्मणून पिछेहट होत नाहीं. जर आमच्या सरकारनें पश्चिम सीमेकरितां संतोषकारक व शास्त्रोक्त रीतीनें निकाल केला आहे तर मग राशियाची दोन हजार फौज हिरातेस कां आली आहे? ही सेना हवा खाण्या साठीं हिरातेस आली आहे आज पर्यंत राशियन सैन्य हवा खाण्या साठीं हिरातेस आल्याचें आमच्या वाचण्यांत आलें नाहीं. हें उत्तर संतोषकारक आहे. काय? राशियन सैन्य हिरातेस येऊन पोंचेपर्यंत प्रकृतचे काबुलचे अमीर अगदीं घोरत कसे पडले आहेत! ह्यांत आंतून अमीराची राशियास संमति असावी असें अनुमान होतें. पुनः असे ऐकतों कीं, अमिराचा एक वकील गुप्त रीतीनें सेन्टपिटर्सबर्ग येथें गेला आहे. जर ही बातमी सत्य असेल तर हल्लीं जी हिरातेस राशियाची फौज आली आहे ती अमीराच्या सल्ल्यानेंच कां आली नसेल? शिवाय अमीर अबदुल रहिमान हा गादीवर बसण्यापूर्वी राशियाचा आश्रित होताच. तेव्हां त्याला राशियाची शक्ती व कारस्थानें चांगल्या रीतीनें माहीत असतीलच. आमच्या सरकारनें अशा दोन डगरीवर हात ठेवून वागणाऱ्या अमिरावर भरंवसा ठेवणें रास्त होणार नाहीं इतके पैसे व लढाईचें सामान देऊन शेवटीं असा अविश्वसनीय प्रकार होणें फारच भीतिप्रद होय. आमचे सरकार दूरदर्शी आहे तेव्हां तें ह्याचा वक्तशीर बंदोबस्त करील व ही गडबड शांत करील अशी आशा आहे.

लार्ड डफरिन साहेबांनीं सर लिपेल ग्रिफीन यांची भोपाळ येथील लीला व तत्संबंधीं कागद वगैरे पाहण्यास मागविले आहेत असें ऐकतों. खरें असल्यास ही मोठ्या आनंदाचीच गोष्ट समजली पाहिजे. हा एवढा प्रताप आमच्या अमृतबझार पत्रिकेचा आहे. सर लिपेल ग्रिफिन ह्यांस कांहीं कमीजास्त शिक्षा होणार किंवा नाहीं, ह्याचें अनुमान करणें आमच्या तर्कापलीकडे आहे. तथापि, लार्ड साहेबांच्या लक्ष्यांत इतकें तरी येण्याचा संभव आहे कीं, रेसिडेन्ट हे संस्थानिकाशीं अशा उद्दाम रीतीनें वागत असतात. रेसिडेंट हे आजला आमच्या देशांतील मांडलीक राजेच आहेत कारण त्यांच्या हुकुमावांचून आमच्या संस्थानिकांस एक पाऊल देखील पुढें टाकतां यावयाचें नाहीं. ते केवळ रेसिडेन्ट साहेबांच्या बशी... मांजराप्रमाणें आहेत. संस्थानिकाशीं केलेल्या तहनाम्यांतील [illegible] दप्तरीं दाखल मात्र झालेल्या अ[illegible] त्याप्रमाणें रेसिडें[illegible]ट महाराजांस वा[illegible] येत नाहीं. ते केव[illegible]ळ तेथें निरं[illegible] आमच्या संस्थानि[illegible]कांची [illegible] इतकी बारीक हे[illegible] हा[illegible] कांहीं दिव-

[illegible] सांनीं प्रतिष्ठीत गुलाम असेंच ह्मणावें लागेल. असो, लाट साहेब ह्याचा नीट बंदोबस्त करून निरंकुश बनलेल्या रेसिडेंटाची नीट का? उघाडणी करतील अशी आशा आहे.

द्रव्यापासून घात— गेल्या आठवड्यांत पियाळ येथें एक चमत्कारिक रीतीचा घात झाला. तेथील एका सोनारानें आपल्या एका सोबत्यास आपण सोनें विकत देतो अशी भुलथाप देऊन रुपये आणण्यास सांगितलें. त्या बिचाऱ्यानें ७०० रुपये व बरोबर एक कुणबी घेऊन तेथें आला. सोनारानें ही संधी पाहून उभयतां पाहुण्यास विषाचा प्रहार केला. परंतु त्या सोनारास अन्न रुचलें नसल्यानें विषांचा जोर तेवढ्याला बसला नाहीं. कुणबी लगेच यमसदनाप्रत निघून गेला.

रा० रा० काशिनाथ परशराम गाडगीळ हे विलायतेंत रोमन लीच्या परिक्षेंत पास झाले. ते० मि०

मि. दादाभाई नौरोजी हे विलायतच्या पार्लमेंटसभेचे मेम्बर होण्याकरितां लिबरल पक्षाचे उमेदवार ह्मणून पुढें आले आहेत असें सांगतात.

पहिल्या गुर्खा पलटणीस सीकीमवर स्वारीस जाण्याचा हुकूम झालाच. त्यांतील निवडक ५०० शिपायांस तावडतोब गांटग येथें जाण्याचा हुकूम झाला आहे व ते तेथें ता. १५ मिनहूच्या सुमारास दाखल होतील. जलापा येथील ४ तोफा ता. १० रोजीं दाखल व्हावयाच्या होत्या. मदतीस जाणारी फौज तेथें दाखल झाल्यावर त्या स्वारीच्या पहिल्या फौजेचे मुख्य कामदार क. ग्रहाम हे व या नव्या फौजेसह जलापा खिंडीच्या आंगच्या तिबेटन फौजेवर एकदम स्वारी करणार व त्या तिबेटन लोकांस सरहद्दीच्या पलीकडे हाकलून लावणार. राशिच्या या ठिकाणीं नदीवर पूल बांधण्याचें काम चालू असून त्या कामास तिबेटन लोक हरकत करणार आहेत, क. ग्रहामच्या मदतीस जाणारी वरील फौज दाखल होण्यापूर्वी जरी तिबेटन लोकांनीं वरील हल्ला केला तरी आपल्या बरोबरच्या फौजेनिशीं त्यांस हाकून न लावण्याची क. ग्रहाम यांस हिंमत आहेच. नवी फौज दाखल झाल्यावर क. ग्रहाम हे तिबेटी लोकांवर चाल करून जाण्यासही समर्थ होतील असें सांगतात. टा० अ०

ता. ४ रोजी पार्लमेंटमध्यें डेकन मायनिंग कंपनी संबंधीं रिपोर्ट वाचण्यांत आला त्यांत हिंदुस्थान सरकारनें निजाम सरकारास या पेक्षां चांगला सल्ला द्यावयाचा होता असें त्यांनीं सुचविलें.

मि. केन पार्लमेंटचे सभासद यांचें यंदाच्या कांग्रेसकरितां येण्याचें खास ठरलें.

हिंदुस्थान सरकारच्या रुली व आर्डर्स वगैरे निराळ्या छापून विक्रीस ठेवण्याचा त्यांचा विचार आहे.

मुंबई सारखी कलत्यास ही एक मिल ओनर्स असोशिएशन नांवाची एक सभा स्थापन करण्यांत आली आहे. कलकत्याच्या आसपास सुमारें ७० गिरण्या आहेत असे ह्मणतात.

रा० ब० विष्णु मोरेश्वर भिडे यांस ताहयात रावबहादुराचा किताब हिंदुस्थान सरकारनें दिला.

मि० क्राफर्ड यांवरील खटला सरकारानें काढून टाकला व त्यांस मोकळे केलें. सु. प.

येत्या रेल्वे कानफरन्स पुढें विचाराचे जे विषय यावयाचे आहेत त्यांत विलायते प्रमाणें इकडे ही उतारूंच्या गाड्यांचे फक्त तीनच वर्ग ठेवण्याचा एक विचार आहे.

अमेरिका खंडांतल्या स्वतंत्र संस्थानचे अध्यक्ष क्लेव्हलंड यांनीं आपल्या पार्लमेंटास असें कळविलें कीं, खजिन्यांत पैसा मनस्वी जमत चालला आहे, ह्यास्तव लोकांचे कर माफ करावे.

रायचूर समोंवतीं सोन्याच्या खाणी सांपडूं लागल्याची बातमी आहे.

मद्रासेहून कलकत्याला समुद्रकिनारीनें गाडी नेण्याचा विचार चालूं आहे.

पारिस शहरांत येत्या आक्टोंबर महिन्यांत एक नवीनच प्रदर्शन उघडणार आहे. यांत सर्व जगांत जितक्या प्रकारचे देव लोकांनीं मानिले आहेत, तितक्यांच्या प्रतिमा ठेवल्या जाणार आहेत. मध्येंच एक पुस्तकालय केलें आहे. यांत जगांतील सर्व धर्मसंबंधीं ग्रंथ ठेविले जाणार आहेत. या प्रदर्शनाकरितां जो वाडा बांधिला आहे त्यास एकंदर १०,०००,०० पौंड खर्च आला.

या महिन्यांत आमच्या युनिव्हर्सिटींत मोठाले फेरफार होण्याचा रंग आहे. जे विषय विचाराकरितां पुढें आहेत तेः— १ कायद्याचा नवीन खर्डा. २ नवीन यु. स्कू. परीक्षा. ३ देशीभाषांचा अभ्यासक्रमांत प्रवेश. ४ बी. ए. च्या परीक्षेचे विषय व एल्. एल्. बी. च्या परीक्षेसंबंधानें विचार. क. त.

## जाहिरात.

पुणें "ज्ञानचक्षु" छापखान्यांत विक्रीस तयार असलेल्या पुस्तकांची यादी.

| मराठी आक्ट. | किंमत | ट. ह. |
|---|---|---|
| क्रिमिनल प्रोसिजर सटिक | ५ ०८ | |
| सिव्हिल प्रोसिजर सटीक | ५ ०८ | |
| पिनलकोड सटीक..... | ७ ०८ | |
| न्यायरत्न........ | २ ०८ | ०२ |
| रेव्हिन्यु कोड.......... | ०८ | ०१ |
| सदरची रुळी......... | ०८ | ०१ |
| स्टांप आक्ट......... | ०६ | ०१ |
| कोर्ट फी आक्ट....... | ०६ | ०१ |
| कराराचा आक्ट....... | ०१३ | ०२ |
| पुराव्याचा आक्ट....... | ०८ | ०१ |
| रजिस्टर आक्ट....... | ०६ | ०१ |
| मुदतीचा आक्ट....... | ०६ | ०१ |
| आबकारी आक्ट....... | ०७ | ०१ |
| जंगलसंबंधीं आक्ट....... | ०८ | ०१ |
| विशेष न्यायाचा आक्ट.... | ०८ | ०१ |
| वतनदार आक्ट....... | ०६ | ०१ |
| लोकलबोर्ड आक्ट....... | ०६ | ०१ |
| **मनोरंजक पुस्तकें.** | **किंमत** | **ट. ह.** |
| श्री भावार्थरामायण.... | २० | २ |
| विचित्रपुरी......... | १ | ०२ |
| मदनमंजरी ......... | २ | ०२ |
| कामकंदला नाटक.... | १ | ०२ |
| उपयुक्त चमत्कार सं. भा. १ ते १० दर भागास किं. दहाही भा. घेत. ट. हा. माफ. | ०५ | ०१ |
| अलखमेपलख पलखमे दर्याव | ०४ | ०१ |
| सतारीचें १लें पुस्तक.... | १०४ | ०२ |
| संगीत रावाविलास नाटक. | ०६ | ०१ |
| मदनजन्म नाटक....... | ०१२ | ०२ |
| चमत्कारचिंतामणि .... | ०१३ | ०२ |
| मल्लविद्याप्रकाश......... | १ | ०२ |
| ऋणसंहार............. | ०४ | ०१ |
| मराठी ह्मणी......... | ०७ | ०१ |
| गोपीचंद नाटक (हीं.) | ०१२ | ०२ |
| मराठी रघुसर्ग दर भ. | ०१० | ०१ |

भाऊ गोविंद सापकर, ज्ञानचक्षूचे मालक.


## TO THE DEAF.

A 132 PAGE ILLUSTRATED BOOK ON DEAFNESS NOISES IN THE HEAD HOW CURED AT YOUR HOMES. PRICE 6 ANNAS; ADDRESS DR. NICHOLSON, 5, OLD COURT HOUSE STREET CALCUTTA.

## बह्यरे लोकांस सुचना

बह्यरेपणा व डाक्यांत ध्वनी होणें हे आपल्या घरीं कसें बरें होतात याजवर स्पष्टी करणास हे १३२ पानांचे आमचे पुस्तक किंमत ६ आणे.

डाक्टर निकलसन ५ ओल्ड कोर्ट हाऊस स्ट्रीट--कलकत्ता या पत्यावर मागवावे.


## विक्रीस तयार.

दिवाणी काम चालविण्याच्या रीतीविषयीं कायदा.
अथवा.
सन १८८८ चा आक्त नंबर १४
सन १८८८ च्या ६—७ व्या आक्तांतील दुरुस्तीसह.

### भाग १ ला.

या भागांत आक्ताची सुधारणा जेथल्या तेथें घातली आहे. व सुधारणा पहाण्या करितां सुधारणेचा आक्त पहाण्याची जरूर नाहीं.

किंमत २०८— टपालांतून नेणारास २०१२— व्हाल्युपेएबल करून मागविल्यास २०१४ या प्रमाणें पडेल.

दुसरा भाग तयार करण्याचें काम जारी आहे. त्यांत कलमाचा आंकडा देऊन त्या खालीं समजुतीच्या टिपा व हायकोर्टाचे जे ठराव आहेत ते खुलाशानें दिले जातील. हा भाग तयार झाल्यावर निराळी जाहिरात दिली जाईल.

ज्यास हीं पुस्तकें पाहिजे असतील त्यांनीं आमचेकडे पैसे पाठविले असतां पुस्तकें रवाना करण्यांत येतील.

R. H. KARANDIKER.
म्यानेजर ज्ञानप्रकास.
"ज्ञानप्रकाश" छापखाना पुणें.

☞ हें पत्र आकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

ालअखेर ,, ७ ,, १०८

ारकोळ अंकास............................०४

नोटीशीबद्दल.

१० ओळीचे आंत रु० १

पुढें दर ओळीस ०१०६

दुसरे खेपेस.... ...०१

Six Monthly..............

Single copy..........................4

Advertisements.

Below 10 lines...2 Rs

Per line over 10...4as

Repetition perline3as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR.

VOLXXII AKOLA MONDAY 27 AUGUST 1888 NO. 34

वर्ष २२ अकोला सोमवार तारीख २७ माहे आगष्ट सन १८८८ इ० अंक ३४



## K. B. RELE AND CO.'S MOST EFFICACIOUS.

## PREPARATIONS

## के. बी. रेळे कंपनीचीं अति स्वस्त व गुणकारी, रा म बा ण औ ष धें.

१ धातु पौष्टिक शक्तिवर्धक गोळ्या.

शरीर निरोगी सदृढ करणाऱ्या गोळ्या ह्याच आहेत. अति श्रमानें व हरएक दुसऱ्या कारणांनीं झालेली क्षीणता, मुखावरची निस्तेजता, पांढुरता, मनाची उदासीनता, जीर्णज्वरानें, हगवणीनें, खोकल्यानें झालेली क्षीणता, स्वप्नावस्था, मस्तकशूळ, कटीशूळ, निद्राभंग, गंडमाळा, क्षयरोग, रजस्वलास्थीतीमध्यें पोटांत दुखणें, धातु जाणें, वाईट स्वप्नें पडणें, हीं ह्यांच्या शेवनानें, नाहींशीं होऊन तोंडावर टवटवी येते. मज्जातंतूस तीव्रता येऊन स्मरण शक्ति वाढते. काम व अभ्यास करण्यास उल्हास येतो. तोंडास रुचि येऊन भूक लागते. पाचनशक्ति वाढते. प्रत्येकांनें ह्याचा अवश्य अनुभव घ्यावा. किं० १२ आणे.

२ परम्यावर खात्रीचें वस्ताद औषध.

हें बिनधोक अत्युत्तम त्वरित गुणकारी आहे. लघवीची जळजळ, तिडिक, धातु जाणें ही तात्काळ बंद होतात. परमा किती ही जुना व हट्टी असला तरी निश्चयात्मक बरा होतो. किं० १ रु०

३ परम्यावर पिचकारीचें औषध.

हें ही परम्यावर रामबाण आहे. किं० ०८ आणे.

४ धुपणी ( प्रदर ) वर अमोलिक औषध.

सर्व प्रकारच्या नव्या व जुन्या धुपण्या ह्यानें हटकून जलद बऱ्या होतात. भूक फार लागते. रक्तवृद्धि होऊन शक्ति येते. किंमत १ रुपया.

५ धुपणीवर पिचकारीचें औषध.

वरील औषधाबरोबर हे वापरल्यानें रोगी रोगमुक्त झाला नाहीं हें क्वचितच. किंमत ०८ आणे.

६ सर्व प्रकारच्या जखमांवर मलम.

चट्टा, चांदी, सर्व नव्या व जुन्या जखमा घाय इ० माठविणारे मलम कायतें हेंच. किं० ८ आणें.

७ खोकल्यावर अचुक औषध.

ह्यानें कफ सुटा पडतो, पडसे, दमा जातो, क्षयाचा, ढांग्या, घशांत गुदगुली होऊन येणारा इ० खोकले अचूक बरे होतात. किं. १२ आणे.

८ तापावर रामबाण औषध.

हिंवताप, पाळीचाताप, अंतरताप; जीर्णज्वर, ह्यांवर तर हें रामबाण आहे. जंगल किंवा म्यालेरियल नांवाच्या तापावर हें वस्ताद आहे. ह्यानें भूक लागते. अन्न पचतें. किंमत १२ आणे.

९ अजीर्ण, अतिसार, ह्यांवर औषध.

अजीर्ण, अतिसार, संग्रणी, अग्निमांद्य, अमरक्ताची व साधी हगवण इ० बंद करण्यांत हें कधींच मागे हटले नाहीं किंमत १२ आणे.

ह्या औषधांच्या गुणाविषयीं ज्या अनेक सर्टिफिकिटा मिळाल्या आहेत त्यांपैकीं एकाचा सारांशः—

"के. बी. रेळे यांस लिहावयास अत्यानंद वाटतो कीं, मजकडे पाठविलेलीं सर्व ( वरील ) * * * औषधीं मी लक्षपूर्वक तपासून पाहिलीं. तीं फार गुणकारी असून निर्धोक आहेत.

( सही ) डाक्टर वि. वि. गोखले, एम. ए. एम. डी."

सूचना— अनुपानाचा कागद औषधा बरोबर असतो घाऊक घेणारास चांगलें कमिशन मिळेल. एजंट्स पाहिजेत.

विशेष सूचना— आमच्या वरील औषधां शिवाय सर्व प्रकारचीं दुसरीं इंग्रजी औषधें जसें, पेनीकलर, क्लोरोडाईन, पेपरमिंट, काडलिव्हर आईल, वाऱ्याचीं तेलें, मलमें, साबू, पोट्याश, टिंकचर्स, सलाईन्स, इनोज फ्रूट साल्ट, वैद्यांस दवाखान्या करितां लागणारीं औषधें व शस्त्रें, वगैरे, वगैरे, व तरुण व वृद्ध ह्यांस लागणारे उत्तम गारेचे चष्मे, मुंबईंत आल्या शिवाय, लागणाऱ्या योग्य नंबरांचे पाठविण्यांत येतील त्याच प्रमाणें औषधांचीं व इतर पुस्तकें ही पाठविण्यांत येतील.

पैसे आल्यास किंवा व्ह्याल्युपेएबल पार्सलनें औषधें व इतर सामान पाठवूं. नाटपेड पत्रें पाठवूं नयेत. पत्रव्यवहार खालील पत्यावर करावा.

के. बी. रेळे कंपनी,
सेकंड कारपेंटर स्ट्रीट, खेतवाडी,
मुंबई.

☞ हीं औषधें सर्व इंग्रजी औषधें विकणारांकडे व मालकाकडे मिळतील.


वऱ्हाडसमाचार.

मिती श्रावण वद्य ६ शके १८१०.

## बरार रुरल बोरडस लॉ सन १८८५ यांतील कलम३३ अन्वयें नियम.

( मागील अंकावरून पुढें चालूं. )

८७ पट्यांचे वार्षिक नक्की उत्पन्ना बद्दल ( नियम ७४ ) अगर सब-ट्रेझरींतील वसुलांबद्दल ( नियम ७९ ) अगर जेव्हां ट्रेझरी आफिसरानें जिल्हा बोरडचे नांवांवर असलेली जमा बोरडाचे पास बुकांत वाढविली असेल किंवा जेव्हां सब-ट्रेझऱ्यांतून दिलेला पैसा ( नियम ८२ ) पास बुकांत दाखल केला असेल तेव्हां त्या रकमा लागलीच जिल्हा बोरडचे क्याश बुकांत दाखल केल्या पाहिजेत ह्मणजे तेणेंकरून पास बुकांत दाखल केल्याप्रमाणें डिस्ट्रिक्ट फंडाची जमा व खर्च याच्यांत व क्याश बुकांत दाखल केलेल्या रकमांत पूर्ण मेळ राहील.

८८ नियम ७८ यांत पूर्वीं सांगितल्या प्रमाणें खजिन्यांत पैसा भरणा करते वेळीं पास बुक त्या समागमें पाठविलें पाहिजे तसेंच तें प्रत्येक महिन्याचे कामाचे अखेर दिवशीं लिहिलें जाण्याकरितां व रीतीप्रमाणें बंद केलें जाण्याकरितां खजिन्यांत पाठविलें पाहिजे. त्यांत दाखल केलेल्या रकमांची बेरीज घेतली जाईल, व शिलक काढिली जाईल व ट्रेझरी आफिसरानें आपले सहीचा दाखला द्यावा कीं फंडाची एकंदर जमा व खर्च खजिन्यांतील हिशोबांत दाखल केलेल्या रकमांशीं मिळतो.

पास बुकांत काढलेली शिलक क्याश बुकाचे शिलकेशीं जरूर मिळाली पाहिजे.

ह्या दोन्ही शिलकांत मेळ मिळाला ह्या गोष्टी बद्दल चेअरमन यांणी आपल्या सहीनें क्याश बुकाचे पानावर ( लालशाईनें ) दाखला दिला पाहिजे तो असा कीं, "दाखला देण्यांत येतो कीं पास बुकाप्रमाणें
चे अखेर दिवसाची शिलक क्याश बुकांत त्याच तारखेस दाखविलेले शिलकेशी मिळते."

८९ तथापि हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, ही शिलक कम्पट्रोलर ज्यांचे आफिसांत सर्व जिल्ह्याकरितां निरनिराळे फंडाचे शिलकेचा हिशोब ठेविला जातो, यांचे लिहिण्या वरून दुरुस्त केली जाण्यास पात्र आहे.

९० ज्या अर्थीं कम्पट्रोलर यांस एखादे खर्चाचा, जसे पब्लिक वर्कसच्या खात्यानें पाब्लिक वर्कसचा खर्च जिल्ह्याचे फंडास साधारणपणें खर्ची घातलेला त्याचा, कोणता हिस्सा जिल्हा बोरड, सिविल स्टेशन किंवा कमिशनरचें बुक सरक्युलर १४ सन १८८१ अन्वयें नेमलेले स्थानिक कमिटीचा आहे, हें नेहमीं सांगतां येणार नाहीं, त्या अर्थीं निरनिराळे फंडाखालील जिल्हा बोरडचे शिलकीचे खरेपणा बद्दल दिपुटी कमिशनर यांस सर्व अंशी जबाबदार धरलें जाईल.

माहेवारी शिलकी पत्रक जें हल्लीं कम्पट्रोलर तयार करितात तें त्याचे नमुन्याप्रमाणें व त्याच रीतीप्रमाणें तयार केलें जाईल. व त्यांत लिहिल्याप्रमाणें ताळा बेरजेचा योग्य हिस्सा जिल्हा बोरडचे नांवें पास बुकांत जमा किंवा खर्ची जसें असेल तसें लिहिला गेला हें दिपुटी कमिशनर यांणीं पाहिलें पाहिजे.

९१ चेक ज्या महिन्यांत दिले गेले तो धरून तीन महिने पर्यंत चालूं राहील. उदाहरण ज्या चेकाची तारीख ११ जानेवारी आहे तो ३१ मार्चपर्यंत चालूं राहील.

न वठलेले चेकाची रकम किंवा ठरविलेले मुदती नंतर देणे राहिलेले चेक मुदतो बाहेर गेल्यामुळें रद्द होतात त्यांची रकम त्या महिन्याचे हिशोबांतून "न वठवलेले किंवा रद्द झालेले चेक नंबर ता. " यांत त्या महिन्याच्या खर्चांतून वजा करून क्याश बुकांत पुन्हा जमा करावा. तेणेंकरून तो खर्च माहेवारी हिशोबांत दिसणार नाहीं. जेव्हां एखादा चेक वठवला नसेल किंवा मुदती बाहेर गेल्या मुळें रद्द झाला असेल तेव्हां ज्या व्होचरावरून तो दिला तें व्होचर बोरडाचे आफिसांत ठेऊन घेतले पाहिजे व ज्या महिन्यांत तो खर्च दाखविला असेल त्या महिन्याचे हिशोबा बरोबर पाठवावा.

९२. सर्व डिस्ट्रिक्ट फंडाची देवघेव जिल्हा बोरडचे हिशोबांत बरोबर रीतीनें दाखल करितां यावी ह्मणून प्रत्येक तालुक बोरडानें आपले जिल्ह्याचे बोरडाकडे महिन्यांतून दोन वेळां त्याच जमेचे व खर्चाचे क्याश बुकांची नकल पाठवीत जावी ह्मणजे त्या महिन्याचे ता० १२ व ता० २८ रोजीं त्यांत अनुक्रमें मागील महिन्याचे ता० २९ पासून चालू महिन्याचे ता० १९ ( धरून ) पर्यंतची देवघेव व ता० १३ पासून ता० २८ ( धरून ) पर्यंतची देवघेव दाखल करावी. हीं पत्रकें आल्यावर प्रत्येक तालुक्याची ह्या जमेची व खर्चाची एकुणात मात्र जिल्हा बोरडाचे क्याश बुकांत दाखल करावी लागेल.

तथापि मार्च महिन्याच्या ता० १३ पासून ता० ३१ पर्यंतची देवघेव जिल्हा बोर-

डाकडे पाठविलेले क्याश बुकांचे नकलेंत सामील करावी.

ज्या चलावणी बरोबर तालुक बोरडाचा वसूल सब-ट्रेझरींत भरणा केला त्या चलावणा वें ज्या व्हौचरा वरून पैसा आदा केला तीं व्हौचरें क्याश बुकाचे नकले बरोबर पाठवावीं. ( पुढें चालूं )

## राष्ट्रीय सभा.

( मागील अंकावरून समाप्त )

येथपर्यंत आमच्या ह्या जंगी सभेचे स्थापने विषयीं, उपयोगाविषयीं व हिनें आज पावेतों इतक्या अल्पकाळांत नी एवढी मोठी चळवळ येथें व इंग्लंडांत करून सोडिली आहे त्या चळवळीचे एकंदर भावी फळ प्राप्ती विषयीं जागेच्या संकोच्यामुळें सारांश रूपानें विवेचन मागील ३–४ अंकांत आह्मीं केलेंच आहे. ह्या अंकांत वचन दिल्या प्रमाणें गत वर्षाच्या सभेच्या राहिलेल्या चार महत्वाच्या ठरावा संबधानें लिहिणें आहे.

ठराव पहिला, मुल्की अथवा दिवाणी आणि फौजदारी अधिकार एकाच अधिकाऱ्याकडे नसावेत. ठराव दुसरा, गव्हरनरजनरलच्या, गव्हरनरांच्या वगैरे कौंसिलांतून लोकनियुक्त सभासद असावेत. ठराव तिसरा. हल्लीं जो पांचशें रुपये दरसालच्या प्राप्तीवर सुद्धां कर आहे तो हजार रुपये प्राप्ती पासून पुढें ठेवावा. ठराव चवथा. ह्या देशाची स्थिती दिवसें दिवस फारच निकृष्ट दशेस पोहोंचत चालली आहे तरी ह्या देशाचें कलाकोशल्य वाढवण्याचें सरकारनें उपाय योजावे.

सरकाराकडे पाठविण्या करितां पास झालेल्या अकरा ठरावा पैकीं हे चार ठराव होत व बाकीच्यांचे दिगदर्शन मागील अंकीं केलेंच आहे. हे ठराव जितके महत्वाचे आहेत तितकें सर्वांस अत्यंत उपयोगीही आहेत ( पहिला ठराव किती उपयोगी आहे हें आमच्या वऱ्हाडास आज नव्यानें सांगितलें पाहिजे असें नाहीं. ) असो. हे सर्व ठराव आमच्या मुसलमान व दुसऱ्या राष्ट्रीय समाद्वेष्टयांच्या आक्षेपास कितीसे कारणभूत होतात हें न कळे. आमचे मुसलमान भाईचें ह्मणणें कीं ब्राह्मण बाबु वगैरे लोक पुढें जातील, राज्याचे चालक तेच होतील, मग आह्मांस कोणी विचारणार देखील नाहीं, आह्मीं असेच मागासलेले राहणार, व आम्हीं जे मागें ह्या देशांत वैभव संपादन केलें होतें तें सर्व लयास जाणार, ही मुतानें स्वर्गास जाण्याची रीत ह्या लोकांस कोणी सुचविली असेल ती असो. आह्मी अर्जदारां सरकारापाशीं आमचे योग्य हक्क आह्मांस द्या ह्मणून जर विनंती केली तर कांहीं दिवसांनीं इंग्रज सरकारचें राज्य आह्मीच बळकावूं ही विलक्षण कोटी रचण्यामध्यें आमचे बंधु आपलें अज्ञान पूर्णपणें प्रगट करीत आहेत साधारण मनुष्याकडून जर असें विचार बाहेर निघाले असते तर त्यांच्याकडे कोणीही फारसें लक्ष्य दिलें नसतें परंतु मुसलमान, हिंदु सर सय्यद अहंमदांनीं आपल्या विद्वत्तेचा, मोठेपणाचा व पुढारीपणाचा अशा रीतीनें दुरूपयोग करणें ह्मणजे आमच्या देशाचें दुर्भाग्यच समजलें पाहिजे मुसलमान समाज अगोदरच अज्ञानी आणि तशांत सर सयद सारख्या त्यांच्यांतील पुढारी ह्मणविणाऱ्या लोकांची जर ह्या सभे विरुद्ध हट्टवादी व दुराभिमानी भाषणें त्यांस नेहमीं ऐकावयास सांपडतात तर त्याचीं मनें कलुषित होण्यांत कांहीं आश्चर्य आहे असें नाहीं. परंतु ह्या त्यांच्या पुढारी मंडळींना ह्या गोष्टींचा पूर्णपणें विचार केला पाहिजे कीं, आपल्या समाजाचें बरें वाईट करण्याच्या संबधानें आपण सर्व प्रकारें जबाबदार धरले जात आहोंत.

ह्या तीन वर्षांच्या कांग्रेसच्या एकंदर चळवळींत तिच्या विरुद्ध पक्षाच्यां उलट असे काय प्रकार झाले आहेत हें आह्मास मुळींच दिसत नाहीं. उदारणार्थ. इनकमट्याक्स आमच्या बंधूस मान्य आहे काय? आणि जर तो मान्य नसेल तर तो कमी करण्या विषयीं त्यानी कांहींच खटपट करण्यास नको काय? आणि तो कमी करण्या बद्दल जर त्यांनां खटपट करणें योग्य वाटत असेल तर कांग्रेसच्या द्वारें सरकारास अर्ज करण्या पेक्षां अधिक सोईसकर अथवा योग्य दुसरी कोणती युक्ति त्यांनीं शोधून काढिली आहे? आह्मी असें ऐकतों कीं, सर सय्यद अहमद हे मुसलमान लोकांकरितां एक कांग्रेस सारखी सभा काढणार आहेत अथवा काढिली ही आहे. परंतु आह्मी असें विचारतों कीं, अशी सभा स्थापून आमचे बंधु कांग्रेस सभेनें जें कांहीं मागितलें आहे त्याच्या पेक्षां अधिक काय मागणार व [illegible] मेचें वजन सरकारावर [illegible] वजन अशा सभांनीं बसे[illegible] हट्टवादीपणानें देशाची सुधारणा कधींही होणार नाहीं. आमचें बंधूचें अज्ञानत्व कांग्रेस सभेच्या विरुद्ध वागल्यानें नाहींसें होईल काय? आमचे बंधु आणखी असेंही ह्मणतात कीं, सातशें वर्षें भोगलेलें वैभव नष्ट होईल. परंतु ह्या इंग्रजी अमलांत कितपतसें ह्याचें पूर्वीचें वैभव कायम राहिलें आहे. जे लोक मागें वैभवाच्या शिखरास जाऊन पोहोंचले होते ते हे लोक हल्लीं दारिद्र्य आणि बृथाभिमान यांचें माहेर घरच होऊन बसले आहेत सातशें वर्षांच्या वैभवा करितां जर हे इतके हळहळतात कीं, त्या वेडाच्या भरांत भलत्याच गोष्टी करण्यास प्रवृत्त होतात तर आह्मीं आर्यांनीं आपल्या हजारों वर्षांचें वैभव लयास गेलें ह्मणून काय करावें? सारांश आमच्या मुसलमान बांधवांस आमचें इतकेंच सांगणें आहे कीं, त्यांस जर आपली खरी सुधारणा करून घ्यावयाची असेल तर त्यांनीं द्वेषभावास मुद्दलीच रजा दिली पाहिजे. हिंदु व मुसलमान हा भेद जितका नाहींसा होईल तितका इष्टच आहे. आपण वादळांत सांपडलेल्या एकाच नौकेंत दोघेंही आहोंत तेव्हां तिच्या बचावाचे प्रयत्न दोघांसही सारख्या रीतीनें केले पाहिजेत. उच्चनीचतेचा प्रकार दोघांसही अहितकारक आहे. गाडीस जुंपलेल्या दोन घोड्या प्रमाणें आपली स्थिती आहे. मागें किंवा पुढें जाणें हें जसें त्या घोड्यांचा चालक जो गाडीवान् ह्याच्या हातांतच असेंत त्याच प्रमाणें आपली गत आहे तरी पण त्या घोड्या प्रमाणें आपाल्या शक्तीनें व जुटी पुढें धांव घेण्याचा प्रयत्न दोघांसही सोडतां कामा नये. नाहीं तर दोघांसही चाबूकाचे फटकोर बरोबरच बसणार आहेत.

राष्ट्रीय सभेचा मुळ उद्देश असाच आहे कीं सर्व समाजास जे हितकारक तेंच काम हातीं घ्यावयाचें एकीं किंवा दोन ठरीव समाजा करितां ही सभा मुळींच स्थापन झाली नाहीं. ह्यास्तव सर्व समाजांस ह्या सभेचा अभिमान सारखाच असला पाहिजे. आणि म्हणूनच हिच्याशी द्वेष करण्यचे कोणास ही कारण नाहीं.

राज्यकारभारांत हात असणें, हिंदुस्थानच्या सध्यांच्या स्थितीस रुपांतर देणें, हत्यार वापरण्यास व सर्व लोकांस व्हॉलंटियर होण्यास परवानगी मिळवणें अलीकडे लादले जात असलेले कारण लादून घेण्या विषयीं खबर दारी ठेवणें इत्यादि गोष्टीं सर्व समाजांस इष्ट वाटत आहेत व प्रत्येकजण अर्जदारां होईल तितको ह्या गोष्टीविषयीं खटपट करीत ही आहे. निरनिराळ्या समाजांनीं निरनिराळे उपाय योजून ह्या व ह्या सारख्या दुसऱ्या अनेक गोष्टी आपल्याशा करून घेण्याचा प्रयत्न करण्यापेक्षां सर्वांना एक वटून ह्या गोष्टी साध्य करून घेण्यास कांग्रेस सभे सारखा उपाय फारच हितकारक आहे ह्या करितां आमच्या राष्ट्रीय सभाद्वेष्टे बंधुस आमचे शेवटले हेंच सांगणें आहे कीं त्यांनीं अजून तरी डोळे उघडावेत व तन मन धनें करून ह्या सभेस साह्य करावें.

आपल्या लोकांची अवस्था कांहीं अंशी देखतभुले सारखी झाली आहे. कोणतीही एखादी नवीन गोष्ट दृष्टीस पडली व तिच्यांत [illegible] सारखी [illegible] ही अशा असल[illegible] कीं आपल्याला ती [illegible] दिसतो व आपण आनंदानें [illegible] उडूं लागतो. परंतु कांहीं काल गेल्यावर तिचें खरें स्वरूप दिसून आलें कीं आपले डोळे उघडतात. लार्ड डफरिन साहेबांनीं हिंदुस्थानच्या व्हाइसराय पदाचा स्वीकार केल्या पासून अशा प्रकारच्या अनेक गोष्टी आपल्या अनुभवास आल्या अगदीं आरंभीच लार्ड साहेबांनीं स्वदेशांत व इकडे आल्यावर ठिकठिकाणीं जी भाषणें केली ती सर्व मधुरसानें थबथबलीं असल्यामुळें आपल्या लोकांस त्यांच्या विषयीं अनेक आशा उत्पन्न झाल्या व लार्ड रिपन साहेबांनीं पेरिलेल्या सुबिजांचीं फळें हे गृहस्थ खरोखर आपल्याला सेवन करण्यास देतील असें वाटलें. या आशा कितपत सिद्धीस गेल्या हें त्यांच्या पुढील कारकीर्दीवरून स्पष्ट दिसून आलेंच आहे. हीच अवस्था पब्लिक सर्विस कमिशनची झाली. या कमिशनची स्थापना व त्यांतील सभासदांची उत्तम निवड या गोष्टी आपल्याला किती श्रेयस्कर वाटल्या व आपल्याला त्या त्यामुळें कितीतरी आनंद झाला? परंतु आतां तो सर्व थाट पोकळच होता असें आपल्या अनुभवास येत चालले आहे. कमिशननें आपल्या रिपोर्टांत ज्या ज्या सुचना केल्या त्या तरी आपल्याला किती चांगल्या वाटल्या, परंतु त्यांत देखील कांहीं अर्थ नाहीं असें आतां आपल्यास दिसून येत नाहीं. मोठमोठ्या सनदी व बिनसनदी जागा नेटिवांस देण्या संबधाच्या ज्या सुचना होत्या त्या दिसावयास मात्र मोठ्या भपकेदार परंतु त्यापासून आपल्यास वस्तुतः फायदा कांहींच नाहीं हें रावबहादूर रानडे यांनीं पुण्यास आपल्या भाषणानें सिद्ध करून दाखविलेंच आहे येऊन जाऊन आपली आशा काय ती वयाची इयत्ता १९ ची २३ करण्याबद्दल जी सुचना होती त्यावर होती. परंतु आतां असें कळतें कीं, या सूचनेंत देखील कांहीं अर्थ नाहीं. सरजान गार्स्ट यांनीं पार्लमेंट मध्यें साफ बोलून दाखविलें कीं " वयाची इयत्ता वाढविण्याचा सरकाचा तूर्त विचार नाहीं! " झालें एकूण सर्वच ऑफस! दुनिया झुलाती आहे झुलानेवाला चाहीये!

आह्मांस लिहिण्यास आनंद होतो कीं, शेट, अनरेबल दादाभाई नवरोजी या गृहस्थांना लंडनच्या एका भागांतील लिबरल लोकांनीं आपल्या वतीनें पार्लमेंटांत सभासद होण्या करितां निवडिलें आहे. ही जागा गुदस्तां १ मतें अधीक मिळाल्या कारणानें कान्सरव्हेटीव्ह पक्षाच्या एका गृहस्थास मिळाली होती. गुदस्त सालीं या गहस्थांस अपयश येण्यास कारण लिबरल युनियनिस्ट लोकांत झालेली गडबड दिसत नाहीं. तेव्हां यांस यंदा अपयश यावयाचें नाहीं. असा सुमार दिसत आहे. परमेश्वर आमच्या लोकांच्या रात्रंदिवस होणाऱ्या प्रार्थना ऐको व शेट साहेबांस यश देवो. हे गृहस्थ जातीचे पारशी आहेत त्यावरून पहतां देशहितासाठीं तन, मन, धन, अर्पण करून रात्रंदिवस खपणारे असे जगांत आज पर्यंत जे महापुरुष होऊन गेले आहेत व सध्यां ही कांहीं देशांत आढळतात त्यांत या महापुरुषाची गणना केल्या वांचून रहावत नाहीं. परमेश्वर त्यांस चिरायु करो व यश देवो.

सर सय्यद अहमद यांच्या प्रयत्नांचे फळें चोहोंकडे दिसूं लागलीं आहेत. गुदस्त साल पर्यंत मुंबई इलाख्यांतील मुसलमानांची राष्ट्रीय सभेला पूर्ण आश्रय व संमति होती परंतु यंदा खुद्द मुंबईंतील लोकांनींच आपला पाय मागें घेतला आहे. ज्या मंडळीं मध्यें आनरेबल बद्रुदीन तय्यबजी सारखीं रत्नें झळकत आहेत त्याच मंडळीनें आपलें कर्तव्य बजावण्यास मागें पुढें पहाणें ही मोठी दुःखाची गोष्ट आहे. आह्मास आणखी असें कळतें कीं अहमदनगर, औरंगाबाद वगैरे जीं दुसरीं १० ठिकाणें मुंबई इलाख्यांत मुसलमानानीं भरलेली आहेत तेथें देखील हाच साथ येणार आहे गुदस्त सालीं बंगाल्यांतील व वायव्य प्रांतांतील मुसलमानांस आपण हंसत होतों परंतु यंदा आपल्या शेजारींच हा प्रकार पाहून फार वाईट वाटतें. चमत्कार पहा कीं अन्य देशीय लोक ह्मणजे इंग्रज वगैरे, या कामीं दिवसेंदिवस अधिकाधिक कळकळ दाखवीत आहेत, खुद्द इंग्लंडामध्यें या कामीं मदत करण्यास नवीन नवीन गृहस्थ आपल्या कंबरा बांधीत आहेत असें असून आपल्या देशांतच ही अवस्था! आह्मांस आणखी असें कळतें कीं ज्या प्रमाणें राष्ट्रीय सभेचे उत्पादक तिजसाठीं इंग्लडांत खटपट करीत आहेत व त्यांनीं ज्या प्रमाणें तेथें एक मंडळी स्थापन केली आहे त्याप्रमाणेंच सर अहमदअली व त्यांचे अनुयायी हेही अशा प्रकारची एक सभा इंग्लंडांत स्थापण्याचा व तिच्या योगानें उलट पक्षानेंच ढवळ करण्याचा प्रयत्न करीत आहेत. ठिक आहे. या दोन्ही मतांचा इंग्लंडांतच सामना जेवढा लवकर होईल तेवढा बराब. असा सा-

मना व्हावा असें आह्मी इच्छितों. "सत्यमेव-जयते" या ह्मणींत कांहीं अर्थ असेल तर सत्य पक्षाला जय आल्या वांचून कधीं रहावयाचा नाहीं.

---

मुंबईंत फार दिवसां पासून घाटत असलेली "ज्युबिली टेक्नकिल इन्स्टिट्यूड" नांवाची शिल्प शाळा येत्या सप्टेंबरच्या पहिल्या तारखे पासून सुरूं होणार. या शाळे संबंधानें जीं पत्रकें हाकाल पर्यंत प्रसिद्ध झालीं आहेत त्यावरून असें कळतें कीं आरंभीं फक्त यंत्राची चित्रें काढणें, वाफ व पदार्थविज्ञान हे विषय शिकविणार. तथापि या शाळेच्या उत्पादकांचा मुख्य हेतु निरनिराळ्या प्रकारच्या धंद्यांची व कारागिरी, कारखाने यांचीही कामें स्वतंत्र प्रकारें करितां येतील असें शिक्षण येथें देण्याचा आहे. विद्यार्थ्यांच्या सोई करितां दिवसाचा व रात्रीचा असे निरनिराळे वर्ग काढिले आहेत. दिवसाच्या वर्गांस येणाऱ्या विद्यार्थ्यांची पांचव्या इयत्तेची परीक्षा झाली असली पाहिजे व रात्रीच्या वर्गांस येणाऱ्यांस लिहिणें वाचणें व थोडें गणीत आलें पाहिजे बाहेर गांवांहून येणाऱ्यां विद्यार्थ्यांच्या सोई करितां शाळेंतच रहाण्यास जागा मिळेल. या संबंधानें जास्ती माहिती या शाळेच्या प्रिन्सिपाल कडून मिळेल.

---

याच संधीला आमच्या वऱ्हाडांतही धंदे शिक्षणाची शाळा सुरू होणार ही मोठी आनंदाची गोष्ट आहे. रे. मि. फुलर साहेबांस शेवटीं यश आलें व त्यांनीं अर्ज केल्या प्रमाणें त्याच्याच पद्धतीवर आकेल्यास शाळा स्थापन होणार. मि. फुलर यांची पद्धति जरा विलक्षण आहे. या शाळेला कितपत यश येतें व ती कशी चालते पाहूं.

---

# The Berar Samachar

MONDAY AUGUST 27, 1888.

There has been a regular mania of commissions and conferences in these days. The business of the Revenue code conference is scarcely over when we hear of another conference being held by the Sanitary Commissioner H. A. D. for the purpose of discussing a set of revised rules, which he has framed for the regulation and conduct of the vaccination Department of the province. All the native superintendents of vaccination together with their head vaccinators have been invited to share the w... of discussion. So far as the object of the gathering is concerned no body can find fault with it: but when we think of the extreme irregularity of the measures that are adopted to accomplish that object, we cannot but share the feelings of misgiving entertained by the *Rambler* of our contemporary of the Pramod Sindhu.

In the first place nothing amused us more than the appointment of Mr. George the Head clerk, as president of the conference. Mr. George may be a very clever han lat managing the various businesses of a head office; but what knowledge can he be supposed to have of the vaccination work. The Sanitary Commissioner alone is the proper person in the place as no body else is supppsed to know the ins and outs of the vaccination work so throughly as he does. Then again the extreme dilatoriness with which the business of the conference is carried on is sure to entail unnecessary and uncalled-for hardships and privations on the poor members. The conference was formally opened on the 15th. Instant, and still half the business at hand is not yet over! The Revenue Code Conference disposed of its work in a day, and even the Educational conference takes only a couple of days to go through a much lengthier programme. Mr. George sitting as he does, in *otium cnmdignitate* in his presidential chair is little expected to know any thing of the miseries which his dilatory movements are every day entailing upon his unfortunate colleagues. Some of the vaccinators are, we hear, compelled to huddle themselves in the serai and lead a life of extreme privation. Will Dr. Little look to this?

As regards uhe conduct of the business, if the strange things we hear are really worth a credit no good can result from the conference however prolonged its sttings may be. Ssome of the points that have a direct and prominent bearing on the junior members of the department and their work are deliberately reserved as " not to be brought forward" and if any of the members were to open his lips against it the liberty of his speech is curtailed. If Dr. Little really means to do some good to the departme nt he should not allow the conference to make so much fuss about the matter. It is of no use allowing the mountain to labour so hard only to bring forth a mouce.

---

## RESOLUTION.

(Continued from our last issue.)

These Sanitary Boards might be composed of an officer of approved administrative experience, the Sanitary Commissioner for the Province, and an officer of the public Works Department skilled in sanitary engineering. With these three officers might be associated one or more non-offi[illegible] दुगवण इ० धंदे करं pointed by the Local Di[illegible] नाहीं किंमत Every Commissioner of Di[illegible] Northern India and Bombay, and possibly District Collectors in Madras, might also be *ex-officio* members of the Board when dealing with questions connected with their divisicns or districts- It is probable that the duties of the Board would not, at all events for some time to come, be onerous, and could well be combined with the other and ordinary duties of the members.

Finally, it is desirable that the Provincial Sanitary Boards should, subject to the orders of the various Local Governments, be in constant communication with the Sanitary Commissioner with the Government of India, whose advice upon large schemes of sanitary reform will always be useful, and who will be in a position to communicate to one Provincial Board the results of experience gained by another. The Sanitary Commissioner with the Government of India, who acts under the general instructions of the Home Department, will thus, so far as may be needed, exercise the functions of a general co- ordinating and consultative authority; and through him the Government of India will be in a position to enforce if necessary, that general control which it is competent to exercise over all branches of the administration. It may afterwards be necessary to associate with the Sanitary Commissioner an expert in sanitary engineering science: but this is a question which need not be raised in this place.

6 In orders issued by the Home Department on Municipal and Local Board reports for 1885—86, cited in the preamble to this Resolution, the Governor General in council took the opportunity of laying down the general lines on which, in his opinion, future action of local bodies should be directed in promoting sanitary reform. The principle which he had in view was, that action should be preceeded by an accurate ascertainment of the requirements of each locality. Accordingly it was suggested to various Local Governments that a sanitary survey of each municipality and rural area should be undertaken with as little delay as possible, and that plans and estimates should be prepared of all the improvements necessary to provide each town or village with an efficient system of water-supply, drainage, and conservancy. The most important of these requirements, and that which, in the opinion of the Government of India, may at first be dealt with most effectively, and with the greatest chance of the active assistance and sympathy of the people, is the provision of pure water. Drainage,—especially in those localities in which the construction of public works, such as railways and canal embankments, have interfered with the natural flow of water, and may have injuriously affected the people's health,—is also a matter calling for early attention. But, while thus indicating the directions in which sanitation can be best promoted, there is on the part of the Governor-General in Council no desire to limit the discretion of Local and Provincial authorities as to their choice of action. That can best be determined by a knowledge of local requirements. In the orders in question it was added that plans, when once fixed, should be executed from year to year as funds become available, the object aimed at being persistently kept in view until it was completed. The Government of India desires in this place to call special attention to these instructions, which were devised with the view of checking wasteful recurring expenditure; and to express the hope that the annual reports on the admini[illegible] of Municipalities and Local धंदेच चालत Province will henceforw[illegible] चालत नाहीं. [illegible]rogress is being made in the [illegible]tion.

Another imp[illegible] तसें रहस्य नाही to which must here be calle[illegible] आहेत [illegible]sion in every Province of simple [illegible] for the regulation of village sanitation. In some Provinces such rules have been for some time in operation, though with no very beneficial result, while in others it is now in contemplation to render such rules more effectual by legislation. Wherever the existing law makes no provision, or insufficient provision, for the enforcement of necessary sanitary measures in rural areas, there should be no hesitation in taking the necessary power by legislation. And in this connection His Excellency in Council thinks it may be of advantage if the attention of all interested in sanitation is again called to the valuable remarks made in 1879 by the Army Sanitary Commission on the practical application of sanitary principles towns and villages in India. Their remarks are, therefore, published as an appendix to this Resolution.

7 Passing from the organization of the Sanitary Department to the important question of the provision of funds it is, in the first place, to be observed that the various Municipal Acts enable the corporate bodies created by these Acts to raise by local taxation the funds nec[illegible]sary for local expenditure. Similar power is conferred on Local Boards by the Madras, Bengal, and Punjab Local Boards Acts, but apparently not elsewhere. It will be for the consideration of the Governments of Bombay and the North-Western Provinces and Oudh, which possess Legislative Councils, whether legislation should be undertaken with a view to confer powers of taxation upon Local Boards in those Provinces. Meanwhile it is incumbent on the Governments of the Provinces in question to place Local Boards in possession of funds sufficient to meet the reasonable requirements of local sanitation. But though sufficient money to meet current expenditure may be provided in these ways, it will probably be necessary to raise additional funds for the execution of new or large works. It is indeed probable that local income may be increased without any hardship to the tax-payers. In certain Provinces some productive methods of municipal taxation have not yet been turned to account: but even when all current revenue is taken into account, it may and doubtless often will, be found necessary to have recourse to loans under Act XI of 1879, or to appeals to the Provincial or Imperial Governments for grants-in-aid of local resources.

(To be continued.)

---

We regret to hear of the distinction that is of late being observed in the treatment of the Native and Eurasian employees in the Commissioner's office. The sanctioned government holidays to which every person in the service of government is entitled are at times very sparingly allowed to the native employees, while not a single Christian holiday is refused to their Eurasian brothers. The superintendent boasts of his Eurasian clerks as working from sunrise to sunset; but we think, if he would just take into his head to stick to the office rules without distinction of caste or creed he will have no reason to complain of any such thing. If press of work is the only reason that compells the superintendent to withdraw from the poor Native clerks the few holidays which their brethren of the other departments are freely allowed, of what avail are the new arrangements in the clerical staff of the office?

---

## वऱ्हाड

हवामानः— पाऊस मधून मधून बराच येतो. पिकें बरीं आहेत. गावांत व प्रांतांत ही तापाचा आजार बराच आहे. हवेचा उपद्रव ही कोठें कोठें आहे.

क्लासर लोकांची चवथ्या इयत्तेंत जी परीक्षा होणार ती फक्त गणित, लिहिणें व वाचणें ह्या तीन विषयांतच व्हावी, बाकीच्या विषयांत होऊ नये असें रेसिडेंट साहेबांनीं ठरविलें. मुनसरीम लोकांची ही परीक्षा या प्रमाणेंच झाली पाहिजे कारण दोघास हा एकच नियम लागू आहे.

मि. आर्देसर दिनसाजी ए. अ. क. यांनीं दीड महिन्याची रजा घेतली. त्यांचे जागीं रा. रा. गोविंदराज अय्या तहासिलदार यांस नेमल्याचें कळतें.

खामगांवास स्पेशल माजिस्त्रेटचें नवीन कोर्ट स्थापन झालें. रा. रा. पुरणमलशेट, तेथील प्रसिद्ध साहू शामलाल ऑंकारदास यांचे चिरंजीव, यांस स्पेशल माजिस्त्रेट नेमिलें.

येथें धंदे शिक्षणाकरितां शाळा स्थापन करण्याचें सरकारानें मंजुर केलें. ती लवकरच स्थापन होणार.

अकोला हिंगोली स्टेट रेलवे लाईनचे कामांस लवकरच सुरवात होणार. इंजिनियराची नेमणूक ही झाली. दुष्काळा करितां राखून ठेवलेलें हें काम आतांच निघालें!

नागपूर छत्तीसगड रेलवे ब्राड गेजची (रुंदमापाची) करणें चाललें आहे तेव्हां पूर्वीं त्या रेलवे करितां आणलेले न्यारो गेजचे (अरुंदमापाचे) सामानाचा ह्या लाईनीकडे उपयोग करावयाचा असें ह्मणतात.

---

## वर्तमानसार

माजिस्ट्रेट यांणीं हणमंतरावावर कलम १६१-१६२ चा च्यार्ज ठेऊन १० दिवसांची ( २९ आगष्ट पर्यंत ) फुरसत दिली.

रेलवेपासून हिंदुस्थानचें नुकसान— सन १८८७ सालीं हमीच्या रेलवें पासून ६१ लक्ष, सरकारी खासगत रेलवे पासून ६९॥ लक्ष, सरकारी काहीं रेलवेंचे रस्ते दुसऱ्या कंपन्याकडे दिले आहेत त्यांच्या पासून ४०॥ लक्ष मिळून एकंदर नुकसान १६७ लक्ष रुपये. इस्ट इंडिया कंपनी कडून सरकारास मिळालेला फायदा ६८॥ लक्ष रुपये वरील नुकसानांत वजा जातां ९८। लक्ष रुपये निवळ तोय हिंदुस्थानच्या आंगावर बसला. हें केवढें नुकसान आणि अशा नुकसानीनें हिंदुस्थानचा किती दिवस निभाव लागणार राम जाणे, रेलवे संबधानें चौकशी करण्या करितां सन १८८४ सालीं बसलेल्या पार्लमेंटरी कमेटीच्या चौकशींत १८८३ साल अखेर रेलवेमुळें हिंदुस्थानचें नुकसान ७० कोट रुपये, आणि पुढल्या चार सालांत ह्मणजे १८८७ साल अखेर आणखी १० कोट रुपये मिळून १८८७ अखेर केवळ रेलवे मुळें हिंदुस्थानचें ८० कोट रुपये नुकसान झालें असें साफ ठरतें. हिंदुस्थानांत जास्त जास्त रेलवे करण्या बद्दल विलायती व्यापाऱ्यांचा सरकारच्या मागें सारखा तगादा असतो, त्या रेलवे करण्या साठीं सरकार ही अवल्या प्रमाणें परवानगी देतें ते व्हां हा निवळ अनागोंदीचा व्यापार नव्हे काय! सरकार हमी देतें, गोऱ्या व्यापाऱ्यांचें कुजत पडलेलें भांडवल कामीं लागतें, सरकारच्या हमीमुळें त्यांचे व्याज बिन बट्टा त्यांच्या पदरांत पडतें हें त्यांच्या तर्फेनें सगळें ठीक आहे. पण ह्या दुबळ्या हिंदुस्थानची काय वाट! ह्याचा कैवारी कोणीच नाहीं काय! गोऱ्या व्यापाऱ्यांच्या फायद्या पुढें सरकारास हिंदुस्थानच्या नुकसानीची पर्वाच वाटत नाहीं.

गेल्या सोमवारी पार्लमेंट सभा बंद झाली. ती तारीख ६ नोवेंमबर रोजीं पुन्हा सुरू होणार आहे.

मुसळ धार पाऊस पडल्यामुळें बोलन रेलवेचा रस्ता ठिकाठिकाणीं फाटला आहे.

तत्काळ व्याज समजण्याचें यंत्र— अमेरिकेंतल्या एका कुशल पुरुषानें हें तयार केलें आहे. १ पासून १०००० डालर पर्यंत, व्याज कोणत्याही दरानें १ दिवसा पासून १० वर्षांच्या आंतील मुदतीच्या रकमेचें व्याज अर्ध्या मिनिटांत ह्यानें काढतां येतें. दुर्बोडी सोप्या प्रमाणें ह्याचे दोन भाग असून दरएक भागाच्या दोन्ही तोंडांस दोन दोन अशा चार खुंट्या आहेत. त्यांत वर्ष महिने दिवस, अशीं अक्षेरं मांडलेले तीन भाग दाखविले आहेत. यंत्राच्या आंतील रूळास १ पासून १०००० डालर पर्यंत आंकडे मांडलेली पट्टी लपेटलेली असते. इष्ट रकमेचा आंकडा खुंटी फिरवून योग्य स्थळीं आणला, व्याजाच्या दराचा आंकडा त्याच्या समोर योजला, मुदत मांडली ह्मणजे नियमित वेळ खुंटी फिरवावी ह्मणजे वर्षे, महिने, दिवस यांचें व्याज त्या त्या भागांत आपाप मांडलें जातें, व्यापारी, पेढीवाले, वगैरे लोकांत ह्या यंत्राचा खप अतीशय होते आहे. अमेरिकन कल्पक ज्या ज्या अजब युक्त्या काढतील त्या थोड्याच.

हिंदुस्थान थिबाचे रिणकारीका होते! थीबाचा कस्टमचा मक्तेदार मुल्ला इस्माल ह्यानें आगबोटी खरेदी करण्या करितां अगाऊ पैसा दिला होता तो व पुष्कळ सामान थीबास दिलें होतें. त्याचो किंमत मिळून हिंदुस्थान सरकाराकडे ४१४९८८ रुपयांचे मागणें केलें होतें. सरकारनें २४२३३२ रुपये देऊन त्याची समजूत केली. दुसऱ्या आठजणांनीं थीगस जवाहीर पुरविल्या बद्दल ३॥ लक्षांचें मागणें केलें होतें, त्यास २८००० रुपये देऊन सरकारनें त्याची समजूत काढिली. अशानें हिंदुस्थानच्या खजिन्याचा कसा निभाव लागणार?

शु० सू०

मुंबई— पावसाचे सट्टे— नरोत्तम मोतीराम व हेमराज खिमजी हे आपल्या घरीं पावसाचे सट्टे चालवितात हें गैरशिस्त आहे ह्मणून त्यांच्यावर खटला चालविण्या करितां मि० काली बोवी यांनीं समन्स काढण्यास परवानगी दिली. पावसाचे सट्टे चालविणारांनीं इकडे लक्ष द्यावें.

सु० प०

| | | |
|---|---|---|
| मदनजन्म नाटक........ | ॰१२ | ॰२ |
| चमत्कारचिंतामणि .... | ॰१३ | ॰२ |
| मल्लविद्याप्रकाश.......... | १ | ॰२ |
| ऋणसंहार.................. | ॰४ | ॰१ |
| मराठी ह्मणीं............... | ॰७ | ॰१ |
| गोपीचंद नाटक ( हीं. ) . | ॰१२ | ॰२ |
| मराठी रघुसर्ग दर भा | ॰१० | ॰१ |

भाऊ गोविंद सापकर, ज्ञानचक्षूचे मालक.


## TO THEDEAF

A 132 PAGE ILLUSTRATED BOOK ON DEAFNESS NOISES IN THE HEAD HOW CURED AT YOUR HOMES. PRICE 6 ANNAS; ADDRESS DR. NICHOLSON, 5, OLD COURT HOUSE STREET CALCUTTA.

## बहिरे लोकांस सुचना

बहिरेपणा व डोक्यांत ध्वनी होणें हे आपल्या घरीं कसें बरें होतात याजवर स्पष्टी करणास हे १३२ पानांचे आमचे पुस्तक किंमत ६ आणे.

डाक्टर निकलसन ५ ओल्ड कोर्ट हाऊस स्ट्रीट--कलकत्ता या पत्त्यावर मागवावें.

निःसंशय कायदेशीर.

## न भूतो न भविष्यति!

## फारच दुर्मिळ संधि!!!

## बृहद्राष्ट्रीय शाब्दविजिगीषा.

( शब्दांवर बक्षिसें मिळविण्याची चढाओढ. )

मराठींत, इंग्रजींत, गुजराथींत आणि हिंदींत.

## बक्षिसांत

## रुपये ५००० चा विनियोग !!!

ह्यांत

नशीबाची परीक्षा नसून अकलेचीच परीक्षा आहे.

## सिद्धेन्दुचन्द्रिका

नामक अपूर्व ग्रंथ जो मराठींत, गुजराथींत आणि हिंदी भाषेंत प्रसिद्ध करण्याचें योजिलें [illegible] व सोपी हगवण इ० [illegible] चढाओढींत [illegible]ण्यांत हें कधींच मागें हटले [illegible] करितां येईल.

[illegible] मजातंतूंस १२ [illegible] प्रत्येक प्रतीस किंमत.

[illegible]ढते काम व [illegible] येते

## दोन रुपये.

वर्गणी भरल्या बरोबर बक्षिस चिठ्ठी मिळेल. तिच्या आधारें ज्या त्या भाषेंत विजिगीषा (जिंकण्याची स्पर्धा) करण्यास सांपडेल.

## विशेष योजना.

जे गृहस्थ निरनिराळ्या तिन्ही भाषेंतील तीन पुस्तकांस एकदम वर्गणीदार होतील त्यांसच इंग्रजी भाषेंत शब्द तयार करून विजिगीषा करण्याचा हक्क मिळून शिवाय त्या तिन्ही भाषांत ही विजिगीषा करितां येईल.

ह्या तीन प्रतींची किंमत.

## फक्त पांच रुपये.

ठेविली आहे.

सर्व खुलासेवार माहिती साठीं प्रास्पेक्टस मागावा.

मेसर्स. जे. भरतिया ऍन्ड ब्रदर्स.

नं० ३८८, फाकलंड रोड, भायखळा.

## जाहिरात.

पुणें "ज्ञानचक्षु" छापखान्यांत विक्रीस तयार असलेल्या पुस्तकांची यादी.

| मराठी आक्ट. | किंमत रु. | आ. |
|---|---|---|
| क्रिमिनल प्रोसिजर सटिक | ५ | ॰८ |
| सिव्हिल प्रोसिजर सटीक | ५ | ॰८ |
| पिनलकोड सटीक.......... | ७ | ॰८ |
| न्यायरत्न............ | २ ॰८ | ॰२ |
| रेव्हिन्यु कोड.............. | ॰८ | ॰१ |
| सदरची रुळी.............. | ॰८ | ॰१ |
| स्टांप आक्ट............. | ॰६ | ॰१ |
| कोर्ट फी आक्ट......... | ॰६ | ॰१ |
| कराराचा आक्ट......... | ॰१३ | ॰२ |
| पुराव्याचा आक्ट......... | ॰८ | ॰१ |
| रजिस्टर आक्ट......... | ॰६ | ॰१ |
| मुदतीचा आक्ट........ | ॰६ | ॰१ |
| आबकारी आक्ट........ | ॰७ | ॰१ |
| जंगलसंबंधीं आक्ट......... | ॰८ | ॰१ |
| विशेष न्यायाचा आक्ट ... | ॰८ | ॰१ |
| वतनदार आक्ट ........... | ॰६ | ॰१ |
| लोकलबोर्ड आक्ट........ | ॰६ | ॰१ |

| मनोरंजक पुस्तकें. | किंमत रु. | आ. |
|---|---|---|
| श्री भावार्थरामायण.... | २० | २ |
| विचित्रपुरी............ | ? | ॰२ |
| मदनमंजरी .......... | २ | ॰२ |
| कामकंदला नाटक.... | १ | ॰२ |
| उपयुक्त चमत्कार सं. भा. १ ते १० दर भागास किं. दहाही भा.वेत.ट.हा.माफ. | ॰५ | ॰१ |
| अलखमेपलख पलखमे दर्याव | ॰४ | ॰१ |
| सतारीचें १लें पुस्तक.... | १॰४ | ॰२ |
| संगीत रावाविलास नाटक. | ॰६ | ॰१ |

## विक्रीस तयार.

दिवाणी काम चालविण्याच्या रातीविषयीं कायदा.

अथवा.

सन १८८८ चा आक्त नंबर १४

सन १८८८ च्या ६–७ व्या आक्तांतील दुरुस्तीसह.

## भाग १ ला.

या भागांत आक्ताची सुधारणा जेथल्या तेथें घातली आहे. व सुधारणा पहाण्या करितां सुधारणेचा आक्त पहाण्याची जरूर नाहीं.

किंमत २॰८— टपालांतून नेणारास २॰१२— व्हाल्युपेएबल करून मागविल्यास २॰१४ या प्रमाणें पडेल.

दुसरा भाग तयार करण्याचें काम जारी आहे. त्यांत कलमाचा आंकडा देऊन त्या खालीं समजुतीच्या टिपा व हायकोर्टाचे जे ठराव आहेत ते खुलाशानें दिले जातील. हा भाग तयार झाल्यावर निराळी जाहिरात दिली जाईल.

ज्यास हीं पुस्तकें पाहिजे असतील त्यांनीं आमचेकडे पैसे पाठविले असतां पुस्तकें रवाना करण्यांत येतील.

R. H. KARANDIKER.

म्यानेजर ज्ञानप्रकास.

"ज्ञानप्रकाश" छापखाना पुणें.


☞ हें पत्र आकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.